

# प्रिय आणि अप्रिय

निर्मलकुमार फडकुले

# प्रिय आणि अप्रिय

निर्मलकुमार फडकुले

सुविद्या
प्रकाशन

'प्रिय आणि अप्रिय' हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९९८ साली 'सुविद्या प्रकाशन' यांनी प्रकाशित केले. व त्याची दुसरी आवृत्ती २००५ साली प्रकाशित केली. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

www.esahity.in

# प्रिय आणि अप्रिय

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

**प्रिय आणि अप्रिय**
Priya Ani Apriya

**निर्मलकुमार फडकुले**
Nirmalkumar Phadkule

**प्रथमावृत्ती**
२६ जानेवारी १९९८
**द्वितीयावृत्ती**
जून २००५

©
**डॉ. निर्मलकुमार फडकुले**

**प्रकाशक :**
सुविद्या प्रकाशन
'गंगा निवास',
३७४, उत्तर कसबा, सोलापूर-०७
फोन : २७२२ ५१०

**अक्षर जुळणी**
जयंती ऑफसेट
'गंगा निवास'
३७४, उत्तर कसबा, सोलापूर-०७
फोन : २७२४ ४१५

**मुद्रक :**
विनंद ऑफसेट
टिळक चौक, सोलापूर

**मुखपृष्ठ :**
शिरीष घाटे

**मूल्य : १०० रु.**

अमला आणि चंदना
या खोडकर बालिकांना,
यांनी माझ्या जगण्याला नवा सूर दिला

# थोडं मनातलं....

ललित गद्य हा लेखनप्रकार अलीकडं पुन्हा बहरत चालला आहे. 'लघुनिबंध', 'गुजगोष्ट' या नावापासून प्रवास करीत हा साहित्य प्रकार आता 'ललित गद्य' या अधिक सार्थ नावाच्या चौकटीत सामावला जातो. बाह्यत: दिसायला सोपं वाटणारं हे लेखन खरं तर अवघड असतं याची जाणीव लेखकांना झाली आहे. ललित गद्यात कोणत्याही विचारांना अवसर असतो. भावनेची उत्कटता असेल, विनोद, उपहास, अवखळपणा, काव्यात्मकता किंवा कोणताही रंग अथवा ढंग असेल पण हे लेखन लेखकाच्या चिंतनशीलतेचं दर्शन मात्र घडविणारं असावं. ज्यानं आयुष्यातल्या अनेकविध सुख दु:खांचा जाणीवपूर्वक अनुभव घेतला आहे अशा लेखकाला काहीतरी सांगावंसं वाटतं. त्याच्या सांगण्यात कस असतो, रस असतो. त्याची स्वत:ची एक शैली असते आणि जीवनाकडं तो आपल्या विशिष्ट दृष्टीनं पाहात असतो खरं तर हे साऱ्याच साहित्याचं वैशिष्ट्य असतं. ज्यात जीवनाचा कडूगोड विचार असतो त्यालाच आपण साहित्य म्हणतो. ललित गद्यातही हेच विशेष संक्षेपानं पण आकर्षकपणानं प्रकट होतात.

हा साहित्य प्रकार मला मनापासून आवडतो. कारण यात लेखकाच्या मनाचे भिन्न भिन्न रंग सहजपणानं प्रकट होऊ शकतात. कधीकधी समाजजीवनाचं कुरुप दर्शन होतं. माणसं स्वार्थी, असंस्कृत आणि छद्मी आहेत या विचारानं मन विषण्ण होतं. खिन्न, निराश झालेल्या दृष्टीनं जगाकडं पाहू लागलो तर जगातला सारा कोलाहाल अर्थशून्य किंवा अनर्थाकडं नेणारा आहे असं वैफल्य मनाला येतं. पण याच जगात बालकांचं निष्पाप हास्य आहे. वाऱ्याच्या शीतल लहरी आहेत. पावसाच्या धारा आहेत. माणसाच्या हृदयात प्रीतीची फुलपाखरं आहेत. पैंजणांचा नाद आहे. प्रिय आणि अप्रिय दोन्ही आहे. दोन्हीही स्वीकारण्याची मानसिक तयारी असली म्हणजे आयुष्य बेसूर वाटत नाही. असे काहीतरी विचार मनात उचंबळत राहातात. त्यांना शब्दरूप देण्याचा हा एक प्रयत्न. तो कितपत सफल झाला हे रसिकांनी ठरवायचं आहे. यापूर्वीच्या माझ्या चार ललित लेखसंग्रहाचं स्वागत त्यांनी उत्साहानं केलं. हे पुस्तकही माझे वाचक स्वीकारतील अशी आशा आहे.

यातलं लेखन 'तरुण भारत' आणि 'संचार' या लोकप्रिय दैनिकांच्या रविवारीय आवृत्तीतून प्रकाशित झालं आहे. गेल्या चार वर्षांतलं हे स्फुटलेखन. पुस्तकरूपानं हे लेख प्रकाशित करण्यास 'तरुण भारत' व 'संचार'च्या संपादकांनी मला संमती दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझे मित्र श्री निर्मलकुमार सूर्यवंशी यांनी स्नेहभावानं प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारुन ती पार पाडली या बद्दल त्यांचा आणि त्यांच्या 'निर्मल प्रकाशन' या नामांकित संस्थेचा मन:पूर्वक ऋणी आहे. सुप्रसिद्ध चित्रकार श्री चंद्रमोहन कुलकर्णी यांनी कलात्मक मुखपृष्ठ तयार केलं. त्यांचेही हार्दिक आभार.

**- निर्मलकुमार फडकुले**

# आणखी थोडं...

'प्रिय आणि अप्रिय' या ललित लेखसंग्रहाची आवृत्ती सुविद्या प्रकाशनाच्या वतीनं प्रसिद्ध होत आहे. 'ललितगद्य' हा साहित्यप्रकार वाचकांना आवडतो. लेखकाचं जीवनविषयक चिंतन जेव्हा सहजशैलीनं प्रकट होतं तेव्हा त्या लेखनाला एक मनमोकळं, अनौपचारिक रूप येतं. मराठीत हा लेखनप्रकार आता अधिकाधिक वाचकप्रिय होत आहे. ललितगद्यातले रंग आणि गंध माझ्या लेखनात कितपत उतरले आहेत हे रसिकांनी ठरवायचं आहे. वाचकांची पुन्हा पुन्हा मागणी आल्यामुळं माझे प्रकाशक मित्र श्री. बाबुराव मैंदर्गीकर यांनी दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्याची इच्छा व्यक्त केली. या पुस्तकात वेगवेगळे विषय आले आहेत. पण पुस्तकाचा मध्यवर्ती सूर जीवनप्रेमाचा आहे. जीवनात अप्रिय पुष्कळ असतं. पण माणसाच्या मनात आशावाद असेल, रसिकता असेल तर तो आपल्या आयुष्याची वाटचाल 'प्रिय' करू शकतो. आपल्या मनात लपलेले आनंदाचे आणि उन्मादांचे झरे आपणच शोधू शकतो. हेच जीवनाचं तत्त्वज्ञान मला प्रिय आहे. पुस्तक आपल्यासमोर ठेवलं आहे ते तुम्हाला प्रिय वाटो की अप्रिय वाटो मला चिंता नाही. अप्रियतेतही प्रियत्व सामावलेलं असतंच. कलापूर्ण, आकर्षक, मुखपृष्ठाबद्दल चित्रकार श्री. शिरीष घाटे यांना व प्रकाशक श्री. बाबुराव मैंदर्गीकर यांना धन्यवाद !

– डॉ. निर्मलकुमार फडकुले

# अनुक्रम


जीवन गाणं गात राहावं ! / १
एका स्वातंत्र्य सैनिकाचे अश्रू / ७
हे कसले कलावंत ? / १३
सुगंधी आत्मकथा / १९
याला म्हणावं राजकारण ! / २६
ज्ञानेश्वरांशी हितगुज / ३१
गतजीवन विसरणं शक्य आहे ? / ३९
एक मैफल रंगलेली / ४५
तारुण्य : एक चिंतन / ५२
हे राहूनच गेलं ! / ५८
त्याचा येळकोट राहीना / ६४
बोले तैसा चाले / ७०
यक्ष प्रश्न / ७७
कलावंतांचं चारित्र्य / ८२
भले तरी देऊ कासेची लंगोटी / ८७
एका कुलगुरुची व्यथा / ९३
अशीही स्नेहसंमेलनं ! / ९९
कलावंत आणि रसिक / १०५
सत्ता, मदिरा आणि प्रीती / ११२
गांधींजी परत येऊ नका ! / ११९

# जीवनाचं गाणं गातच राहावं !

जन्म आणि मृत्यू. एक आरंभाचा बिंदू आणि दुसरा अंतिम बिंदू. या दोन बिंदूंच्यामध्ये जी रेषा आहे तिला आयुष्य अशी संज्ञा आपण देतो. प्रत्येकाचाच प्रवास केव्हातरी संपणारच आहे. जो प्रवास सुरू झालेला असतो तो कधीतरी संपणं ही निश्चित स्वरूपाची घटना आहे. जनन आणि मरण या घटना इतक्या नैसर्गिक आहेत की, त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचं काहीच कारण नाही. पण या दोन्ही घटना सुखदु:खांशी निगडित झाल्या आहेत. जन्म झाला की आनंदित होणं आणि मरणानं दु:खित होणं हा देखील एक अलिखित नियम बनला आहे.

मरणाचा तर विचार करायलासुद्धा मनुष्य घाबरतो. कारण मृत्यू म्हणजे अखंड अंधाराची प्रचंड गुहा मानली जाते. अंधाराचा अजगर जीवनाचा सारा प्रकाश गिळून टाकतो. अस्तित्व नाही. आशा - आकांक्षा नाहीत, कोणतीही धडपड नाही. चैतन्याचा लेशही नाही. एका भयानक अंधकारात सर्वस्वी बुडून जाणं आणि त्या अजस्त्र काळोखाचा एक अविभाज्य घटक बनणं म्हणजेच मृत्यू. या काळोखात विलीन होणं कुणालाही नको असतं. लहानसा कीटकसुद्धा मरणापासून दूर राहण्याची शक्य तितकी धडपड करीत असतो. माणसासारखा ज्ञानी जीव जीवनालाच बिलगून राहण्याचा आग्रह धरुन बसला तर त्यात कसलं आश्चर्य ?

शंभरीच्या जवळपास आलेला, सर्वस्वी दुबळा, विकल झालेला एक म्हातारा एका रुग्णालयातल्या खाटेवर कण्हत होता. शंभर वर्षांची वाटचाल त्यानं केली होती. आयुष्याची चव त्यानं यथेच्छ घेतली होती. आता जगाचा निरोप घेण्याची, रंगभूमीवरून निवृत्त होण्याची, प्रेक्षकांना अखेरचा रामराम करण्याची वेळ आली होती. दिव्यातलं तेल संपलेलं होतं, पण तो जराजर्जर म्हातारा जीवनाचा पदर सोडायला तयार नव्हता. पैलतीर आलेलं असलं तरी पुन्हा पुन्हा ऐलतीराकडेच परतण्याची त्याची आत्यंतिक इच्छा होती. तो आपल्या क्षीण आवाजात म्हणाला, 'मला जगायचं आहे, नुसता अंथरुणावर पडून राहिलो तरी चालेल - पण या जगाची संगत मला सोडवत नाही.' हे शब्द उच्चारतानाही त्याला फार कष्ट झाले. पण त्याच्या रक्तातली जीवनाची इच्छा अद्यापी टवटवीत आहे. हे पाहिल्यावर मला

आश्चर्य वाटलं. आणि आनंदही झाला. साधुसंत सांगतात की आयुष्याचा मोह धरू नये. कोणताही मोह झटकून टाकला पाहिजे. मरण जर दरवाजा ठोठावत असेल तर तत्परतेनं पुढं होऊन दारं उघडली पाहिजेत आणि पुढ्यात आलेल्या मृत्यूला मन:पूर्वक आलिंगन दिलं पाहिजे. त्याच्या कुशीत उत्कटतेनं शिरलं पाहिजे आणि गहिवरल्या आवाजात त्याला म्हणायला हवं, 'हे जन्मजन्मांतरीच्या सख्या, तुझीच वाट पहात होतो. येणार येणार म्हणून तू दोनतीन वेळा हुलकावण्या दिल्यास, आता तुला मी सोडणार नाही. जीवनाचा आता वीट आला. ते राग आणि लोभ, मत्सर, ईर्ष्या आणि क्षोभ, त्या वासना आणि स्वार्थ साऱ्या साऱ्या क्षुद्र गोष्टींचा कंटाळा आला. तुच्छ विकारांच्या दलदलीत राहणं आता मला शक्य नाही. आता माझ्या आयुष्याच्या रात्रीला मृत्यूची प्रसन्न पहाट भेटू दे. जुनाट झालेल्या रसहीन जीवनाची एकेक पाकळी गळून पडू दे. हे मृत्यो, तुझ्या ठायी असलेली चिरशांतीची धारा मला आकंठ पिऊ दे. ऐलतीर पाहिलं - त्यातलं नावीन्य संपून गेलं. पैलतीरावर बहराला आलेला मरणाचा मळा आता मला डोळाभर पाहायचा आहे. तू आता माझा जिवलग आहेस. अनेक जन्माचा प्रियकर आहेस.'

जीवनाकडं पाठ फिरवणं आणि मृत्यूच्या प्रेमालिंगनात विलीन होणं, मरणाची अभिलाषा बाळगणं अनेक साधूसंतांना सयुक्तिक वाटलं तरी मला ही कल्पना स्वाभाविक वाटत नाही. निसर्गाच्या नियमाप्रमाणं केव्हातरी मृत्यू येणारच असतो. त्याची वाट पाहण्यात, त्यासाठी प्रार्थना करण्यात कसला बरं अर्थ आहे ? न पाहिलेल्या पैलतीरावरच्या काल्पनिक सौंदर्यात मुग्ध होण्यापेक्षा या ऐलतीरावर जे जीवन सुखदु:खाचं आणि जयपराजयाचं पसरलेलं आहे ते काय कमी चित्रविचित्र आहे ? या ऐलतीरावरही सौंदर्याच्या लाटा उचंबळून येतात. बरेवाईट रंग इथंही परस्परांत मिसळून गेले आहेत. त्या तिथे पलीकडे एका आंब्याच्या झाडाखाली एक प्रणयी युगुल बसलेलं मी पाहात आहे. त्यानं तिचा हात आपल्या हातात इतक्या आत्मीयतेनं धरून ठेवला आहे की जणू तो तिला अभिवचन देत आहे, 'हा हात जन्मजन्मांतरी मला सोबत करणार आहे. त्याचा उबदार स्पर्श माझ्यापासून मृत्यूसुद्धा हिरावून घेऊ शकणार नाही. मरणाला देखील जीवन देणारा तुझा हा कोवळा हात असाच माझ्या हातात राहू दे. प्रेम आणि सौंदर्य यांच्या भरतीच्या लाटा आपल्या जीवनात खळाळत आहेत.' त्या नि:शब्द एकांतात रंगत चाललेली ही प्रेम कहाणी सुंदर नव्हे काय ? असे चिरंजीव क्षण केवळ सुखाचे असतील असं नव्हे. कारण

आयुष्याच्या वाटचालीत दु:खांना, वेदनेला, वैफल्याला देखील महत्त्वाचं स्थान आहे. दु:खाची कुंपणं ओलांडण्याची जिद्द बाळगून धडपडत राहण्यात देखील एक प्रकारचा आगळा आनंद अनुभवता येतो. यालाच तर जीवन म्हणायचं. केवळ फुलांच्या पायघड्या कुणी आपल्या पायाखाली अंथरीत नाही. या फुलांतच मधूनमधून निखारे पेटतात. ते बिनदिक्कत तुडवण्यात आणि सुगंधी फुलांसाठी धावपळ करण्यात एक विलक्षण बेहोशी अनुभवता येते. पराक्रमाचा आणि पौरुषाचा इतिहास दु:खाच्या आणि नैराश्याच्या वाटेनं वळणं घेत घडत असतो. केवळ यश मिळावं, अपयशाचा आणि पराभवाचा वारासुद्धा मी सहन करणार नाही असं कुणी म्हणत असेल तर त्याला मी 'पलायनवादी' म्हणेनं. झगडण्यात मस्त आनंद आहे. उगीच मरणाची वाट पाहात बसणं मला तरी मानसिक विकृतीचं लक्षणं वाटतं. जे मरण अटळ आहे त्याची जपमाळ ओढत बसणं खरोखरच वेडेपणाचं नाही काय ? 'स्मरण असावे मरणाचे' असं संतांनी म्हटलं आहे. या विधानाचा योग्य त्या संदर्भात अर्थ लावला पाहिजे. एखादा ध्येयवादी म्हणेल, 'आणखी काही वर्षातच माझा मृत्यू होईल पण त्याच्याआधी मृत्यूची कल्पना झटकून टाकून मला माझ्या रस्त्यानं निर्धारानं चालायचं आहे. मरण मला भेटण्यापूर्वी या जीवनात मला माझ्या पुरुषार्थाचं निशाण रोवायचं आहे. मला एका इतिहासाचं पान लिहायचं आहे. मी केव्हातरी संपणार आहे. हा विचार पुन्हा-पुन्हा उगाळीत बसण्यात कसलंच स्वारस्य नाही.' हे वैराग्य खरं तर पौरुषहीन वृत्तीचं नाही काय ? श्रीकृष्णानं अर्जुनाला पुरुषार्थसंपन्न जीवन जगण्याचा जो संदेश दिला तो अर्थपूर्ण आहे. अर्जुन तर संन्यास घेणं श्रेयस्कर आहे असं म्हणत होता. लढून आणि रक्तपात करून सिंहासन कशाला मिळवायचं? इथून निघून जावं, रणांगणाकडे पाठ फिरवावी. नको ते राज्य ! नको ती सत्ता ! पळपुटेपणाचं एक तत्त्वज्ञान त्याच्या बुद्धीनं तयार केलं मनाला पाहिजे असेल ते तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसवण्याचं काम बुद्धी करीत असते. समरांगणातून निघून जाणं आणि जीवनाच्या सुखदु:खात्मक संघर्षातून पळ काढणं याला पौरुषहीनताच म्हणतात.

ज्याला आनंद म्हणतात तो जीवनाच्या बाहेर कोठेतरी असेल असं म्हणून जीविताकडं पाठ करून आनंदाचा शोध लागू शकेल काय ? एका डॉक्टरानं मला त्याचं साधं, सरळ तत्त्वज्ञान सांगितलं, तो म्हणाला, 'मरणाच्या दारात उभ्या असलेल्या रोग्यांना पुन्हा जीवनाच्या प्रांगण्यात पाठवण्याचा मला जबरदस्त छंद

आहे तो माझा धर्म आहे. हे रोगी कधीच मरणार नाहीत असं नव्हे. मी सुद्धा एक दिवस जीवनाची सरहद्द ओलांडून मृत्यूच्या प्रदेशात जाणारच आहे. परमेश्वरानं साऱ्यांचेच पासपोर्टस् तयार करून ठेवले आहेत. शिक्के मारले आहेत. तारखाही लिहिलेल्या आहेत. तो दिवस आला की मुकाट्यानं तुम्हा आम्हा सर्वांनाच प्रस्थान ठेवावं लागणार आहे. केव्हातरी मरणार असलेल्या माणसांवर व्यर्थ औषधोपचार कशाला करायचा असं माझ्या मनात येत नाही. माझ्या हातात जितकं सामर्थ्य आहे तितकं मी पणाला लावणं हाच माझा जीवनोद्देश आहे. बंदुकीतली अखेरची गोळी संपली तर ती फेकून देऊन सैनिकानं हातानंसुद्धा लढत राहिलं पाहिजे. लढता-लढता आलेला मृत्यू मला भूषणावह वाटतो. म्हणून म्हणालो, 'या संघर्षात एक प्रकारचा उदात्त आनंद सामावलेला आहे. कुठल्यातरी निष्क्रिय तत्त्वज्ञानाचं पांघरूण घेऊन मी जीवनातल्या सुखदुःखांना नाकारणार नाही. दुःखसंकटासह मला हे जीवन स्वीकरणीय वाटतं. मरणाची वाट पाहात आयुष्याच्या दारात ताटकळत उभं राहाणं हा मला तरी वेडेपणा वाटतो.

त्या डॉक्टरचं प्रतिपादन तर्कशुद्ध होतं. जिवंत आणि रसरशीत होतं. सतत मरणाचं चिंतन करणं हा एक रोगटपणा आहे. त्याला शक्य तितकं टाळणं, त्याला फसवीत राहणं हेच आवश्यक ठरतं. प्रत्येक जीवाच्या रक्तातच हा गुणधर्म असतो. एकदा एक लांडगा हरिणाचा पाठलाग करीत होता. बिचारं हरीण जीव मुठीत घेऊन पळत होतं. साक्षात मृत्यू आपल्या पाठीमागं दौडत आहे. आपला घास घेण्यासाठी तो टपलेला आहे याची कल्पना त्या हरिणला आली होती. आपल्या तावडीतून निसटलेल्या हरिणाला तो लांडगा म्हणाला -

'अरे हा तर शुद्ध पळपुटेपणा झाला. केव्हातरी तुला मृत्यू गाठणारच आहे ना ! मग त्याचं आजच स्वागत का करीत नाहीस ? तुला जीवनाच्या जंजाळातून मुक्त करण्याच्या उदात्त हेतूनं मी तुझा पाठलाग करीत असतानाच तू पळून जाणं हा भ्याडपणा नव्हे का ? म्हणून म्हणतो मित्र, 'आलिया भोगासी असावे सादर' हे संतवचन लक्षात ठेव. तुझा देह मला समर्पित कर. मृत्यूचं स्वागत कर. नाहीतरी जीव जगवण्यासाठी तुला जी प्रचंड धडपड करावी लागते त्यात कसलं बरं स्वारस्य आहे ? जगणं कष्टाचं असतं. मरणं मात्र सुखाचं असते. सर्व प्रकारच्या विवंचनातून अनायासे मुक्त होण्याची संधी चालून आली असताना तिचा अव्हेर करणं हे घोर अज्ञानाचं लक्षण आहे. तू गीता वाचलेली दिसत नाही. आत्मा अमर आहे. देहाची

वस्त्रं बदलून आत्मा नवीन वस्त्रं धारण करतो. म्हणून हे वस्त्र आता तू टाकून दे. त्याबाबतीत मी तुला विनामूल्य मदत करीन. मृत्यू हा जीवाचा सर्वात मोठा उपकारकर्ता असतो. तुला केव्हा एकदा कडकडून भेटेन असं मला झालं आहे. माझ्या व्याकुळ मनाला शांत करण्याचं पवित्र धर्मकार्य करून ईश्वरचरणी विलीन हो.'

दूर अंतरावरून हरिणानं संत लांडगेमहाराजांचा हा सात्विक उपदेश ऐकला. हरीण म्हणालं, 'महाराजांचा उपदेश फारच परिणामकारक आहे. आत्मा अमर आहे. आत्मा अमर असल्याचं मी गीतेत वाचलं आहे. आणि माझ्या शरीराचं वस्त्र अद्यापि चांगलं मजबूत आहे. जाणूनबुजून आत्मघात करण्यात मला तरी शहाणपणा आढळत नाही. तुमच्या दृष्टीनं तो शहाणपणा असेल तर तुम्ही स्वत:च वाघाच्या गुहेत का जात नाही ? भुकेल्या वाघाचं समाधान करण्याचं पुण्यतरी तुम्हाला लाभेल. शिवाय देहाचं वस्त्र बदलण्याची संधीही मिळेल. नाहीतरी जगण्यासाठी, पोट भरण्यासाठी या रानावनात तुम्हाला वणवण भटकावं लागतं. कधीकधी उपासमारही होते. ही सगळी दु:खं सहन करण्यापेक्षा पलीकडल्या विहिरीत उडी टाकली की, क्षणार्धात तुम्ही स्वर्गाला पोहोचाल. इथल्या उपासमारीपेक्षा तिथं अमृताचं सेवन करीत मुक्तीचा आनंद तुम्ही घेत राहाल. तुमच्याप्रमाणेच मीही संतांचे अभंग वाचले आहेत. तुकोबांचा एक अभंग म्हणतो. तेवढा नीट ऐकून घ्या आणि विचार करा.'

**'वाघे उपदेशिला कोल्हा । सुखे खाऊ द्यावे मला ।।**
**अंती मरसी ते न चुके । मज ही मारितोसी भुके ।।**
**येरु म्हणे भला भला । निवाड तुझ्या तोंडे जाला ।।**
**देह तंव जाणार । घडेल हा उपकार ।।**
**येरु म्हणे मनी । ऐसे जावे समजोनी ।।**
**गाठी पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ।।'**

जीवन जगत असतांना मनावर मृत्यूच्या स्मरणाची काळी सावली सदैव पडलेली असावी असा अर्थ 'स्मरण असावे मरणाचे' या वचनाचा मुळीच नाही. जीवनाप्रमाणंच मृत्यू हेही एक अटळ सत्य आहे. याचा बहुसंख्य लोकांना विसर पडत असतो. अमर्याद सत्ता, प्रचंड संपत्ती, वासनेचा अखंड पाठलाग, उपभोगाचा विलक्षण अतिरेक या गोष्टीत माणूस वाहवत जातो. त्याच्यात विवेक आणि संयम यावा, भोगाबरोबर त्यागातलं आणि सेवेतलं सामर्थ्य त्याला कळावं यासाठी संतांनी मरणाचं स्मरण ठेवावं असं म्हटलं आहे. रात्रंदिवस मरणाचं चिंतन करण्यात आयुष्य

घालवावं असा त्याचा अर्थ नाही. ज्या संत महंतांनी हा विचार मांडला त्यांचं आयुष्य कर्तव्याचं उजळलेलं होतं. ते काही मरणाचा धावा करीत नव्हते. जीवनाला मरणाचं कुंपण असतं ही जाण माणसाच्या मनात निर्माण झाली म्हणजे जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंतच आपल्याला कर्तव्य करण्याची संधी आहे. उद्याचा भरवसा नसल्यामुळे आजचा दिवस आळसात आणि ख्याली खुशालीत फुकट घालवू नये. क्षुद्र मोहाच्या पाठीमागे लागून आयुष्य उधळून टाकू नये या उद्देशानं मृत्यूचंही स्मरण चित्तात ठेवावं लागतं.

रॉबर्ट फ्रॉस्ट या कवीनं म्हटलं आहे, 'या गहन हिरव्यागार उद्यानात सृष्टीच्या सौंदर्याला बहर आला आहे. इथंच थांबावं असं मनात येतं. पण मला थांबता येणार नाही. अखेरची विश्रांती घेण्यापूर्वी आणखी कित्येक मैलांची वाटचाल मला केली पाहिजे. मी दिलेल्या अभिवचनांची पूर्तता करण्यासाठी मला चालतच राहिलं पाहिजे.' या कवितेत मृत्यूची स्वाभाविक जाणीव आहे. पण जीवनातल्या ध्येयवादाचा प्रयत्न आणि पुरुषार्थाचा उद्घोष ही आहे. एका कर्तव्यनिष्ठ रसिक मनाचे जाणीवसंपन्न उद्गार आहेत.

त्या आंब्याच्या झाडाखाली बसलेल्या प्रेमिकांना जर विचारलं तर तेही म्हणतील, 'मृत्यू येणारच असेल तर येऊ द्या. आमचे हात एकत्र गुंफलेले आहेत. आमच्या आयुष्याचे धागे आता परस्परांत जुळलेले आहेत. माझ्या सुंदर मनाचं प्रतिबिंब हिच्या डोळ्यात आणि तिच्या सुंदर मनाचं दर्शन हिला माझ्या डोळ्यांत जोपर्यंत दिसत आहे, जोपर्यंत आमच्या हृदयाच्या वीणेवर प्रीतीचे सूर निघत आहेत तोपर्यंत मरणाची पर्वा कशासाठी ? केव्हातरी ते येईल, पण आज तरी प्रेम जीवनाची मैफल मस्त रंगत चालली आहे. मरणालाही आम्ही जीवनाचं गाणं गायला लावू.'

मला वाटतं प्रेमिकांना - मग ते कोणत्याही क्षेत्रातले प्रेमिक असोत, कुणी कलेचे, कुणी ध्येयाचे, कुणी धर्माचे किंवा कुणी क्रांतीचे असोत त्यांनाच जीवनाचा आणि मृत्यूचा अन्वयार्थ लावता येतो. ज्यांना जीवन कळतं त्यांनाच मरण ही कळतं जीवनाचं गाणं उत्कट सुरांत गात राहावं. गाता गाता ते समजतं.

●●●

# एका स्वातंत्र्य सैनिकाचे अश्रू ....

वयाची पंच्याऐंशी वर्षे उलटून गेलेल्या, शरीराने थकलेल्या पण विचार आणि भावना याचं तारुण्य जतन करून ठेवलेल्या एका निःस्वार्थी देशभक्ताची कांही निमित्तानं त्याच्या घरी जाऊन मी भेट घेतली. इंग्रज साम्राज्यशाहीविरूद्ध लढण्यासाठी तो सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेत सामील झाला होता. नाना प्रकारच्या हाल अपेष्टांना त्यानं धैर्यानं तोंड दिलं होतं. स्वातंत्र्याच्या कल्पनेनं त्या काळात झपाटलेल्या आणि सर्वस्वाचा हसत हसत होम करू शकणाऱ्या तरुण पिढीचा तो प्रतिनिधी होता. त्याच्या प्रपंचाची वाताहत झाली होती. पण तरीही 'ये जिंदगी है कौमकी, तो कौमपे लुटाये जा, कदम कदम बढाये जा' हे ज्वलंत देशभक्तीचं गीत बेभानपणानं गात गात एक सैनिक म्हणून शिस्तबद्ध पावलं टाकीत तो निघाला होता. आपल्या त्या ओसंडून वाहाणाऱ्या उत्साहाचं वर्णन करताना तो मला म्हणाला,

'स्वातंत्र्यासाठी जगायचं आणि स्वातंत्र्यासाठीच मरायचं.' हा आमच्या जीवनमरणाचा एकमेव हिशेब होता. 'वंदेमातरम्' या शब्दानं आम्हा हजारो सैनिकांच्या अंगावर तरारून रोमांच उभे राहात होते. स्वातंत्र्याचा वारा प्यालेले आम्ही सारेजण इतर कोणत्याही तुच्छ गोष्टीचा विचार करीत नव्हतो. गंगा, यमुना आणि सिंधूसारख्या पावन नद्या ज्या भूमीतून वाहतात, हिमालयासारखा देवातात्मा पर्वतराज ज्या भूमीवर हजारो वर्षे रक्षणकर्त्यांच्या भूमिकेत उभा आहे त्या भूमीवर परदेशी लोकांचं राज्य असावं ही कल्पनाच आम्हाला सहन होण्यासारखी नव्हती. आमच्या हातात बंदुका होत्या. क्षात्रतेजात आम्हीही उणे नाही. रणांगणात रक्त सांडून आणि प्राण वेचून हा देश स्वतंत्र करायचाच हा विचार रक्ताच्या प्रत्येक थेंबात रुजला होता. ते दिवस वीरश्रीचे होते. उन्मादाचे होते. राष्ट्रदेवतेच्या चरणावर आमच्या जीवनाची फुलं उधळण्याचे होते. आता त्या दिवसांची मला पावलोपावली आठवण मात्र होते. राहून राहून एक जळतं दुःख सतत डागण्या देतं. जे स्वातंत्र्य आमच्या स्वप्नात होतं आणि आज ज्या स्वातंत्र्यात आम्ही वावरत आहोत त्या दोन्हीत जमीन अस्मानाचं अंतर आहे. आज जी काही अवस्था आहे तिच्यासाठी

लक्षावधी लोकांनी आपलं बलिदान केलं का ? माझं दुर्दैव म्हणुन मी या आजच्या स्वातंत्र्याच्या वातावरणात जिवंत राहिलो. हे कसलं स्वातंत्र्य ? स्वातंत्र्याचं आज भयानक विडंबन चाललेलं मी पाहतो आहे. दोन विदेशी दारूच्या उंची बाटल्या दिल्या की इथले अधिकारी शत्रूराष्ट्राला गुप्त फायली देऊन टाकतात. लाखो रुपये तोंडावर फेकले की तुरूंगाचा अधिकारी राष्ट्रद्रोही कैद्यांना पळून जायला मदत करतो. सत्तेच्या खुर्चीवर जाऊन बसलेले स्वार्थपूजक आपल्या भ्रष्टाचारी हातांनी कोट्यावधी रुपयांच्या इस्टेटी थाटतात. गरीब जनता लाचारीनं जगत आहे. इथले विद्वान भाड्याने मिळतात. गल्लीपासून राजधानीपर्यंत जी चित्रं दिसतात ती पाहिल्यानंतर याच स्वातंत्र्यासाठी आपण झगडलो काय या विचारांच्या शेकडो इंगळ्या काळजाला डसत राहतात. परवा एक डबल ग्रॅज्युएट झालेला सुशिक्षित तरुण मला म्हणाला, 'म्हातारबाबा, माझी दिल्लीपर्यंत ओळख आहे. मी तुम्हांला स्वातंत्र्य सैनिकाला मिळणारी पेन्शन मिळवून देतो. फक्त पंचवीस हजार रुपये दक्षिणा द्यावी लागेल.' माझ्या नातवानं इथल्या एका नामांकित शाळेत मास्तरच्या जागेसाठी अर्ज केला होता. चाळीस हजार रुपये दिले तरच या जागेचा विचार करू असं तिथल्या संचालकानं माझ्या तोंडावर सांगितलं. मागच्या पंधरा ऑगस्टला मात्र मला झेंडावंदनाला त्यांनी बोलावलं होत. 'असे स्वातंत्र्यसैनिक हीच आमच्या राष्ट्राची संपत्ती आहे,' असं ते संचालक म्हणाले होते. स्टेजवरची भाषणं वेगळी. आणि स्टेजवरून उतरल्यानंतरचा व्यवहार वेगळा.

'मी माझ्या वैयक्तिक दु:खानं चिडून बोलत नाही. आम्ही फार दु:ख भोगली. त्याचं भांडवल करून जगण्याची माझी मुळीच इच्छा नाही. पण या देशाचं काय होणार ? आणि कसं होणार ? ही चिंता मला रात्रंदिवस पोखरून काढते आहे. लोक गांधी, नेहरू, सुभाष, सावरकर, टिळक यांना पार विसरले. सगळ्यांचे पुतळे बसवले. देशाची शान आणि अभिमान आज तुम्ही लोकांनी गहाण टाकला. लोचटांच्या बाजारात किंवा बाजारीवृत्तीच्या लोचटांच्या मेळाव्यात या देशाच्या पवित्र संस्कृतीचे आणि स्वातंत्र्याचे धिंडवडे काढीत आहात. या दुर्जनांना समजेल अशा भाषेत कुणी बोलू शकत नाही. अरे, हा देश त्याकाळी मेंढरांचा नव्हता. तो वाघांचा होता. इंग्रजालाही इथल्या लोकांची त्याकाळी मनात जबरदस्त भीती वाटत होती. होत्याचं नव्हतं झालं. रात्र संपून गेली तरी उजाडत नाही. मला वाटत असलेल्या या दु:खाचं गांभीर्य कुणाच्या लक्षातच येत नाही. बोलून तरी काय

उपयोग ?'

त्या वृद्ध, नि:स्वार्थी, प्रामाणिक, राष्ट्रभक्त स्वातंत्र्य सैनिकाच्या डोळ्यांत अश्रू आले होते. दु:खावेगानं त्याचं अंग थरथरत होतं. त्याच्या बोलण्यातली तळमळ त्याच्या प्रत्येक अक्षरातून मला जाणवत होती. त्यांचं दु:ख हे त्याच्या राष्ट्रप्रेमाचं द्योतक होतं. या दु:खाचा अर्थ आणि त्याचं महत्त्व समजून घेण्याची वृत्ती आज दुर्मिळ झालेली दिसते. त्या स्वातंत्र्य सैनिकाचा त्याग आता कुणाला आठवत नव्हता.

सहज माझ्या मनात विचार आला. पारतंत्र्याची रात्र पन्नास वर्षापूर्वी संपून गेली ही एक ऐतिहासिक घटना आहे. पण आमच्या हजारो देशभक्तांनी ज्या स्वातंत्र्याची गीतं बेहोषपणानं गायिली त्या स्वातंत्र्याची पहाट अजून तरी झालेली दिसत नाही. कदाचित अंधार अधिकच गडद होत चालला. पंजाब, काश्मीर, आसाम या प्रदेशात नेमकं काय चाललं आहे ? काश्मीरमध्ये तर भारताचा राष्ट्रध्वजही उभारला जात नाही. हे कोट्यावधी भारतीयांनी सहन करायचं का ? या प्रश्नांना नेमकी उत्तरं नाहीत. त्या वृद्ध स्वातंत्र्य सैनिकाच्या मनाचा क्षोभ अत्यंत योग्य आहे. त्याचं क्षुब्धपण मला अभिमानास्पद वाटतं. क्षुब्ध होण्यासाठी अंत:करण जिवंत असावं लागतं. मेलेल्या मनाच्या मुर्दाड माणसांना स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांचा अर्थच कळत नाही. कष्ट न करता, लाचलुचपतीच्या मार्गानं पैसा मिळविण्यासाठी एखादी खुर्ची लांगूलचालनानं मिळाली की जीवनात साधण्यासारखं यांच्यादृष्टीनं दुसरं काहीच उरत नाही. स्वातंत्र्याचा त्यांच्या दृष्टीनं हाच परममंगल साक्षात्कार आहे.

एक बडे अधिकारी आपल्या लाडक्या पुत्राला उपदेश करीत होते. योगायोगाने मी त्या अधिकारी महाशयांच्या दिवाणखान्यात बसलो होतो. त्यांचे माझे व्यक्तिगत संबंध सर्वसाधारण स्नेहाचे होते. ते आपल्या सुपुत्राला म्हणाले,

'बी. ए. च्या परीक्षेतला तुझा कोणता पेपर वाईट गेला ते आत्ताच सांगून टाक. मी माझ्या पातळीवरून प्रयत्न करतो. या प्रोफेसरांनाही ते जमणार नाही. व्हाईस चॅन्सलर मला परवादिवशी भेटणारच आहेत. आता त्याला पुन्हा तीन वर्ष मुदतवाढ पाहिजे ना ! तुला मेरिट लिस्टमध्येच आणायला सांगतो. लक्षात ठेव. तुला माझ्याप्रमाणचं आय. ए. एस. व्हायचं आहे. उगीच कुठल्यातरी सामाजिक आणि राजकीय चळवळीत पडू नकोस. ती देशभक्तीची गाणी वगैरे ऐकायला ठीक

असतात. त्या गाण्यांनी कुणाचंच पोट भरत नाही. लिहिणाऱ्यांचंही पोट उपाशीच राहिलं. माझ्याप्रमाणं तुला अेफिशियंट ॲडमिनिस्ट्रेटर व्हायचं आहे. व्यवहाराचं ज्ञान महत्त्वाचं. संस्कृती, देश, देव, धर्म या सगळ्या फावल्या वेळच्या गौण गोष्टी आहेत. समजलं ?'

मी हसून म्हणालो, 'सेक्रेटरीसाहेब, तुमच्या या तत्त्वज्ञानातलं मला तरी कांही कळलं नाही.'

'ते तुम्हाला कळणं शक्यही नाही. राष्ट्रवाद, ध्येयनिष्ठा, सामाजिक जाणीव असल्या शब्दांची पोपटपंची करणाऱ्यांना माझे विचार कसे कळणार ? आयुष्यात पॉवर आणि पोझिशन मिळवावी. ती सरळ मार्गानं मिळत नसते. सुखानं जगण्यासाठी हे करणं भाग आहे. 'बी. अे. प्रॅक्टीकल मॅन.'

हा बडा अधिकारी सर्वार्थांनी 'यशस्वी' होता. त्या स्वातंत्र्यसैनिकाला मात्र आज कुणीही ओळखत नव्हतं. स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्यांनी कधी चुकूनही भाग घेतला नव्हता पण आपण स्वातंत्र्य सैनिक आहोत असं ज्यांनी 'येन केन प्रकारेण' सरकार दरबारी सिद्ध केलं होतं त्यांना दरमहा मानधन मिळत होतं. हा सच्चा स्वातंत्र्य सैनिक मात्र देशाच्या परिस्थितीबद्दल हळहळत होता. ही परस्परविरोधी चित्रं अस्वस्थ करणारी आहेत. गेल्या पन्नास वर्षात राष्ट्रीयतेची जाणीव हळूहळू कशी विझत चालली हे आम्ही सर्वजण उघड्या डोळ्यानी पाहात आहोत. गांधींचा जयजयकार करणाऱ्या आजच्या तथाकथित गांधी भक्तांना गांधीजींचं चरित्रही नीटसं माहीत नाही. गांधी असोत, शिवाजी असो की आंबेडकर असोत निवडणुकीचा डाव जिंकण्यासाठी या हुकुमी पानांचा उपयोग करून घेण्यासाठीच यांची नावं उच्चारली जावीत याचा खेद वाटतो. हे आमचे वंदनीय नेते दैवतासमान आहेत. दैवत हे प्रेरणेसाठी असतं. त्यांच्याकडून स्फुरण घेण्याचं काममात्र व्हावं तसं झालं नाही.

कालच्या स्वातंत्र्यसैनिकाला समाज ओळखत नाही. यात कसलं आश्चर्य? कारण आम्ही व्यावहारिक जीवनात तरुणपिढीमुळं ठेवलेले आदर्श सत्तावंतांचे आहेत. प्रतिभावंतांचे आणि त्यागी राष्ट्रभक्तांचे आदर्श तरुणांसमोर आहेत कुठे ? गावचा प्रमुख पुढारी दोन-चार दारुचे अड्डे लावतो. वाटेल त्या वेड्यावाकड्या वळणानं जाऊन त्यानं संपत्ती जमा केलेली आहे हे साऱ्यांना माहीत असतं. सकाळच्या वेळी केव्हातरी शिक्षक दिनाच्या दिवशी शिक्षकांचा गौरव करण्यासाठी

त्याला शाळेत आमंत्रित केलेलं असतं. पण सकाळच्या वेळीसुद्धा 'पावशेर घेऊनच' हे ग्रामनेते आलेले असतात. शाळेतल्या पोरासोरांनासुद्धा हे माहित असतं. पण ते आल्याबरोबर फाटकात हेडमास्तर त्यांच्या स्वागतासाठी उभे असतात. हात जोडून आणि हार घालून या आदरणीय विभूतीचं स्वागत केलं जातं. 'शिक्षक कसा असावा' या विषयावर पुढारी महोदय आपले मौलिक विचार प्रकट करतात. ज्ञान आणि चारित्र्य या दोन गोष्टींची शिक्षकाला जरूर असते. हे त्यांच्या भाषणाचे मुख्य सूत्र असते. आता या आदर्श व्यक्तीचा शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यावर नेमका काय परिणाम होणार ? ज्ञान आणि चारित्र्य हे कोणते पदार्थ आहेत आणि त्यांची लागवड कुठे केली जाते याची लेशमात्रही जाणीव नसलेल्या लोकांच्या हातात ज्ञान आणि चारित्र्य ही मूल्यं सापडली आहेत.

ज्ञान राहू द्या. पण शिक्षणसुद्धा स्वातंत्र्योत्तर काळात एक चैनीची गोष्ट होऊन बसली आहे. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात लाख रुपये भरल्याशिवाय शिक्षण मिळत नाही. देवाच्या दर्शनाला सुद्धा शंभर-दोनशे रुपये दिल्याशिवाय रांगेत नंबर मिळत नाही. बिचारे देवसुद्धा व्यापाऱ्यांच्या पंजात सापडून असहाय्य झाले आहेत. अशा देशात राष्ट्रीय चारित्र्याची जाणीव वाढीला लावणं हे एक आव्हान होऊन बसलं आहे. सामान्य चपराशापासून वरिष्ठतम व्यक्तीपर्यंत जेव्हा सारेच केवळ संपत्तीच्या भोवती फेर धरून नाचतात तेव्हा राष्ट्राचं स्वातंत्र्य, त्याची अस्मिता, त्याची परंपरा या गोष्टींना कोणताच अर्थ उरत नाही. आपलं राष्ट्रगीत कुणी लिहिलं हे सुद्धा माहीत नसलेली कितीतरी पदवीधर माणसं दिसतात. त्या स्वातंत्र्यसैनिकाचं म्हणणं मला आठवतं आणि मी उदास होतो. आमच्या देशातल्या कित्येक शाळांत राष्ट्रगीतच म्हटलं जात नाही अशी धक्कादायक माहिती लोकप्रतिनिधींच्या समोर ठेवण्यात आल्याचं मी वृत्तपत्रांतून वाचलं होतं. यावर सरकारनं कोणती उपाययोजना केली. हे मात्र कळलं नाही. कदाचित कळलं नाही हेच ठीक आहे. कारण त्यामुळं कठोर उपाययोजना केली असावी आणि त्या शाळांतून आता सामुदायिकरीत्या राष्ट्रगीत म्हटलं जातं असा गोड गैरसमज करून घेणं शक्य आहे.

त्या वृद्ध स्वातंत्र्यसैनिकाच्या डोळ्यांतून वाहाणाऱ्या अश्रूंकडे पाहून एक प्रकारची अगतिकता आणि नैराश्य मनाला वेढून राहते. परिस्थिती निश्चितच भयावह आहे. पण इतिहासाचं भान असणाऱ्या लोकांनी वैफल्यातून काही निष्कर्ष काढू

नयेत. अजूनही क्षीण ज्योत जळत आहे. दुर्गंध पसरला तर आपल्यापरीनं आपल्या सामाजिक आणि राष्ट्रीय भावनेची एक उदबत्ती पेटवून सुगंधाची निर्मिती करता येईल. आमच्या देशात राष्ट्रीयत्व, सामाजिक जाणीवा अजूनही थोड्याफार कुठेतरी धगधगत आहेत. या जाणीवा जागवण्याचा आणि पेटवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. तुम्ही आम्हीच तो केला पाहिजे. जमेल त्या माध्यमातून लोकोत्तर गुणांची आणि गुणवंतांची, राष्ट्रीयत्वाची, ध्येयवादाची पूजा करीत राहिलं पाहिजे. हा भाबडा आशावाद नाही. मेंढरांनी कितीही धुमाकूळ घातला तरी एक सिंहगर्जना पुरेशी असते. हिडीस स्वार्थाचे आणि भ्रष्टाचाराचे, राष्ट्रविरोधी विचारांचे वारे सुटले तरी त्यांना अडवणारी प्रखर स्वातंत्र्यप्रेमाची आणि राष्ट्रीय वृत्तीची शक्ती जन्माला घालवण्यासाठी आमचे वत्सल हात उपयोगात आणले पाहिजेत. त्या स्वातंत्र्यसैनिकाचे अश्रू मोलाचे आहेत. त्याच्यासारख्या असंख्य सैनिकाचं झालेलं बलिदान विफल ठरणार नाही असा बुलंद आशावाद भारतातल्या लक्ष लक्ष तरुणांच्या मनात जागवण्यासाठी प्रत्येकालाच आपल्या हृदयातील पणती पेटवून घ्यावी लागेल. कुणी टीकाकार म्हणेल, 'हे नुसते अलंकारिक शब्द आहेत. हे केवळ शब्दरंजन आहे.' त्यांना मी इतकंच सांगेन, राखेच्या ढिगातून जर्मनी उभा राहिला. होरपळून गेलेला आणि लोळागोळा होऊन पडलेला जपान पुन्हा आपल्या पायावर कणखरपणानं उभा राहिला. जिथं वाळवंट होतं तिथं नवं राष्ट्र निर्माण झालं. या भारताचे काही दुष्ट शक्तींनी लचके तोडले असले तरी जागृत होण्याची एक सुप्त उर्मी त्याच्या धमन्यांतून वाहते आहे. तीच हे परिवर्तन घडवू शकेल. कदाचित त्या वृद्ध स्वातंत्र्यसैनिकाला ते पाहाता येणार नाही. पण उद्याच्या भारतात या परिवर्तनाची संपन्न चित्रं पाहायला मिळतील आणि सस्यशामल भारताला अभिमानानं वंदेमातरम् म्हणणारा भारतीय माणूस दिसू लागेल. यापेक्षा मी अधिक काय सांगणार ?

**वन्हि तो चेतवावा रे। चेतविताचि चेततो।**

●●●

# हे कसले कलावंत ?

आमच्या हिंदी चित्रपट सृष्टीतल्या काही नट-नटींच्या भोवती लोकप्रियतेचं एक झगमगीत वलय आहे. या नटनटींचं अंधानुकरण करण्यात तरुणवर्ग धन्यता मानतो. नटाप्रमाणे केस वाढवणं, त्याच्यासारखा आविर्भाव करणं, त्याच्याप्रमाणं ओठात सिगरेट ठेवून ती लायटरनं पेटवणं, त्याच्या सुरात नाटकी किंवा अतिनाटकी पद्धतीचं बोलणं, शीळ घालणं, असल्या हास्यास्पद नकला करण्यात कृतार्थता मानणारे तरुण मी पाहिले आहेत.

एकदा बी. ए. च्या वर्गात मी तास घेत असताना एक विद्यार्थिनी कुठल्यातरी विशिष्ट नटीप्रमाणं केस मोकळे सोडून आणि ओठ भलतेच रंगवून वर्गात मुद्दामच उशीरानं प्रवेश करू लागली. वर्गातल्या सर्व मुलामुलींच लक्ष तिनं आपल्या बटबटीत वेशभूषेनं वेधून घेतलं होतं. आपण सर्वांच्या आकर्षणाचा विषय बनलो आहोत हे तिच्या लक्षात आलं होतं. खोट्या लाडिक स्वरात, 'मे आय कम् इन सर ?' असं तिनं ओठांचा चंबू करून विचारलं. ही अ‍ॅक्शनसुद्धा कुठल्यातरी सुमार नटीपासून तिनं उचलली असावी. त्या नटीची आपण सही सही नक्कल करू शकतो. किंबहुना आपण हुबेहुब त्या नटीप्रमाणे दिसतो याबद्दल तिला भूषण वाटत असावं. मला तरुण-तरुणींच्या अनुकरणप्रवृत्तीवर टीका-टिप्पणी करायची नाही. आपण सुंदर आणि आकर्षक दिसावं, इतरांवर आपल्या व्यक्तिमत्वाची छाप पडावी ही इच्छा मला चुकीची वाटत नाही, पण अनुकरणाचे विषय खरोखरच सुंदर असावेत. तुम्ही कुणाचं अनुकरण करता यावरून तुमच्या योग्यतेचा बोध होऊ शकतो. त्या विद्यार्थिनीला मी गंभीर मुद्रेनं म्हणालो,

'मॅडम, आपण पत्ता चुकलात, हे कॉलेज आहे. बी. ए. चा वर्ग चालू आहे. अभ्यासू विद्यार्थी-विद्यार्थिनी इथं शिकण्यासाठी येऊन बसलेली आहेत. तुमच्या फिल्मचं शूटिंग दुसरीकडं होणार असेल. वर्गात येऊन बसण्यासाठी हा फिल्मी पोशाख चालत नाही.' ती विद्यार्थिनी खाली मान घालून निघून गेली. मी कांहीसा कठोर बोललो हे खरं. पण ते आवश्यक होतं. सिनेमा, नाटकांचा तरुण मनावर प्रभाव अधिकांशानं पडतो हे मान्य करुन सुद्धा आपण एखाद्या नट-नटीची

कार्बन कॉपी बनण्यात काय शहाणपणा आहे ? चांगल्या कलावंतांचं विशिष्ट मर्यादेपर्यंत आणि योग्य ते तारतम्य ठेवून अनुकरण करण्यात गैर काही नाही. पण केव्हातरी अनुकरणाची दुय्यम दर्जाची भूमिका सोडून आपली स्वत:ची वाट शोधली पाहिजे. राजकीय जीवनातसुद्धा कांही तिय्यम दर्जाचे लोक आपल्या पुढाऱ्याचं अंधानुकरण करीत असतात. यशवंतराव चव्हाण डोक्यावर तिरपी टोपी घालायचे आणि आपल्या जाहीर भाषणात 'पाहिजेल, आहे' असा शब्दप्रयोग करायचे म्हणून गल्लीतले पुढारीसुद्धा तशाच प्रकारची टोपी घालून चव्हाणांच्या शैलीत बोलायचे. यापेक्षा अधिक उच्च पातळीवरचं अनुकरण त्यांना करणं शक्य नव्हतं. यशवंतरावांची टोपीची पद्धती समजणाऱ्यांना त्यांच्या डोक्याचं मात्र आकलन होत नव्हतं.

एकदा तमाशाचा एक प्रयोग रंगत होता. किसन कुसगावकर नावाचा कल्पक, हुशार, विनोदी, सोंगाड्या आपल्या विनोदानं प्रेक्षकांना हसवीत होता. कुणीतरी वेडा प्रेक्षक उठून उभा राहिला आणि त्यानं ऐटीत फर्मावलं की, 'जॉनी वॉकरप्रमाणं (जॉनी वॉकर हे एका विनोदी नटाचं नाव. यातून दुसरा अर्थ 'रसिकांनी' काढू नये) डायलॉग म्हणून दाखवा. म्हणजे तुम्ही चांगले नट आहात असं मी समजेन' किसन कुसगावकर भलताच भडकला. त्याची अस्मिता जागृत झाली. तो म्हणाला, 'कोण जॉनी वॉकर ? मी वळखीत न्हाई त्येला. त्येनंच माझ्यासारकं काम करून दाखवावं. मी कुणाची नक्कल करीत न्हाई. मी नावाचा किसन कुसगावकर हाय. आपलं खरं नाव बदलून इलायती नाव घेणाऱ्याची मातब्बरी मला सांगू नका. ह्यो अस्सल मराठमोळा तमाशा हाय.' तमाशा पाहणाऱ्या प्रेक्षकांत त्यावेळी मीही होतो. त्या संबंध तमाशात किसन कुसगावकरचं हे बाणेदार उत्तर मला फार आवडलं. त्याच्या उत्तराला टाळी वाजवून मी दाद दिली. शक्य असतं तर शीळही घातली असती आणि डोईवरचा फेटा उंच उडवला असता. मी कुणासारखा तरी असण्यापेक्षा मी माझ्यासारखा असणं हेच अधिक श्रेयस्कर असं वाटलं पाहिजे.

सिनेमा, नाटकातले काही नट आणि नटी उत्तम दर्जाचे कलावंत असतात यात शंका नाही. पण काही भिकार चित्रपटात ठराविक ठशाची कामं करून सवंग लोकप्रियता मिळवणाऱ्या सामान्य दर्जाच्या नटनटीला 'कलावंत' समजण्यात काय अर्थ आहे ? आणि असले नट-नटी जेव्हा देशभक्तीचा आव आणून लांबलचक गप्पा मारू लागतात. तेव्हा तर माझीचांगलीच करमणूक होते. एकदा मुंबईत एका लोकप्रिय नटीचं (कुणीतरी लिहून दिलेलं) व्याख्यान ऐकण्याचा कुयोग आला.

प्रचंड गर्दी झाली होती. त्या नटीचं व्याख्यान चांगलंच 'प्रेक्षणीय' होतं. एका इंपोर्टेड एअरकंडिशंड गाडीतून ती महान नटी खाली उतरली. तंग कपड्यातल्या त्या अभिनेत्रीनं चेहऱ्याची बरीच रंगरंगोटी केली होती. केसांच्या काही बटा कपाळावर याव्यात अशी जाणीवपूर्वक दक्षता तिनं घेतली होती. तिच्या मनगटावरचं घड्याळ बहुधा परदेशी बनावटीचं होतं. हातातली पर्ससुद्धा लंडन किंवा पॅरिसमध्ये खरेदी केलेली असावी आणि ही बाई देशभक्तीबद्दल काही संदेश देणार होती. ती म्हणाली,

'माय डियर फ्रेंडस्, वुई आर ऑल इंडियन्स, ये हमारा इंडिया है. हमारा कल्चर और ट्रॅडिशन्स बहोत हायक्लास है. अेन्शंट कल्चरका हमे ख्याल रखनेका है, हमारे प्राअीम मिनिस्टर....' इथं बाईसाहेब थोड्या अडखळल्या. कारण प्राईममिनिस्टरचं नाव त्यांना आठवेना. पण त्या हुशार होत्या. स्वत:ला सावरून घेत त्या बोलल्या. प्राईममिनिस्टरका अॅडव्हाईस बहोत इंम्पोर्टेड है। हमारा नेशन ग्रेट है। इंडिया इज ग्रेट। बोलो जय हिंद। बाईनी ओठावरून आपला हातरुमाल हलकेच फिरवला. लिपस्टिक विस्कटू नये म्हणून त्या सावध होत्या. इंडिया ग्रेट आहे असं महान तत्त्वज्ञान सांगून त्या खाली बसल्या. हजारो श्रोत्यांना (प्रेक्षकांना) पडद्यावरची आपली आवडती नटी पाहून धन्य धन्य वाटलं. टाळ्यांचा कडकडाट झाला. पुष्पगुच्छ देऊन तिचा गौरव करण्यात आला. तेव्हा ती लाडिक आवाजात 'थँक्यू' म्हणाली. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत ती उभी राहणार आहे अशी चर्चा ऐकली. कुणी सांगावं ! आपल्या विरोधकाचं डिपॉझीट जप्त करून ती निवडून सुद्धा येईल आणि एखाद्या खात्याचं मंत्रीपदही तिला मिळू शकेल. कारण आमच्या ग्रेट इंडियात हे घडू शकतं. लक्षावधी रुपयांचा इन्कमटॅक्स चुकवून आणि कोट्यवधी रुपये परदेशातल्या बँकांत ठेवून चित्रपटसृष्टीतले नट-नटी आम्हाला देशभक्तीचे धडे देऊ शकतात. 'इंडिया इज ग्रेट' म्हणणाऱ्या नटनटींनी इंडिया कितपत पाहिला आहे ? या देशातली जीवनपद्धती त्यांना माहीत आहे काय ? शूटिंगसाठी कृत्रिम पद्धतीनं उभ्या केलेल्या नकली झोपडपट्टीपलीकडं खऱ्या-खुऱ्या झोपडपट्ट्या फाईव्हस्टार हॉटेलमध्ये पार्टी 'अटेंड' करण्याच्या 'राष्ट्रीय' कामगिरीत गुंतलेल्या नटनट्यांनी कधी पाहिल्या आहेत काय ? हिंदुस्थानात जन्मलेल्या पण पाश्चात्य रीतीरिवाजात आणि संस्कृतीत वावरण्यात अभिमान बाळगणाऱ्या या लोकांना आपल्या गावाची आणि देशाची भाषा तरी नीट बोलता येते का ? पण यांना दोष देण्यात काय अर्थ आहे ? आम्ही प्रेक्षकांनीच यांना डोक्यावर घेतलं आहे. या

आमच्या हीरो - हिरॉईन्सचं अनुकरण आम्ही पावलोपावली करू लागलो. केवळ निवडणुकीतील विजयावर दृष्टी ठेवणाऱ्या पक्षांनी यांच्या दाराशी धरणं धरून पक्षाची तिकिटं दिली. राजकारणात, देशभक्ती, देशाची संस्कृती इथल्या परंपरा, इथल्या सामान्य माणसांचे प्रश्न याची काहीही माहिती नसलेल्या स्टार्स आणि सुपरस्टार्सना लोकप्रतिनिधींची निवडणूक लढविण्यासाठी गळ घालणाऱ्या पक्षपुढाऱ्यांचा हा दोष आहे. राष्ट्रीय निवडणूक निराळी आणि सिनेमाच्या पडद्यावरची सवंग लोकप्रियता वेगळी. याचं भान नसणाऱ्या जनतेनं या प्रकारच्या नटनटींना भरघोस मतं द्यावीत. हे दृश्य जितकं विनोदी तितकंच चिंताजनक आहे. याचा अर्थ चित्रपट कलावंतांना राष्ट्रीय जाणीव नसते किंवा त्यांना राजकीय, सामाजिक ज्ञान नसतं असा सर्रास आरोप मी करीत नाही. काही कलावंतांची उत्कृष्ट देशभक्ती आणि त्यांचा त्याग याबद्दल आमच्या मनात आदर आहे. एक चित्रपट दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणाला होता.

'माझे चित्रपट या देशाच्या संस्कृतीशी आणि इथल्या जीवनाशी सुसंगत असावेत हीच माझी धडपड आहे. कदाचित माझा बिझिनेस कमी होईल. पण माझ्या राष्ट्राच्या प्रकृतीशी सुसंगत असे भारतीय चित्रपट मला तयार करायचे आहेत. प्रदर्शित झालेले माझे चित्रपट या गोष्टीची साक्ष देतील.'

कोणत्याही क्षेत्रातला कलावंत असो, या देशाच्या मातीशी आणि माणसांशी, संस्कृतीशी एकनिष्ठ असला पाहिजे आणि त्याच्या कलेला माणुसकीचं अधिष्ठान असलं पाहिजे. आजचे बहुसंख्य चित्रपट पाहताना आणि त्यातल्या नटनटीचे विदूषकी, हिडिस अंगविक्षेप बघतांना याला अभिनय म्हणतात असं निदान शुद्धीवर असलेला कोणी मनुष्य म्हणू शकेल असं वाटत नाही. राष्ट्रीय वृत्तीचं तर दर्शन देखील क्वचितच एखाद्या चित्रपटात घडतं. चित्रपटांची नावंसुद्धा इंग्रजी ठेवण्याची टूम निघाली आहे. अर्थात नावाचा आणि चित्रपटाचा तसा फारसा संबंध कधी उपस्थित होत नाही. नाव कुठलंही असलं तरी काही बिघडत नाही. असल्या चतुर्थश्रेणीतल्या, निरर्थक, कलाशून्य चित्रपटात भूमिका करणारे साधारण कुवतीचे नट आज आमचे 'हिरो' होऊन बसले आहेत. सतरा-अठरा वर्षांच्या केवळ अंगप्रदर्शन, करण्यात कलेचं मर्म साठवलं आहे. अशा भ्रमात राहणाऱ्या काही दिवट्या पोरी आमच्या 'हिरॉईन्स' झाल्या आहेत. त्यांच्या खाजगी भानगडींबद्दल आमची कसलीही तक्रार नाही. कोणी किती लग्नं केली किंवा लग्नं केली नाहीत

याच्याशी आमचे काहीच कर्तव्य नाही. कलावंत या नात्यानं त्यांनी कलेची उपासना जन्मभर करावी. लोकमान्यता मिळवावी. संपत्ती मिळवावी पण आपल्या राष्ट्राशी आणि जनतेशी द्रोह करण्याचा नीचपणा मात्र करू नये. कोणत्याही क्षेत्रातल्या कितीही मोठ्या माणसानं असला अधम अपराध केला तर त्या अक्षम्य अपराधाची योग्य ती पावती त्याला मिळाली पाहिजे. कला निश्चित महान आहे. पण राष्ट्र महत्तम आहे. कला आणि राष्ट्रप्रेम यात कधी द्वंद्व निर्माण होण्याचं काहीच कारण नाही.

हे सर्व विचार मनात येण्याला एक जबरदस्त कारण घडलं. मुंबईत मागील महिन्यात पाकिस्तानच्या मार्गदर्शनाखाली काही देशद्रोही हरामखोरांनी अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणले. शेकडो निरपराधी लोकांची निर्घृण हत्या बेदरकारपणानं केली. हे करण्यात त्यांना या देशात अराजकाचं वातावरण निर्माण करायचं होतं. आपला राक्षसी बेत त्यांनी कपट कौशल्यानं रचला होता. या प्रकारात अनेक देशद्रोही व्यक्तींचा आणि भारताचा द्वेष करीत जळत राहणाऱ्या पाकिस्तानचा उघड उघड हात आहे हे आत्तापर्यंतच्या पुराव्यावरून सिद्ध झालं आहे. दाऊद इब्राहिमसारखा कारस्थानी स्मगलर या भीषण हिंसाचाराच्या मुळाशी असून हिंदी चित्रपटसृष्टीतले कित्येक नट-नट्या, निर्माते आणि दिग्दर्शक त्याचे मिंधे बनले आहेत. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्याच्या हालचालींची त्यांना कल्पना असावी. मुंबईत शस्त्रास्त्रांचा व स्फोटकांचा साठा ठेवण्यासाठी काहींनी मदत केली असावी असा पुरावा उपलब्ध होऊ लागला आहे. चित्रपट क्षेत्रातल्या या राष्ट्रद्रोही सोंगाड्यांना कायद्याचा बडगा शक्य तितक्या कठोरपणे दाखवला पाहिजे. यांच्यात नसलेल्या कलागुणांचं नको तितकं कौतुक करण्याच मूर्खपणा सिनेरसिकांच्या हातून आजपर्यंत झाला ही गोष्ट खरी आहे. गडगंज काळ्या पैशाच्या पायावर उभ्या असलेल्या या चंदेरी सृष्टीतले तारे आणि तारका यांना शुद्धीवर आणण्याची कायदेशीर कृती घडली पाहिजे. एखाद्या नट-नटीचा बापजादा खासदार किंवा बडा अधिकारी असला म्हणून आमच्या पोलीस खात्यानं त्यांच्या भयानक अपराधाकडं सौम्य दृष्टीनं पाहण्याची चूक करू नये. स्वत:ला कलावंत समजणाऱ्या या लोकांनी दाऊद इब्राहिमच्या ताटाखालचं मांजर व्हावं आणि त्यानं फेकलेल्या तुकड्यांवर अवलंबून राहावं. त्याच्या इशाऱ्याप्रमाणं नाचावं हा कलावंतांचाच अपमान आहे. बाकी हे कसले कलावंत ? यांच्याकडून कसली अपेक्षा करायची ? यांच्या देशविरोधी कारवायांमुळं सारी चित्रपटसृष्टी बदनाम व्हावी ही एक शोकांतिका आहे. वस्तुत:

चित्रपटक्षेत्रात कित्येक ध्येयनिष्ठ, तपस्वी वृत्तीचे कलावंत आहेत. त्यांच्या तपश्चर्येचं मोल अद्यापि जनतेला नीटसं कळलं नाही. अत्यंत रटाळ आणि गलिच्छ चित्रपटांना व भिकार नटांना लोकप्रियता मिळते याचा अर्थ आमची रसिकता अजून बाल्यावस्थेतच आहे. पण चित्रपटांच्या क्षेत्रातल्या या तथाकथित कलावंतांना खणखणीत इशारा द्यावसा वाटतो की, देशविघातक प्रवृत्तीशी, देशद्रोही कृत्याशी तुमचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असेल तर ज्या जनतेनं तुम्हाला डोक्यावर घेतलं ती जनता तुम्हाला पायदळी तुडवल्याशिवाय राहणार नाही. कलावंत म्हणून तुम्ही ज्या दर्जाचे असाल ते असाल ! पण प्रथम या भारत देशाचे निष्ठावान नागरिक तुम्ही असायला, हवे हे लक्षात घ्या.

●●●

# सुगंधी आत्मकथा

गेल्या आठवड्यात दुर्गाबाई देशमुख यांची प्रसन्न आणि प्रगल्भ आत्मकथा माझ्या वाचनात आली. ती वाचताना मनाला एक प्रकारचा उन्नत आनंद मिळाला. दुर्गाबाईंच्या संस्कारित व्यक्तिमत्वाशी जणू आपण संवाद करीत आहोत असंच मला वाटलं. स्वत:च्या जीवनाबद्दल लिहिताना आणि बोलताना प्रांजलपणा, विनय, स्वत:चा शोध घेण्याची तटस्थ वृत्ती हे गुण आवश्यक असतात. दुर्गाबाईंच्या जीवनकथेत या गुणांचा सुंदर संगम झाला आहे. सध्या कित्येक आत्मकथने दुसऱ्यांच्या निंदानालस्तीने आणि स्वत:च्या निर्लज्ज प्रशंसेनं भरलेली असतात. ज्याच्या आयुष्यात खरे तर काहीही सांगण्यासारखे नसते तो सुद्धा आपल्या दांभिकतेचं आणि आत्मगौरवाचं आपल्या लेखनातून जाहीर प्रदर्शन भरवतो तेव्हा त्याच्या रोगट मनोवृत्तीबद्दल कीव करण्यापलीकडे आपल्या हातात काही असत नाही. मानसिक विकृतीने पछाडलेल्या अशा आत्मचरित्रकारांची रवानगी इस्पितळात केल्याशिवाय गत्यंतर नाही. पण या ढोंगी लोकांबद्दलही दया दाखवावी असं माझं मत आहे. अतिरेकी आत्मगौरवाचे शब्द लिहून ते खरे तर स्वत:च्याच मनाची दारुण वंचना करीत असतात. 'जो जो वांछील तो ते लिहो' असं पु. ल. देशपांडे यांनी एका साहित्यिक व्यासपीठावरून सांगितलं होतं. आपल्याला वाटेल ते अवश्य लिहावं. पण 'वाट्टेल ते' लिहू नये. इतका विवेक लेखणी मजूरांना राहात नाही. हे भाडोत्री लेखकू चार घरी भीक मागून आणलेली उष्टी अक्षरे घेऊन स्वत:ची वरात काढतात. हे विचार मनात येण्याचे कारण इतकेच घडले की, सात-आठ दिवसापूर्वी दुर्गाबाई देशमुखांची प्रांजल जीवनकथा मी वाचली. आणि माझ्या मनात एक सौम्य, ताजा सुगंध भरून गेला. दुर्गाबाईंच्या मनाचे बंद असलेले अनेक कप्पे त्यांनी या आत्मचरित्रात उघडून दाखवले आहेत. एका सत्वसंपन्न, निष्ठावान् समाजसेविकेचं जीवन यातून आपल्यासमोर उभे राहाते. काही तरी विलक्षण, अकल्पित नाट्यप्रसंग त्यात नाहीत. एक बुद्धिमान, सुसंस्कृत, संवेद्य आणि संयमशील स्त्री आपल्या आयुष्याची रुचिर कहाणी सांगत आहे. याची जाणीव होते. अलीकडची कित्येक आत्मचरित्रे कृत्रिम व नाटकी घटनांनी ओथंबलेली

असतात. प्रामाणिकता तर दुर्बिण घेऊन शोधावी लागते. अशा आत्मकथांची एक बटबटीत कादंबरी झालेली असते. आपल्या आत्मचरित्राला भडक प्रसिद्धी मिळावी आणि वाचकांच्या चावट चर्चेचा तो एक आकर्षक विषय व्हावा, पदरात चार पैसे पडावेत या बाजारी हेतूने प्रसिद्ध होणाऱ्या आत्मकहाण्या उदंड झाल्या. चांगली, अभिरुचीसंपन्न आत्मचरित्रे सध्या वाचावयास मिळत नाहीत अशी माझी तक्रार आहे.

कांही वर्षापूर्वी न्यायमूर्ती छगला यांचं 'रोजेस् इन् डिसेंबर' हे सुंदर आत्मकथन मी वाचलं होतं. पुस्तकाच्या नावापासूनच छगलांच्या काव्यात्मवृत्तीचा आपल्यावर प्रभाव पडतो. आपल्या जीवनातल्या अनेक संघर्षांचा त्यांनी योग्य त्या संयमानं पण परिणामकारकतेनं आढावा घेतला आहे. 'शिशिरऋतूतले गुलाब' हे काव्यमय शीर्षक मला अत्यंत सूचक, आणि सुरेख वाटतं. जीवनातला वसंत ऋतू आता मावळला. शिशिरातली कडाक्याची थंडी आता या गुलाबांना सुकवीत आहे. लवकरच त्यांच्या पाकळ्या गळून पडतील याचं सूचन या मार्मिक शीर्षकातून छगलांनी केलं आहे. त्यांच्या काव्यप्रेमी, रसिक मनाचं आणि जीवनविषयक जाणीवेचं या शीर्षकातूनच दर्शन होतं. आनंदीबाई शिर्के यांनी आपल्या आयुष्याच्या कहाणीला 'सांजवात' म्हटले आहे. आत्मचरित्रांची नावेसुद्धा अर्थपूर्ण आणि भावपूर्ण असावीत. अर्थात हे लेखकाच्या मानसिक प्रकृतीवर अवलंबून असते.

दुर्गाबाई देशमुखांनी मात्र शीर्षकाच्या संदर्भात इतकी रसिकता दाखविली नाही. 'चिंतामणी ॲण्ड आय' असं साधं स्पष्ट नाव देऊन त्यांनी हे आत्मकथन लिहिलं. दुर्गाबाई या 'सी. डी.' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या चिंतामणराव देशमुखांच्या पत्नी, मराठी माणसाला चिंतामणरावांविषयी विशेष आपुलकी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत भारताच्या या अर्थमंत्र्याने पंतप्रधान नेहरूंना स्पष्टपणे खडसावून आपली प्रतिष्ठेची खुर्ची सहजपणे लाथाडली होती. हा माणूस तत्त्वनिष्ठ आणि ताठ होता. खुर्चीसाठी लोटांगण घेणाऱ्या जातीतला तो नव्हता. पंडित नेहरु त्यांच्या या कृतीमुळं अत्यंत अस्वस्थ झाले होते. महाराष्ट्राच्या पाणीदार स्वभावाचं धारदार दर्शन घडवणारा हा चिंतामणी अत्र्यांच्या म्हणण्याप्रमाणं देशाचा कंठमणी झाला होता. पण मला त्यांच्याबद्दल आत्मीयता वाटायला आणखी दोन कारणं घडली आहेत. मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेत मुंबई इलाख्यात त्यांनी पहिला क्रमांक मिळवला तेव्हा त्यांचं मन:पूर्वक अभिनंदन करणारी एक कविता राम गणेश

गडकऱ्यांनी लिहिली होती. या श्रेष्ठ कवीच्या प्रतिभेनं त्यांना आशीर्वाद दिला होता. महाराष्ट्र, मराठी भाषा आणि आपला देश यांना अभिमान वाटेल असं कार्य तुझ्या हातून होईल अशी भविष्यवाणीही गडकऱ्यांनी उच्चारली होती. चिंतामणरावांनी कालिदासाच्या 'मेघदूताचं' सुरेख मराठी भाषांतर काव्यातून केलं आहे. संस्कृत साहित्यावर त्यांचं प्रगाढ प्रेम होतं. वरिष्ठ आय. सी. एस. अधिकारी, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, भारताचे अर्थमंत्री, विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष अशा अनेक नात्यांनी त्यांनी कार्य केलं. संस्कृत आणि मराठीपेक्षा इंग्रजी भाषेशी त्यांचा अधिक घनिष्ठ संबंध यावा यात आश्चर्य नाही. पण जेव्हा ते मराठीतून व्याख्याने देत तेव्हा त्यांच्या भाषणात एकही इंग्रजी शब्द चुकूनसुद्धा डोकावत नसे. इंग्रजीचा फारसा गंध नसतानाही आम्ही पावलोपावली चुकीचं इंग्रजी बोलण्यात धन्यता मानतो. मातृभाषा आम्हाला गांवढळ वाटते. 'वाईफला रिसीव्ह करायला स्टेशनवर जायचं आहे. पण गाडी टू अवर्स लेट असल्याचा जस्ट मेसेज मिळाला. आमच्या इंडियन रेल्वेला अजून पंक्चुअल होता आलं नाही. हॉरिबल् ! हे हॉरिबल् मराठी सध्या मराठीचे प्राध्यापक बोलतात. चिंतामणराव देशमुखांचं स्वच्छ, सुंदर मराठीतलं एक उत्कृष्ट व्याख्यान मी ऐकलं होतं. त्या चिंतामणरावांची पत्नी आत्मकथेत आपल्या जीवनाची कहाणी कशीचित्रित करते याविषयी मला कुतूहल होते.'

दुर्गाबाई देशमुख म्हणजे एका नि:स्वार्थी, समाजनिष्ठ, मूल्यांची जपणूक करणाऱ्या, प्रगल्भ स्त्रीचा आदर्श नमुना आहे. स्वातंत्र्याच्या लढ्यात त्या अनेकवेळा तुरुंगात गेल्या. दलित समाजाच्या लढ्यात त्या अनेकवेळा तुरुंगात गेल्या. दलित समाजाच्या प्रगतीसाठी आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी त्यांनी अखंड कार्य केलं. त्या 'पद्मविभूषण' झाल्या. त्यांना युनेस्को ॲवार्डही मिळालं. सत्तेच्या जागा नाकारून त्यांनी केंद्रीय समाजकल्याण मंडळात काम केलं. पंडित नेहरुंना दुर्गाबाईविषयी विशेष आदर होता. आपलं आत्मचरित्र त्यांनी नेहरुंनाच अर्पण केलं आहे. दुर्गाबाईची ही आत्मकथा वाचताना मनाला त्यांच्या व्यक्तित्वाचा, त्यांच्या विनयशील स्नेहाळ वृत्तीचा एक प्रसन्न सुवास जाणवतो. आपण भोगलेली दु:खे दवंडी देऊन सांगण्याची आणि स्वत:ला करुणेचा विषय बनवण्याची काही लेखकांची ढोबळ पद्धती असते. काही आत्मचरित्रांतली दु:खे तर मुद्दाम उबवलेली आणि भडक अतिशोयोक्तीने सांगितलेली असतात. दुर्गाबाईंच्या कथनात असल्या दु:खांचा कुठेच स्पर्श जाणवत नाही. खरे तर ही स्त्री दारिद्र्य आणि अनेक व्यथा,

वेदना यांच्याशी झगडत आपलं कार्य करीत राहिली. शाळेत विद्यार्थिनी असतानाच तिने आपल्या सेवेच्या बळावर महात्मा गांधींना आमंत्रित केले. आणि या लहान मुलीच्या कार्याची प्रत्यक्ष माहिती घेण्यासाठी गांधीजींनीही तिचे आमंत्रण स्वीकारले. एकोणीसशे तेवीस साली काकीनाडा या ठिकाणी काँग्रेसचं अधिवेशन भरलं होतं. त्यात स्वयंसेविका म्हणून दुर्गाबाई दाखल झाल्या. प्रदर्शनाच्या मैदानावर तिकीटाशिवाय किंवा दोन आणे दिल्याशिवाय कुणालाही सोडायचे नाही, असा नियम केला.

दुर्गाबाई लिहितात, 'पंडित जवाहरलाल नेहरु प्रदर्शन पाहण्यासाठी मैदानावर आले असता मी त्यांच्याजवळ तिकीटाची मागणी केली. तिकीट नाही तर निदान दोन आणे तरी द्या असे म्हटले. पण त्यांच्याजवळ तिकीटही नव्हते व दोन आणे ही नव्हते. म्हणून मी त्यांना विनयपूर्वक आत येता येणार नाही असे सांगितले. प्रदर्शनातील एका अधिकाऱ्याने हे पाहिले. तो धावत आमच्याकडे आला. माझा कान पिरगाळून त्याने मला विचारले की, 'तू कोणाला अडविलेस ते तुला माहिती आहे कां ?'

मी उत्तर दिले, 'होय, हे पंडित जवाहरलाल नेहरु आहेत. पण मी मला नेमून दिलेले काम करीत आहे. व दिलेल्या आज्ञेचे पालन करीत आहे.' पंडितजी त्या अधिकाऱ्याला म्हणाले, 'तिने काहीच चूक केली नाही. तिला दिलेला हुकूम तिने बरोबर पाळला आहे. आज देशाला अशा स्वयंसेविकांची अत्यंत जरूर आहे.'

१९२३ सालातली ही घटना. पुढे नंतर तीस वर्षांनी दुर्गाबाई आणि चिंतामणराव यांच्या नोंदणीविवाहप्रसंगी साक्षीदार म्हणून पंडित नेहरुंनी सही केली. त्यावेळी दुर्गा देशमुखला तो प्रसंग आठवून गंमत वाटली असेल. पण त्या वेळच्या चौदा वर्षांच्या या चुणचुणीत पोरीने नेहरुंना नियम दाखवून अडवून ठेवले होते याची गंमत वाटते.

चिंतामणराव देशमुखांवरील आपलं प्रेम त्यांनी अत्यंत मोजक्या शब्दांतून संयमानं आणि हळुवारपणानं प्रकट केलं आहे. सुजाण व सुसंस्कृत मनातली प्रणयभावना शब्दांच्या आतषबाजीतून कधीच व्यक्त होत नाही. अकृत्रिम प्रीतीला शब्दांची चौकट सहन होत नाही. शब्द आवश्यकच असले तर ते सूचक असतात. मनाच्या रंगभूमीवर प्रेमभावनेचा होणारा नाट्यप्रयोग शब्दांशिवाय सिद्ध होतो. जेव्हा प्रेम नसते तेव्हा ते आहे असे ओरडून सांगायचे असते. दुर्गाबाईंची चिंतामण

प्रीती मुग्ध होती. त्या पूर्वीपासूनच - म्हणजे योजना समितीची सदस्य असल्यापासूनच देशमुखांकडे आकृष्ट झाल्या होत्या. दोघेही प्रौढ होते. चिंतामणरावांची पन्नाशी केव्हाच उलटून गेली होती आणि दुर्गाबाई देखील पंचेचाळीशीत असाव्यात एका अर्थाने यांच्या प्रीतीचे गुलाब शिशिरातच बहरले होते. आपल्या प्रेमाच्या वाटचालीची ही रोमँटिक कहाणी लेखिकेनं थोड्या विस्तारानं सांगितली असती तर बरं झालं असतं असं मात्र वाटतं. प्रेमाची कथा आणि व्यथा कधीच न संपणारी असावी हे प्रत्येकाचंच स्वप्न असतं. चिंतामणरावांची राहणी अत्याधुनिक होती. नीटनेटके कपडे, देखणं रुबाबदार व्यक्तित्व, अधिकारसंपन्नता या पार्श्वभूमीवर दुर्गाबाई अगदीच साध्या काहीशा खेडवळ वाटतात. स्वत: बाईंना ही जाणीव आहे. त्या म्हणतात,

'अत्यंत साधी राहणी असलेली व सुधारकी चालीरीतींचा गंधही नसलेल्या मला नुसत्या फॅशनेबल चप्पल अगर बूट वापरणे सुद्धा माहिती नाही. तसेच स्त्री-पुरुषांच्या एकत्र होणाऱ्या संध्याकाळच्या पार्ट्यांच्या वेळी लोक कसे वागतात ते ही मी अनुभवलेले नाही. असे असताना माझ्याशी विवाहबद्ध होणे तुम्हाला आवडेल का ? असा मनमोकळा सवाल मी त्यांना केला. या सवालानंतर चिंतामणराव मला त्यांच्या बागेत घेवून गेले. युकॅलिप्टस्च्या झाडाच्या सालीवर दोन संस्कृत श्लोक लिहून दाखवून त्यांनी लग्नाची मागणी घातली. मी संमती दर्शविताच त्यांनी प्रेमभराने माझे चुंबन घेतले.'

हे कथन वाचताना कुणीही आनंदानं रोमांचित होईल. चिंतामणरावांच्या ठायी असलेली काव्यात्म रसिकता इथं दिसते. 'आपल्या प्रेयसीला संस्कृत श्लोकातून मागणी घालणारा सु-संस्कृत प्रियकर आज कुठं अस्तित्वात असेल का? प्रेमाराधन सुद्धा किती रुचिरतेनं करावं याचा जणू हा दुर्मिळ नमुनाच आहे. शकुंतलेनं दुष्यंताला कमळाच्या पानावर उत्कट भाषेत प्रेमपत्र लिहिल्याचा उल्लेख कालिदासानं केला आहे. तपोवनात वाढलेली निरागस अशी मुनिकन्या राजा दुष्यंताला आपल्या मनातली मधुर व्यथा कमलपत्रावर लिहून कळवते हा प्रसंग मला काल्पनिक आणि अद्‌भुत वाटायचा. हा एक कवीचा केवळ कल्पनाविलास आहे असं मी समजत होतो. पण संस्कृतातल्या रमणीय काव्यावर ज्यांच्या रसिकतेचा पिंड पोसला व विकास पावला अशा एका प्रेमिकानं निलगिरीच्या झाडावर संस्कृतातून मनोगत लिहावं हा खरोखरच काव्यमयतेचा उच्चांक आहे. प्रणयीवृत्तीला

आणि शृंगाराला किती अनुरूप असा हा प्रसंग आहे !' खरे तर चिंतामणराव हे एक आय. सी. एस. झालेले उच्च सनदी अधिकारी. ते रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर. आणि नंतर देशाचे अर्थमंत्री. त्यांचा सारा संबंध आर्थिक व्यवहाराशी आलेला पण या माणसाच्या मनाला रुक्षतेचा किंचितही स्पर्श झाला नाही. पंचावन्न वर्षे उलटून गेल्यानंतरही त्यांच्या मनोभूमीत प्रीतीचं कोवळं रोपटं रुजलं आणि वाढलं. प्रेम आणि तारुण्य वयावर अवलंबून नसतं हेच खरं ! त्यांचा संबंध अंत:करण प्रवृत्तीशी असतो. चिंतामणरावांनीही आपल्या 'दी कोर्स ऑफ माय लाअिफ' या आत्मकथनात असं विधान केलं आहे की, योजना समितीच्या बैठकीत मी आणि दुर्गा, योजनेविषयी चर्चा करण्यापेक्षा हृदयसंवादातच गुरफटून जात होतो. प्रेमाची भावना जितकी रहस्यमय, जितकी विलक्षण, तितकीच साऱ्या आयुष्याला वेढून दृढ बांधण्याइतकी समर्थ आणि संजीवकही असते यात शंका नाही. दुर्गा-चिंतामणरावासारख्या दोन प्रौढ बुद्धिमान व्यक्ती याच भावनेनं एकत्र गुंफल्या गेल्या. आपल्या नव्या संसाराचं सूचक व संयमित वर्णन दुर्गाबाईंनी केलं आहे.

या आत्मचरित्राचं आणखी एक वैशिष्ट्य मला इथं नोंदलं पाहिजे. दुर्गाबाई या स्वत:मध्ये किंवा आपल्या पतीच्या व्यक्तित्वात सर्वस्वी गुरफटलेल्या नाहीत. देशाच्या परिस्थितीचं, आजूबाजूच्या समाजाचं त्यांना तीव्र भान आहे. आपलं जीवन केवळ आपल्या मालकीचं नसतं त्यावर समाजाचाही अधिकार असतो ही व्यापक जाणीव त्यांच्या मनात काठोकाठ भरली आहे. त्याचं आत्मचरित्र वाचताना या जाणीवेचा आपल्याला सुखद स्पर्श होतो आपल्या मनातल्या द्वेषमत्सराची ओकारी म्हणजे आत्मचरित्र नव्हे. आपल्या आत्म्याचा प्रामाणिक हुंकार प्रकट करण्याची सुसंस्कृत उर्मी ज्या संयमी व सुंदर शब्दांतून गुंफली जाते, त्यालाच मी आत्मचरित्र म्हणतो. आत्मकथनाचा संबंध आत्म्याशी असायला हवा. हा आत्मा समाजजीवनाशी सुसंवाद साधणारा असावा. दुर्गाबाईंचं हे सुंदर आत्मकथन कानात ठेवलेल्या अत्तराच्या फायासारखं दीर्घकाळ भावनेचा आणि विचारांचा सुवास देत राहील यात मला तरी शंका नाही.

दुर्गाबाईंनी आत्मचरित्रात लिहिलेल्या अखेरचा परिच्छेद लक्षणीय आहे. त्या म्हणतात, 'आमच्या जीवनाच विचार करता आम्ही दोघे एकमेकाशी इतके समरस झालो होतो की, द्वंद्वाला कोठेच जागा उरली नाही. माझ्यासारखी खेडवळ विचारांची बाई व श्री चिंतामणरावांसारखा देखणा ऐटबाज माणूस, अशा या दोघांचे

वैवाहिक जीवन किती सुखकर होईल, असा प्रश्न अनेकांना पडला होता. पण हे प्रश्न कसे फोल ठरले हे ह्या पुस्तकावरून समजेल. आम्ही आमच्या जीवनात देशासाठी आणि समाजासाठी आमच्या कुवतीप्रमाणे काही तरी करू शकलो याचा आम्हाला आनंद वाटतो.'

अशी प्रांजल, पारदर्शी, संयमी आणि सत्य आत्मकथनं आज दुर्मिळ झालेली दिसतात. कोणतातरी कृत्रिम मुखवटा घेऊन आपली जीवन कहाणी मुद्दामच गडद रंगात बुचकळून काढायची, कल्पित घटनांची गर्दी करायची, कुणाला तरी घाणेरड्या द्वेष मत्सरानं शिवीगाळ करायची, आपण जणू प्रेषित आहोत असा हास्यास्पद आभास निर्माण करायचा असल्या दांभिक आत्मकथनांशी खरं तर दुर्गाबाईंच्या सोज्ज्वळ, प्रामाणिक आत्मकथेची तुलनाच होणं शक्य नाही. दुर्गाबाईंची आत्मकथा 'सुगंधी' आहे असं मी का म्हणतो हे आता लक्षात यावं.

●●●

# याला म्हणावं राजकारण !

विभूतिपूजनाची आपली प्रवृत्ती आता चिंताजनक होत चालली आहे असे वाटते. एखाद्या नेत्याला देव्हाऱ्यात बसवून त्याची पूजाअर्चा करण्याची आपली प्रथा सनातन आहे. छत्रपती शिवाजी महाराज असोत, म. फुले किंवा डॉ. आंबेडकर असोत. त्यांचा जयघोष करीत त्यांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आपल्याला भूषण वाटते.

माणसाचा देव बनवला की तो केवळ भजन-पूजनाचा विषय बनतो. त्याच्या अनुकरणाचा, त्याने केलेल्या कार्याचा साधक-बाधक विचार करायला अवसरच उरत नाही, पण हे विभूतिपूजन पुष्कळच सुसह्य आहे. निदान श्रेष्ठ व्यक्तींच्या कर्तृत्वाचा यात गौरव तरी आहे. पण अलीकडे एका आगळ्या वेगळ्या विभूतिपूजनाचा पायंडा पडत आहे. दक्षिणेकडच्या एका राज्याच्या मुख्यमंत्रीणबाईच्या पायावर त्यांचे अनुयायी भक्तिभावाने माथा टेकतात, लोटांगण घालतात, तिचे 'परमपवित्र नाव' आपल्या हातावर गोंदवून घेतात तेव्हा या पूजनाला काय म्हणावं तेच कळत नाही.

अडाणी माणसे एखाद्या बुवावैराग्याच्या चरणांवर मस्तक नम्र करतात आणि तो भोंदू बैरागी जे सांगेल त्याला माना डोलवीत बसतात. आम्ही बुद्धिवादी लोक या भोळ्या-भाबड्या लोकांना हसतो. त्यांच्या अज्ञानाची कीव करतो. पण आता या बाबतीत सुशिक्षित आणि अशिक्षित असा भेद करण्याचे काहीच कारण दिसत नाही. मुख्यमंत्रीणबाईचा उल्लेख करतांना तिच्यात काही तरी 'दिव्यत्व' आहे असे मानायचे आणि तिच्या भेटीला गेल्यावर तिच्या 'सुकुमार' पावलांवर आपले मस्तक टेकायचे आणि देवतेच्या कृपाकटाक्षासाठी आशाळभूतपणे हात जोडून उभे राहायचे हा प्रकार उच्चविद्यासंपन्न लोकही करू लागले आहेत. आपले डोके गहाण टाकण्याची या लोकांची घाईगर्दी पाहिली म्हणजे हसू येते. लोचटपणाच्या इतिहासाचे हे नवे प्रकरण राजकारणाच्या क्षेत्रात सुरू झालेले दिसते. पंडित नेहरू पंतप्रधान असतांना कोणी त्यांच्या पायावर अवनम्र होण्याचा प्रयत्न करू लागला तर ते संतप्त होत असत. 'ये क्या तमाशा है ?' असे गर्जून त्याला अडवीत असत. माणसाने

माणसाच्या समोर अशा रीतीने लीन होणे त्यांना आवडत नव्हते. आता जमाना बदलला आहे, क्रांती झाली आहे. सत्तेवरच्या पुढाऱ्यांच्या पायाची धूळ आपल्या मस्तकी धारण करणाऱ्या महान भक्तांची पैदास वाढत चालली आहे. नेतेही या भक्तीच्या आविष्कारात धन्यता मानतात. त्यांचा अहंगंड कुरवाळला जातो. वर्तमानपत्रात फोटो येतात. दूरदर्शनचा कॅमेरा हे 'विलोभनीय' दृश्य टिपून घेतो. तो नेता कृतकृत्य होतो. आपल्या सामर्थ्याचा त्याला साक्षात्कार होतो.

परवा एका वृत्तपत्रात जी बातमी वाचली ती तर हतबुद्ध करणारी होती. माझा विश्वासच बसेना, दोन-तीन वेळा वाचल्यावर कपाळावर हात मारून घेतला. राजकीय क्षेत्रातल्या नव्या विभूतिपूजनाचे चित्रच त्या बातमीतून साकार झाले होते. नागपूरकडच्या एका अतिसुविद्य आमदाराने एका केंद्रीय मंत्र्याला आपल्या घरी भोजनासाठी निमंत्रित केले होते. मंत्रीमहोदय आल्याबरोबर मंगलवाद्ये वाजू लागली. यजमानांनी हारतुरे देऊन त्यांचे स्वागत केले. दिवाणखान्यात आल्यावर भटजींनी मंत्रोपचाराला सुरूवात केली. यजमानांनी खाली वाकून मंत्र्यांचे पाय धुतले. कदाचित 'धुतले' हा शब्द कांही जणांना आवडणार नाही म्हणून 'चरणप्रक्षालन' केले हा शब्द योजतो. यथासांग पाद्यपूजा केली आणि तीर्थ घेतले. नंतर नैवेद्याचे ताट पुढे ठेवले. पंचारतीने ओवाळले. भोजन समारंभ थाटामाटात पार पडला. आता या वार्तेवर मी भाष्य काय करणार ? एखाद्या श्रेष्ठ, विरक्त तपस्व्याच्या बाबतीत हा प्रकार घडला असता तर त्याचे आश्चर्य वाटले नसते. साधु-पुरुषांची योग्यता ओळखायलाही साधुत्वाचे आकर्षण असावे लागते. एखादा विरक्त संन्यासी काय देणार ? तो जीवनातल्या शाश्वत मूल्यांचं स्पष्टीकरण करणार. आत्मा आणि धर्म याच्याबद्दल बोलणार, काय अर्थ आहे त्या धर्मात ? सत्तेच्या स्थानाभोवती शेपटी हालवीत प्रदक्षिणा घालणे हाच परमधर्म मानणाऱ्या लोकांना साधुसंतांबद्दल आत्मीयता वाटणे शक्यच नाही. ज्याचे पाय धुतले तो आपल्याला सत्ता आणि प्रतिष्ठा देऊ शकतो. असा हा सरळ हिशोब आहे.

सत्ताधीशांच्या समोर भक्तिभावाने चरणलीन होणाऱ्या या लोकांनी विद्यापीठीय पदव्यांची भेंडोळी मिळवलेली असतात. त्यांचं अनुकरण करण्याची प्रेरणा सर्वसामान्य माणसाला झाली तर दोष कुणाला द्यायचा ? सत्तेच्या एखाद्या तुकड्यासाठी हे भजन-पूजन आणि गुणसंकीर्तन चालले आहे. एककाळ असा होता की, स्वपराक्रमाने मिळविलेली सत्तेची उच्चासने सोडून सम्राट

आत्मचिंतनासाठी आनंदाने वनात एखादी झोपडी बांधून राहात असत. अगदी अलीकडच्या काळातसुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांनी समर्थ रामदासांच्या झोळीत आपले राज्य टाकले होते. समर्थ हे 'समर्थ' होते. त्यांनी शिवाजी राजाला राज्यावर राहाण्याचा उपदेश केला, असे 'श्रीमंत योगी' आता कोठे शोधावेत ? निदान चोवीस तास तरी मला मुख्यमंत्रीपद द्या, अशी याचना करणारे सत्तेचे पुजारी सर्वत्र सापडतात.

आर्य चाणक्य विद्वान, महत्त्वाकांक्षी आणि समाजनिष्ठ होता. नंदांचा उच्छेद करुन त्याने आपल्या बुद्धिबळाने चंद्रगुप्ताला सिंहासन मिळवून दिले आणि त्याचे राज्य निष्कंटक केले. ज्याने नव्या सत्तेची प्रतिष्ठापना केली त्याला सत्तेचा लेशमात्रही लोभ नव्हता. सम्राट चंद्रगुप्ताला आदेश देणारा हा आचार्य एका सामान्य झोपडीत राहात होता. सकाळच्या वेळी आपल्या हातांनी तो लाकडे आणि गोवऱ्या फोडायचा. त्याच्या झोपडीत कसलीही सुखसाधने नव्हती. एका चटईवर तो झोपायचा. खरे तर सत्तेचे सारे लाभ त्याला पदरात पाडून घेता आले असते. पण या निरिच्छ, निर्लोभी आचार्याने सत्ता आणि संपत्ती दूर लोटली. 'मुद्राराक्षस' नाटकात चाणक्याचे व्यक्तिचित्र समर्थपणे रेखाटले आहे. अशा व्यक्तित्वासमोर स्वयंस्फूर्तीने मस्तक नम्र होते. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, राजकारणात काय किंवा समाजकारणात काय, ज्यांच्यासमोर विनयाने उभे राहावे, अशी माणसे आहेत कुठे? चोरांच्या बाजारात ज्याप्रमाणे सज्जन औषधालाही भेटत नाहीत त्याप्रमाणे नागड्या-उघड्या स्वार्थाने अंतर्बाह्य बरबटलेल्या राजकारणाच्या बाजारात सज्जनाची भेट दुर्मिळ झाली आहे. वाळवंटातही कुठेकुठे हिरवळ असते तसे राजकीय क्षेत्रात केव्हातरी चांगले, राष्ट्रप्रेमी व्यक्तित्व दृष्टीला पडते, पण असे प्रसंग अपवादात्मक असतात. सत्ता आणि संपत्ती यांचे महत्त्व आम्ही नाकारीत नाही. व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्या अभ्युदयासाठी ही सामर्थ्यस्थाने निश्चितपणे उपयोगी पडतात. राजकारणाच्या व्यवहारात काहीवेळा नैतिकतेला डावलून पुढे जावे लागते. कारण त्याशिवाय गत्यंतर नसते हे आम्हाला माहीत आहे. पण नैतिक मूल्यांची बिनदिक्कत विटंबना करणं हेच राजकारणाचं सूत्र असतं असं म्हणणाऱ्याला खऱ्या अर्थानं राजकारणी समजता येणार नाही. स्वत्वाची आणि राष्ट्रीय अस्मितेची होळी करून क्षुद्र स्वार्थ साधण्यात काय अर्थ आहे ? तडजोड करणं किंवा वेळप्रसंगी पडते घेणं सुज्ञपणाचं असतं. पण सत्तेसाठी हीनदीन होऊन स्वाभिमान गमावणाऱ्याला मी तरी राजकारणतज्ज्ञ म्हणणार नाही.

एक व्यवहारवादी गृहस्थ मला म्हणाले, 'तुम्ही लोक परिस्थितीशी मिळतं जुळतं घेत नाही. थोडे फार अपमान सहन करून आपलं उद्दिष्ट साधावं लागतं. या कलेत जो वाकबगार होतो तो यशस्वी होतो. अहो, मी महानगरपालिकेचं तिकीट मिळावं म्हणून साहेबांच्या बंगल्यावर अनेकवेळा गेलो. प्रत्येकवेळी हात जोडून साहेबांना विनंती केली. त्यांच्याशी मी कसा एकनिष्ठ राहिलो आणि पुढे कसा राहीन हे आर्जव करून सांगितलं. साहेब भेटतील त्या ठिकाणी तीच रेकॉर्ड वाजवीत राहिलो, अखेर माझी तपश्चर्या फळाला आली. साहेबांकडे रिकाम्या हातानं कधी गेलो नाही, अहो, दगडाच्या देवाला सुद्धा नैवेद्य दाखवावा लागतो, साष्टांग नमस्कार करावा लागतो.'

त्या व्यवहारपंडिताशी वाद करण्यात अर्थ नव्हता. त्यानं सांगितलं ते संपूर्ण सत्य असावं. या भयानक सत्याचा साक्षात्कार अलीकडे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अगदी पवित्र समजल्या जाणाऱ्या शिक्षणक्षेत्रात सुद्धा होऊ लागला आहे. माझं दुःख हे की, व्यावहारिक लाभ पदरात पाडून घेताना इतक्या लाचारीने प्रदर्शन का केले जाते ? एखादे स्थान मिळवायचे झाले तर आपली उन्नती होऊ शकते. हा भ्रम लोकांच्या डोक्यात दृढ होऊ लागला आहे. एखादे स्थान मिळवायचे झाले तर आपली आत्मप्रतिष्ठा गहाण टाकावी लागते ही शोचनीय परिस्थिती आहे. जगायचे असेल तर लव्हाळे होऊनच जगता येते. हे समीकरण दृढ झाल्यास या भूमीत वृक्ष दिसणारच नाहीत. जिकडे पहावे तिकडे लव्हाळी पसरली आहेत. पाण्याचा लोंढा आला की ती पूर्णपणे खाली वाकतात. वाकल्याशिवाय त्यांना ताठपणे जगता येत नाही हे दुर्दैव म्हणावे लागेल. आजच्या सत्तेच्या राजकारणात पावलोपावली वाकणारी, वाकणे हेच ज्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान होऊन बसले आहे, अशी स्वतःचे व्यक्तित्व नसलेली खुरटी लव्हाळी माजलेली दिसतात. कोणत्याही परिस्थितीत ती जगू शकतात. कारण जगण्यापलीकडे त्यांना उद्दिष्टच नसते. मला येथे शिवरामपंत परांजप्यांच्या ध्रुवाची गोष्ट खोटी असली पाहिजे, या उपरोधपूर्ण निबंधाची आठवण येते. त्यांच्या काळातील लोचट राजकारणी लोकांचा भेदक उपहास करण्यासाठी त्यांनी हा निबंध लिहिला. त्यातल्या एक विधानाचा उल्लेख करतो, ते म्हणतात, 'राजकारण करायचे म्हणजे बेशरमपणा, कोडगेपणा, लाचारी अशा सद्गुणांची कमाल करावी लागते.' कित्येक वर्षापूर्वीचे त्यांचे हे विधान आजही शंभरटक्के वस्तुस्थितीला अनुसरुन आहे. कदाचित आज ते अधिकांशाने सत्य आहे, असेही

म्हणता येईल.

बर्नार्ड शॉ या लेखकाने म्हटले आहे, 'Politics is the last resort of Scoundrels' बदमाषांचे अखेरचे आश्रयस्थान राजकारण असते. शॉचे हे विधान सर्वार्थाने खरे नाही, कारण चंचल समजल्या जाणाऱ्या कुटिल राजकारणातही काही ध्येयवादी राष्ट्रसेवक आहेत, पण त्यांची संख्या झपाट्यानं ओसरत चालली हे मात्र निश्चित. कोणतीही तत्त्वशून्य तडजोड न करता असे देशभक्त राजकारणात आपली विशिष्ट भूमिका घेऊन ठामपणे उभे राहतात. संधीसाधू राजकारण्यांच्या गर्दीत ते उठून दिसतात. कोणाच्या तरी पायांवर डोके ठेवून त्याच्या मेहरबानीवर जगण्याचं ते नाकारतात. आमच्या लोकशाहीचं आणि स्वातंत्र्याचं रक्षण असेच कणखर, स्वाभिमानी लोक करू शकतील, पण ते निर्माण कसे करायचे हा मात्र यक्ष प्रश्न आहे. मासळीच्या बाजारात गुलाबाचा सुगंध कसा भेटणार ? गुंडपुंडांच्या हातात अडकलेले राजकारण राष्ट्रप्रेमी लोकांना आपल्या बाजूने वळवता आले तर आमच्या देशाचे भवितव्य उजळण्याची आशा आहे.

●●●

# ज्ञानेश्वरांशी 'हितगुज'

'हे ज्ञानियांच्या राजा ज्ञानेश्वरा, सातशे वर्षांपूर्वी केव्हातरी चांगदेव नावाच्या एका ज्येष्ठ योग्यानं तुला एक पत्र पाठवलं होतं. पत्र लिहिण्यासाठी त्यानं हातात लेखणी घेतली मात्र, तुला आशीर्वाद लिहावा की नमस्कार हेच त्याला कळेना. कारण वयानं तू लहान होतास. पण ज्ञानाने मात्र चांगदेवापेक्षा कितीतरी मोठा होतास. अखेर या गोंधळात त्यानं तुला एकही अक्षर न लिहिता कोरं पत्र पाठवलं. त्या कोऱ्या पत्राला तू आत्मीयतेनं उत्तर पाठवलंस. मीही आज तुला एक पत्र लिहीत आहे. नमस्कार आणि आशीर्वाद असल्या उपचारात मला वेळ घालवायचा नाही. तू सदैव वंदनीय आहेस. प्रात:स्मरणीय आहेस. आळंदीला तू संजीवन समाधी घेतलीस त्या घटनेला आता सात शतकं पूर्ण होत आहेत. तुझ्या पुण्यस्मृतीला विनम्र भावानं आज सारा महाराष्ट्र कृतज्ञतेनं वंदन करीत आहे. तुझ्या सारख्या एका महान संताशी आणि श्रेष्ठ कवीशी थोडासा वाद-संवाद करण्याचा आनंद मला घ्यायचा आहे. माझा तो अधिकार नाही. पण जगात राजहंसाचं चालणं अतिदेखणं असतं म्हणून इतरांनी चालूच नये काय ? या विचारानं, तुला पत्र लिहायला मी बैठक मारून बसलो आहे. 'अहो, जाहो'च्या शिष्ट भाषेत मात्र मी लिहिणार नाही. प्रिय व्यक्तीसाठी औपचारिक आदराची कृत्रिम भाषा मला तरी मान्य नाही. 'अरे कारे'च्या नि:शंक आत्मीयतेच्या पातळीवर राहून तुझ्याशी मोकळेपणानं बोललो तर तू मुळीच रागावणार नाहीस याची मला खात्री आहे. राग आणि लोभ, द्वेष आणि मत्सर यांचे दुर्गंधी लेप आमच्या क्षुद्र मनावर चढलेले आहेत. तू तर वीतराग आहेस. द्वेष-मत्सराचा वारासुद्धा तुझ्या दिशेनं वाहू शकत नाही. अहंकाराची आणि तुझी ओळखही नाही. अमृतानं भरलेला अर्थ सुंदर शब्दांच्या द्रोणात ओतून त्यात आपल्या हृदयीचा सुगंध मिसळून तू आम्हाला उत्कट प्रेमानं इतकं मोलाचं सांगितलं आहेस की, आता तुझं चिंतन करताना, तुझ्याशी बोलताना शिष्टमान्य कृत्रिम, औपचारिक शब्द माझ्या तोंडी येऊ शकत नाहीत.

ज्ञानदेवा, महाराष्ट्र संस्कृतीच्या शिल्पकारा, आपल्या कवित्वाच्या कल्पवेलीवर रसभावांची फुलं फुलवणाऱ्या कलावंता, तुझ्या रूपानं महाराष्ट्र भूमीला

तेराव्या शतकात एक सुंदर स्वप्न पडलं. तुझ्यामुळं मराठी साहित्यावर आणि भाषेवर अमृताचा घन बरसला. आमच्या जीवनाचा मोगरा त्यामुळं रसरसून फुलावा ही इच्छा आहे. तुझ्या संजीवन समाधीसमोर मी कितीतरी वेळा नतमस्तक होऊन उभा राहिलो आहे. डोळे अश्रूंनी भरून येतात. उरात वेदनेची कळ उठते. मी मनोमन तुला प्रश्न विचारतो : हे तापहीन मार्तंडा, हे अलांछित चंद्रम्या, दुरिताचे तिमिर निरसून टाकण्यासाठी तुझ्या दीर्घ जीवनाची जरूर असतांना पंचविशीच्या आतच तू जीविताचा निरोप का घेतलास ? महापुरुषांचं मनोगत जाणून घेण्याची योग्यता आम्हा सामान्य माणसांत असत नाही हे मान्य करून सुद्धा मला प्रश्न पडतो. हे ज्ञानतपस्व्या, तुझ्यासारखे श्रेष्ठ मार्गदर्शक जगाकडे पाठ फिरवू लागले तर या मानवतेचे काय होणार ? सागर आटून जावा, अमृत विटून जावे, कल्पवृक्ष वठून जावा, सूर्यप्रकाश ओसरून जावा म्हणजे जी स्थिती होईल तीच अवस्था तुझ्यासारख्या श्रेष्ठ संताच्या जाण्यानं होणार नाही काय ? ही समाधी घेण्याचा निर्णय आणखी पन्नास वर्षे तू लांबवला असतास तर आजचा माणूस कदाचित अधिक सुजाण, अधिक सुसंस्कृत झाला असता. तुझ्या समाधीमुळं आमच्यासारख्या असंख्य पामरांच्या मस्तकावरचं छत्र नाहीसं झालं. तू समाधी घेतलीस आणि मराठी भाषा पोरकी झाली. मराठी साहित्याची लक्ष्मी मावळून गेली. एक विलक्षण प्रमत्त आणि प्रसन्न अशी प्रतिभेची लाट तुझ्या रूपानं उचंबळत होती ती विरून गेली. 'आनंदे भरीन तिन्ही लोक' ही प्रतिज्ञा करणाऱ्या आनंदवादी ज्ञानराजा, तुझ्या समाधीमुळं 'बांधल्या तळ्याचा फुटलासे ताट' अशी अवस्था केवळ निवृत्तीनाथांचीच नव्हे तर आमची झाली. हे चेतनाचिंतामणी ज्ञानदेवा, भक्ती आणि शांती यांची बरसात करणाऱ्या ज्ञानमेघा, महाराष्ट्राच्या जीवनात चैतन्याचा दीप लावून तू जो प्रसन्न प्रकाश निर्माण केलास तो शतके उलटल्यानंतरही आम्हाला 'अमृतानुभव' देत आहे. तुझ्या आयुष्यात तुला सुखाची सावली कितपत मिळाली याबद्दल मी साशंक आहे. कर्मठ परंपरेच्या दासानुदासांनी तुझा आणि तुझ्या भावंडांचा छळ केला. निंदा, अपमान आणि उपेक्षा यांच्या तीव्र उन्हात तुम्ही भावंडं होरपळत होता. पण येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी 'अविवेकाची काजळी फेडून' विवेकदीप उजळलास आणि अवघाचि संसार सुखाचा व्हावा म्हणून आपलं जीवन समर्पित केलंस. दु:खात पिचत पडलेल्या सामान्य माणसाला वात्सल्यानं पोटाशी धरलंस, त्याची तू 'माऊली' झालास. तुझ्या वात्सल्याच्या स्पर्शानं सर्वसाधारण

माणसाच्या मनीची सुप्त असलेली तार झंकारून उठली. दरिद्री लोकांच्या आयुष्यात तुझ्या तत्त्वज्ञानानं 'सोनियाचा दिन' उगवला. करुणेच्या महासागरा, ऐन तारुण्यात तू जगाकडं पाठ फिरवायला नको होतीस. मुक्तीच्या सिंहासनावर त्यामुळं आरुढ झाला असलास तरी सामान्य माणूस आजही अज्ञानाच्या, जातीपातींच्या, वासनाविकारांच्या साखळदंडात जखडला आहे. हिंसेच्या व रक्तपाताच्या झंझावातात तो सापडला आहे. त्याला मुक्त करण्याची जबाबदारी तुझ्यासारख्या महामानवावरच येऊन पडते. म्हणून म्हणतो, हे ब्रह्मविद्येच्या उपासका, स्वानंद साम्राजात विहार करणाऱ्या संतश्रेष्ठा, समाधीतून आता बाहेर ये. सातशे वर्षांची ही निर्विकल्प समाधी सोडून आम्हा क्षुद्र पामरांच्या दु:खपूर्ण जीवनात पुन्हा एकदा माऊलीच्या मायेनं शांतिसुखाची छाया निर्माण कर. समाधिस्थ झालेल्या ज्ञानवंता, अरे भयानक अज्ञानाच्या काट्यांकुट्यात खितपत पडलेल्या या मानवतेला तुझी फार जरूर आहे. स्तनपान करीत असलेल्या बालकाला आईनं बाजूला सारावं त्याप्रमाणं तू जगाला दूर केलंस आणि आत्मकल्याणाची अखंड अनुभूती घेत राहिलास पण आमचे काय ? माथ्यावरचं आकाश कोसळलं आहे. पायाखालची धरणी दुभंगली आहे. जीवनाची सारी उज्ज्वल मूल्यं तुडवली जात आहेत. आणि तुला तर समाधीत गाढ शांतिनिद्रा लागली आहे. अशा अवस्थेत आम्ही हृदयापासून तुलाच साद घालणार आणि म्हणणार 'ये ज्ञानदेवा ये, तृषित चातक मेघहृदया ये, हिंसा आणि अन्याय या राक्षसांचा संहार करण्यासाठी श्रीकृष्णाचे सुदर्शन चक्र घेऊन ये. संहार हा शब्द तुझ्यासारख्या परमकारुणिक संताला मान्य नसेल तर, 'खळांची व्यंकटी सांडण्यासाठी' ये आणि 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' निर्माण करण्यासाठी वेगाने ये. आजच्या जगाला ज्ञानी संतांची, माणुसकीचा ध्वज फडकावणाऱ्या मानवतावादी तत्त्ववेत्त्याची जरूर आहे. आंधळ्या भोगवादाच्या उत्पाती प्रचंड लाटेत सापडलेल्या समाजाची सुटका तुझ्यासारखा परम सहिष्णू, कृतार्थ वीरच करू शकेल याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. राजकारण, समाजकारण, धर्मकारण या सर्व जीवनक्षेत्रांत भ्रष्टतेचं, आत्यंतिक स्वार्थाचं कलुषित वातावरण पसरलं आहे. तुझ्या स्वच्छ, विमल अंत:करणातील निकोप विचारांचा गंध पुन्हा एकदा या जगाला मिळाल्याशिवाय जग सुस्थिर होणार नाही. ज्ञानेश्वरा, तुझ्या विचारभावनांचा प्राणवायू या गुदमरणाऱ्या मानवतेला देण्यासाठी पुन्हा एकदा तुला आलंच पाहिजे. तोल ढळलेल्या या जगाचा तोल ज्ञान, तपस्या, साधुत्व

आणि ममता व समता यांचा संगम झालेल्या तुझ्यासारख्या व्यक्तीलाच सावरता येईल. मी तुला 'पसायदान' मागत आहे. दोन हस्तक जोडून आणि तुझ्या चरणी मस्तक ठेवून तुला आजच्या जगात आमंत्रित करीत आहे. ये ज्ञानदेवा ये !

हे प्रज्ञा प्रतिभेच्या सम्राटा, तुझ्या व्यक्तित्वाचं वर्णन करण्यासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत. तुझेच शब्द घेऊन तुलाच ते भक्तिभावानं वाहिले पाहिजेत. समुद्रातलं ओंजळभर पाणी समुद्रालाच वाहून ज्याप्रमाणं माणूस आपली भक्ती प्रकट करतो, सामान्य तेजाची आरती ओवाळून ज्याप्रमाणं सूर्याला वंदन करतो त्याप्रमाणं तुझ्या शब्दांनी तुलाच ओवाळण्याचा प्रयत्न करणं उचित वाटतं.

**जे ज्ञानगंगे न्हाले । जे पूर्णता जेऊनि धाले ।।**
**जे शांतिसि आले । पालव नवे ।।**
**जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ ।।**
**जे आनंदसमुद्री कुंभ । चुभकळूनि भरिले ।।**
**(अ-९-१८९-९०)**

तू आनंदाच्या सागरात भरलेला मंगल कुंभ आहेस. ज्ञानाच्या गंगेत न्हालेला तृप्त भक्त आहेस. धैर्यमंडपाचा तू आधार आहेस आणि शांतीच्या वेलीला फुटलेली नवी पालवी आहेस. तुझी शांती, तृप्ती, भक्ती, आनंद आणि धैर्य यांचे काही थोडेसे अंश जरी आम्हाला मिळाले तरी आम्ही तुझ्या स्वप्नातल्या एका नव्या सुंदर समतावादी समाजाची उभारणी करू शकू. तू केवळ संत आणि केवळ कवी नाहीस. दरिद्री बनलेल्या जगाला नवनवीन स्वप्नांची जरतारी वस्त्रे लेवविणारा आणि नवमूल्यांचे अलंकार दान करणारा कुबेर आहेस. जेथे कृष्ण आणि अर्जुन आहे तेथे जसा विजय निश्चित आहे त्याप्रमाणं जेथे तुझं व्यक्तित्व प्रकट झालं, जेथे तुझ्या वाणीचा विलास व्यक्त झाला ती 'भावार्थदीपिका' आहे तेथे तेथे 'सकळ धर्माचे माहेर' आहे. आम्हाला तू दिलेल्या अमूल्य स्वप्नांची जपणूक केली पाहिजे. स्वप्नाचं रूपांतर वास्तव सृष्टीत करण्यासाठी तुझं बोट धरूनच वाटचाल केली पाहिजे. ज्ञानवंत संताचा आधार मिळाला तर आमचं स्वातंत्र्य आणि लोकशाही चिरंतन होऊ शकेल. आज दृष्टीसमोर कुठलंही भव्य उद्दिष्ट राहिलेलं नाही. दिशा ओस झाल्या. त्यामुळं वाट हरवली. आयुष्याच्या कुरुक्षेत्रावर लढण्याची हिंमत उरली नाही. यावेळी ज्ञानराया, तू आमच्या उधळलेल्या रथाच्या घोड्यांचे लगाम श्रीकृष्णाप्रमाणं हाती घे आणि हा रथ सुरक्षितपणे युद्धभूमीवर उभा कर. तू लढलास

त्याप्रमाणं शांतीनं, निर्मितीशील वृत्तीनं लढण्यासाठी आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी ये. ज्ञानदेवा, आता गेल्या सातशे वर्षांतल्या अनुभवानं आमचा घोर अपराध आम्हाला कळला आहे. 'हे विश्वचि माझे घर' अशी स्थिरमती झालेल्या आणि सारं चराचर बनलेल्या तुझ्यासारख्या विश्वसंताला आम्ही ओळखलं नाही. करंट्या बुद्धीच्या लोकांनी त्या काळात तुझी अवगणना केली हे खरं, पण पूर्वीप्रमाणं पुन्हा एकदा अनन्यभावानं मुक्ताईच्या शब्दांत विनवितो 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा'. विश्व तारण्यासाठी समाधीची शिळा बाजूला सारून पुन्हा एकदा आपलं आगमन होऊ द्या. दुर्गंधीनं भरलेल्या जगात पुन्हा तुमच्या सहवासाचा मोगरा फुलू द्या. सुवासाचं साम्राज्य पसरू द्या. तुम्ही सुगंधवादी आहात. आनंदवादी आणि पुरूषार्थी आहात. म्हणूनच इतक्या लवकर समाधी घेऊन जगाला अनाथ करण्याचा तुझ्यासारख्या महापुरूषाला अधिकार नाही. अलंकारिक अर्थानं तुझ्या जीवनाची यात्रा अखंड चालूच राहाणार आहे पण तरीही प्रत्यक्ष तुझा सहवास आम्हाला या शतकात पुन्हा मिळाला तर तुझ्या प्रसादचंद्रम्यामुळं लोकजीवनाची पौर्णिमा होईल.

हे शब्दसृष्टीच्या परमेश्वरा, अभिनववाग्विलास करणाऱ्या कलावंता, विश्वाला मोहिनी घालणाऱ्या वागीश्वरा, तत्त्वज्ञानाच्या गाभ्यातून नवरसांचे कारंजे निर्माण करणाऱ्या कुशल चित्रकारा, विश्वात्मक देवाला प्रसन्न करण्यासाठी जीवनभर वाग्यज्ञ करणाऱ्या परमसमर्थ याज्ञिका, तू आमच्या मराठी भाषेला अपूर्व लावण्य दिलंस, नवविचाराचं तारुण्य दिलंस, तुझ्या लेखणीतून अमृताच्या शाईत भिजलेली अपूर्व अक्षरचित्रं उमटत राहिली. त्यामुळं तू कवीश्वर झालास. अपूर्वसृष्टीचा निर्माता बनलास. तुझ्या कवित्वामुळं सामर्थ्याची शक्ती वाढली. सौंदर्याचा देखणेपणा दुणावला. प्रकाशाला उज्ज्वलता आली. सुवासाला सुगंध भेटला. रुचीला अभिरुचीची कळा आली. संगीत मधूर झालं. जीवनाला जिवंतपणा आला. यात अतिशयोक्ती अल्पांशानंही नाही. रसभावनांनी संपन्न असलेल्या तुझ्या कवित्वानं तत्त्वज्ञानाला आणि परिपूर्ण विचारांनी समृद्ध असलेल्या तुझ्या तत्त्वज्ञानानं कवित्वाला प्रतिष्ठा दिली. तुझ्या लेखणी-वाणीनं मायमराठीचं आकाश उजळून निघालं. तुझ्या ओवी अभंगांनी मराठी कवितेला लावण्याची नव्हाळी दिली. तूच म्हटल्याप्रमाणं,

**की प्रथमवयसाकाळी लावण्याची नव्हाळी।**
**प्रकटे अंगनाअंगी। जैसी**

बाल्य संपत आहे व यौवनाचं आगमन होत आहे अशा संधिकालात स्त्रीच्या अंगोपांगांवर सौंदर्याची नवलाई ज्याप्रमाणं प्रकट होते त्याप्रमाणं तुझ्या रुपानं वसंत ऋतू अवतरल्यावर आमच्या मराठी भाषेच्या अंगोपांगांना नवयौवनाचे रंग लाभले. खरोखरच तू कलावंतांचा कलावंत आहेस. कवींचा कवीश्वर, योगियांचा योगेश्वर आणि ज्ञानियांचा ज्ञानेश्वर आहेस. गेल्या सात शतकांत अनेक साहित्यकृती आल्या, अल्पकाळ चमकल्या, आणि विस्मृतीच्या अंधारात निघून गेल्या. पण तुझ्या काव्याचं तारुण्य अभंग राहिलं. काळाचा कठोर स्पर्श तुझ्या चिरंजीव कवित्वाला आजपर्यंत होऊ शकला नाही. तिच्या रसवैभवात, आवाहन शक्तीत रतिमात्रही उणेपण आलं नाही, राजवटी बदलल्या, सिंहासनांची उलथापालथ झाली, अभिरुचीच्या प्रवाहानं अनेक वळणे घेतली. पण तुझ्या वाणीचं तजेलदार पाणी जसंच्या तस राहिलं. तू म्हटल्याप्रमाणं जसं गीतातत्त्व नूतन आहे तसंच मी म्हणतो, व्यक्तिमत्व नित्यसुंदर व नित्यनूतन आहे. प्रतिक्षणाला या व्यक्तिमत्वांचा वेगवेगळा पैलू रमणीय दिसतो. एक अजर, अमर कलाकृती निर्माण करून आमच्या मराठी भाषेत तू सुंदरतेच्या खाणी उघडल्यास, जोपर्यंत तुझी 'ज्ञानेश्वरी' आमच्या हातात आणि मुखात आहे, जोपर्यंत तिचं अस्तित्व आमच्या हृदयात आहे तोपर्यंत आम्ही आणि आमची भाषा सुरक्षित आहोत असंच म्हटलं पाहिजे. पण मराठी माणसाला आपल्या मऱ्हाटपणाची आठवण करून देण्यासाठी आता सातशे वर्षानंतर पुन्हा एकदा तुझ्या वाणीचा मधुर प्रेरक झंकार प्रकट करण्यासाठी तू यावंस. कारण ज्ञानोबाची मराठी या महाराष्ट्रात विस्मृत होते काय अशी भीती वाटू लागली आहे. मराठी भाषा आणि संस्कृती यांच्या पुनरुज्जीवनासाठी हे ज्ञानेश्वरा, मी तुला आवाहन करतो.

हे विशालहृदयी ज्ञानदेवा, श्रेष्ठ कवितेचा उगम श्रेष्ठ अंत:करणातूनच होतो हे तू सिद्ध केलंस. पवित्र गंगेचा उगम हिमालयातूनच होणार यात आश्चर्य नाही. अज्ञानी क्षुद्र लोकांनी तुझ्या मातापित्यांना झिडकारलं. तुला आणि तुझ्या भावंडांना नानाप्रकारांनी छळून अवमानित केलं, पण तुझ्या शांत मुद्रेवरची प्रसन्न स्मितरेषा कधी पुसली नाही. किंवा तुझ्या साहित्यात त्यासंबंधी एकही अधिक्षेपाचा उद्‌गार तू काढला नाहीस. तुझी जीवनदृष्टी आनंदपूरित आहे.

**जो खांडावेया घावो घाली । का लावणी जेयाने केली ।**
**दोघां येकचि साउली । वृक्ष जैसा ।।**

ज्यानं झाड लावलं, जोपासना केली, आणि ज्यानं त्याच्यावर घाव घातले त्या दोघांनाही समत्वबुद्धीनं एकच सावली झाड देतं तसं तुझं अलौकिक जीवन आहे. माझ्या मते हाच चमत्कार आहे. आम्ही अतिसामान्य माणसं आमच्या वाट्याला आलेल्या वेदनांचं भांडवल करीत बसतो. खऱ्याखोट्या दु:खाची आरास मांडतो. पण तू चंदनाच्या झाडासारखा आहेस. विळखा घालणाऱ्या विषारी सर्पांनाही सुगंध देत राहिलास. सुगंधातच विषाला मारण्याची शक्ती असते हे सिद्ध केलंस. माणूस माणुसकीच्या दृष्टीनं महान असला की त्याला महान कविता स्फुरू शकते याचा जणू तू वस्तुपाठ घालून दिलास. प्रथम माणूस व्हा. समाजप्रेमाचं बीज आपल्या हृदयात पेरा आणि मग त्यातून साहित्याचे व कलेचे अंकुर उगवतील, त्यांचे वृक्ष होऊन ते समाजाला शीतळ छाया देतील हे पुन्हा झडझडून सांगण्यासाठी आजही ज्ञानेश्वरा तू आम्हाला हवा आहेस.

तू लिहिलेल्या 'पसायदाना' विषयी काय बोलू ? सकलसृष्टीशी समरस होण्याची प्रगाढ प्रेरणा देणारी शक्ती म्हणजे तुझं पसायदान. हे उत्कट भावनेचं, परमोत्कट, श्रेष्ठ विचारांचं भावगीत आहे. ज्ञानेश्वरीच्या मंदिराचा हा तेजस्वी कळस आहे. 'पसायदान' केवळ तुझ्यासारखा परिपूर्ण, वत्सल, ज्ञानराजच लिहू शकतो. मी जेव्हा जेव्हा हे गीत ऐकतो आणि वाचतो तेव्हा तेव्हा माझ्या बुद्धीला आणि मनाला गहिवर येतो. त्यावेळी मला वाटतं की मायेनं ओथंबलेला तुझा हात माझ्या पाठीवरून फिरत आहे आणि तो मला आश्वासन देत आहे. तो मला एका अतिभव्य स्वप्नाकडं घेऊन जात आहे. तो म्हणत आहे, 'भिऊ नकोस, हताश होऊ नकोस. अंधार असतो म्हणूनच आपण प्रकाश निर्माण करण्यासाठी धडपडायचं असतं. विश्वात धर्मरूपी सूर्याचा उदय व्हावा म्हणून प्रयत्न करायचा असतो. धीर धर. काटे संपून जातील. अंधार निरसून जाईल. दुष्ट बुद्धीचा निरास होईल. सद्‌भावनांची फुलं फुलतील. अरे, माझ्या या सृष्टीत चंद्रावर कलंक असणार नाही. सूर्य कुणावर आगीचा वर्षाव करणार नाही. हे जग बदलणार आहे. धीर धर.'

ज्ञानेश्वरा, तुझं 'पसायदान' हे मानवतेचं महागान आहे. या गीताला कोणत्याही सीमा नाहीत. कारण जेव्हा कवी असीम असतो तेव्हा त्याची कविताही नि:सीम असते. तू आम्हाला साऱ्या क्षुद्र सीमा ओलांडण्याचा आणि विश्वव्यापी होण्याचा संदेश दिलास. आज तुझ्याच मुखातून पुन्हा हा दिव्य संदेश ऐकायला आमची मनं आसुसलेली आहेत. सातशे वर्षांचं मौन आता संपू दे. आता पुन्हा

एकदा तुझे स्नेहमय शब्द कानी पडू दे.

**साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ।**
**शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे ॥**

अशा तुझ्या शीतल, शामक शब्दांचा वर्षाव होऊ दे. आम्ही त्याचे तहानेले आहोत. कारण आजच्या जगात प्रामाणिक व मृदुल मधुर शब्दही दुर्मिळ झाले आहेत. पसायदानात तुझी मूर्ती स्वच्छपणे दिसते. खरं तर तुझ्या कोणत्याही ओवीत आणि अभंगात तुझ्या मन:प्रकृतीच्या साऱ्या रेषा आणि रंग प्रकट झालेले दिसतात. 'भूमीचे मार्दव सांगे कोंभाची लवलव' असं तूच म्हटलं आहे. पसायदानात जीवनसृष्टीचा निर्मळपणा आणि ताजेपणा किती सहजतेनं व्यक्त झाला आहे. विशेष म्हणजे स्वत:साठी त्या विश्वात्मक देवाकडं तू काहीही मागितलं नाही याचा अर्थ तू पूर्णकाम आहेस. स्वार्थाचा लेशही राहिलेला नाही. साऱ्या मानवतेची चिंता करणारा महात्मा केवळ जगासाठी जगतो. त्याचं मन निखळ असतं. निष्कलंक मनाच्या विश्वप्रेमी संतकवीनं हे पसायदान मागून सुखाची आणि तृप्तीची एक मंगल प्रभात आपल्या जीवनात अनुभवली यात शंका नाही. साऱ्या मानवतेची चिंता करणारा महात्मा केवळ जगासाठी जगतो. त्याचं मन निखळ असतं. निष्कलंक मनाच्या विश्वप्रेमी संतकवीनं हे पसायदान मागून सुखाची आणि तृप्तीची एक मंगल प्रभात आपल्या जीवनात अनुभवली यात शंका नाही. ज्ञानदेवा, तुझ्यामुळं मानवी संस्कृतीची उंची वाढली. तुझ्यामुळं आम्हीही लौकिकाच्या चित्रात काही अलौकिकाचा रंग मिसळू शकतो. आम्हाला अपार्थिवाच्या अलौकिकाच्या पातळीवर नेण्यासाठी आणि आमचं क्षुद्र जीवन क्षणभर तरी जिवंत करण्यासाठी तुझ्याबरोबर 'संवाद' करण्याची संधी दे. 'ज्ञानेश्वरांशी संवाद' म्हणजे स्वत:तला ज्ञानेश्वर घडविण्याची, जागृत करण्याची एक प्रक्रिया आहे. हे ज्ञानदेवा -

**हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।**

या पेक्षा अधिक काय बोलू ? अधिक काय मागू ?

●●●

# गतजीवन विसरणे शक्य आहे ?

एका तत्त्वचिंतकाने जीवनभाष्य करताना म्हटले आहे, 'गतायुष्याचे चिंतन करण्यात काहीही अर्थ नाही. कित्येकांना पूर्वायुष्यातील सुखदु:खांच्या क्षणांची जपमाळ ओढत बसण्यात आनंद वाटतो. पिंजऱ्यातून उडून गेलेला पक्षी किंवा नदीतून वाहून गेलेले पाणी ज्याप्रमाणे पुन्हा परत येत नाही त्याप्रमाणे गेलेल्या आयुष्यातली ही सुखदु:खे नीरस, निर्माल्यवत् झालेली असतात. जे निघून गेले ते सारे संपूर्ण गेलेले असते. माणसाचे भाबडे मन त्यात गुंतून राहाण्याचा प्रयत्न करते. पण माझ्या मते ते सारेच हास्यास्पद आहे. जे क्षण हातात आहेत ते महत्त्वाचे.'

त्या तत्त्वचिंतकाच्या म्हणण्यात थोडाफार सत्यांश असेलही. पण त्याचं हे मत मला मात्र पटत नाही. खरंतर त्या विद्वान गृहस्थाच्या मनात डोकावून पाहाता आले तर त्याने आपल्या हृदयाच्या कोपऱ्यात काही सुखदु:खाचे प्रसंग जिवाभावाने जतन करून ठेवले आहेत. असे दिसेल. तात्त्विक वाद करणे निराळे. पण प्रत्यक्ष आचरणात ते तत्त्वज्ञान आणणे फार कठीण असते. एक तत्त्वज्ञ आपल्या लेखनात आणि प्रवचनात पुन्हा पुन्हा सांगत असत की, 'शरीर हा एक अत्यंत नाशवंत असा पदार्थ आहे. केव्हातरी तो काळाच्या भक्ष्यस्थानी पडणार. जे शरीर मुळातच ठिसूळ आहे, मर्त्य आहे ते मरणाधीन झाल्यावर दु:ख करणे हा अक्षम्य मूर्खपणा आहे. शरीर मेले तरी आत्मा अमर असतो, हे शहाण्या माणसाने नेहमी लक्षात ठेवावे.'

त्या तत्त्वज्ञाची पत्नी एके दिवशी मरण पावली. पुढे कित्येक दिवस तो शोकात बुडून गेला होता. पत्नीच्या आठवणीनं तो अगदी व्याकुळ व्हायचा. प्रवचनातलं शाब्दिक शहाणपण व्यासपीठावर शोभून दिसलं तरी प्रत्यक्ष जीवनातले अनुभव मात्र वेगळे असतात. ते माणसाला अंतर्बाह्य हलवतात. गतायुष्याच्या चिंतनात काही स्वारस्य नाही हा विचार मुळातच मला चुकीचा वाटतो. आपण चाखलेली सुखदु:खं आपल्या मनात इतकी ताजी, इतकी उत्कट असतात की त्यांची कडु-गोड चव साऱ्या आयुष्यातच मुरलेली असते. ती विसरणे शक्य आहे काय ? जीवनाचा जगण्याचा अनुभव अशा आठवणीतच साठवलेला असतो. यालाच तर 'जीवन' ही संज्ञा आहे.

माझ्या दृष्टीनं जीवन म्हणजे आपल्या अनेकविध आठवणींच्या पक्ष्यांची किलबिल. आयुष्याच्या फांदीवर बसलेली ही पाखरे झाडाला आधार देतात.

आज आघाडीवर असलेल्या एका नामवंत संगीत दिग्दर्शकाशी काही वेळ दिलखुलासपणे संवाद करण्याची संधी मला मिळाली. त्याची काही गाणी विलक्षण गाजली आहेत. गीताला नवनवीन चालीत तो सहज बांधू शकतो. त्याची ही गाणी खेड्यापाड्यात देखील लोकप्रिय झाली आहेत. मी त्याला प्रश्न विचारला होता, 'तुम्ही जे जीवन जगलात आणि जगत आहात त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं ?' गतजीवनातली सुखदु:खं आजच्या कीर्तिसंपन्न आयुष्यात तुम्हाला आठवतात का? भूतकाळातलं आयुष्य आणि त्यातल्या कडवट आठवणी यांच्यावर तुमच्या मनानं पडदा टाकला आहे का ?'

त्या कलावंतांच्या डोळ्यांत कारुण्याची झाक उमटली. तो म्हणाला, 'आज मला कीर्ती आणि संपत्ती मिळाली आहे. पण ज्या काळात अनवाणी पायांनी मी रस्त्यावरून भटकत होतो त्यावेळी माझ्या जीवनसंगीताला ज्या मुलीनं अत्यंत प्रेमानं साथ दिली तिला मी विसरणे शक्य नाही. त्या काळात मला प्रसिद्धी नव्हती. खिशात पैसे नव्हते. पण माझ्या महत्त्वाकांक्षेला तिनं सतत खतपाणी घातलं. कधी कधी हताश होऊन समुद्रकिनाऱ्यावर बसलो असताना माझ्या मनात तिनं पुन्हा आपल्या हळुवार हातांनी स्वप्नं पेरली, उत्साह दिला. एक दिवस चित्रपट संगीताच्या क्षेत्रात मी फार मोठा माणूस होणार असं ती मला सांगत राहायची. माझ्या हातात तिच्या हाताशिवाय काहीही नव्हतं. मी परिश्रम करीत राहिलो. सुरांची संगत सोडली नाही. आज इथेपर्यंत आलो पण मध्येच तिची संगत मात्र तुटून गेली. तिच्या अनंत आठवणी अश्रूंनी आणि आनंदानं चिंब भिजल्या आहेत. त्यावरच मी जगतो आहे.'

माणसं अशा सुंदर, काव्यमय आठवणींवरच जगत असतात. भौतिक संपत्तीपेक्षा भावनांचं हे अमूप धन जोपर्यंत माझ्या खात्यावर जमा आहे. तोपर्यंत मला जगण्याचा अधिकार आहे. माझ्या जगण्याला तोपर्यंत एक प्रयोजन आहे. मनुष्य केवळ भाकरीवर जगत नाही या विधानाचा अर्थ त्याला जगण्यासाठी भाकरीपेक्षा भावना अधिक उपयोगी पडते असाच मी करतो. जगणं म्हणजे अनेक भावनांचं एक रंगीबेरंगी गीत असतं. वेगवेगळ्या संवादी सुरांचा तो ऑर्केस्ट्रा असतो. आजच्या जगण्याला कालच्या जीवनाचा आधार असतो. जो 'काल'ला विसरतो त्याला 'आज' नीट जगता येईल. असं वाटत नाही.

'माझं गतजीवन कष्टाचं असलं तरी मला प्रिय आहे. ते मला आणि मी त्याला बिलगलो आहो. मी मलाच कसा विसरू ?'

त्या कलावंताच्या म्हणण्यात निश्चितच तथ्य आहे. आपलं आयुष्य अनेक संदर्भांनी भरलेलं असतं. एखाद्या पेयाला अनेक घटकांनी विशिष्ट रुची येत असते. प्रत्येक घटक त्या दृष्टीनं अर्थपूर्ण म्हणावा लागेल. पेयाचा प्रत्येक घोट मागच्या घोटाची चव वाढवीत असतो. सध्या जेवढं तुमच्या हातात आहे तेवढंच खरं असं म्हणणं सयुक्तिक वाटत नाही. नव्वदी उलटलेल्या एका वृद्ध माणसाला मी सहज विचारले, 'या आयुष्याचा आता तुम्हाला कंटाळा वाटतो का ? कारण तारुण्य संपून गेलं, उमेदी मावळून गेल्या' ते गृहस्थ माझ्यावर नाराज झाले. त्यांच्या वयाचा मी केलेला उल्लेख त्यांना रुचला नाही. ते म्हणाले, 'तारुण्य काय केवळ शरीराचं असतं ?'

आजच्या काळापेक्षा गेलेला काळ सुखाचा आणि प्रगतीचा होता यात शंका नाही.

तो काळ मी विसरणं शक्यच नाही. एक यशस्वी क्रिकेटवीर म्हणून माझ्या ऐन तारुण्यात मी सर्वत्र गाजलो. हातात बॅट घेऊन खेळाच्या मैदानावर उतरलो की, टाळ्यांचा प्रचंड कडकडाट व्हायचा. त्या मैदानावर मी सम्राटासारखा वागत होतो. प्रत्येक चेंडू सीमापार करताना, टोलेबाजी करताना मला अभिमान आणि आनंद वाटायचा. एकदा एका कसोटी सामन्यात मी दोन शतके ठोकली तेव्हा हजारो प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्या वाजवल्या. माझ्या नावाचे आणि चित्रांचे फलक नाचवले. कुठली तरी एक अनोळखी तरुणी धावत धावत मैदानावर आली माझ्याजवळ येऊन तिनं जे लाडिक हास्य केलं ते आजदेखील मला स्पष्ट दिसत आहे. माझ्या हातात एक टपोरं गुलाबाचं फूल देऊन तिनं अभिनंदनाचे शब्द उच्चारले. आपल्या नाजूक ओठांनी माझ्या गालाला स्पर्श केला कुणीतरी त्या प्रसंगाचा फोटोही काढला. एक खेळाडू म्हणून मी जे साहसी आणि उन्मादी जीवन जगलो त्याच्या केवळ आठवणीसुद्धा आज मला जगण्यासाठी आधार देतात. तुम्ही म्हणाल आता हे सारं नाहीसं झालं आहे. पण मी ते मानायला तयार नाही. माझं शरीर कदाचित म्हातारं झालं असेल, पण माझं मन त्या काळातल्या तारुण्याच्या लाटांवर अजूनही तरंगत आहे.

वृद्ध झालेल्या त्या क्रिकेटपटूच्या आजच्या विकल आयुष्यातही चैतन्याचे

रंग मधून मधून उचंबळत होते. एकेकाळचं ते फुललेलं जीवन आजच्या सुकलेल्या आयुष्यालाही टवटवी आणीत होतं, आपल्या बऱ्यावाईट आठवणी याच आपल्या कायमच्या सोबतिणी असतात, त्या कधी अंतर देत नाहीत, अगदी दुखणाऱ्या आणि खुपणाऱ्या आठवणीसुद्धा एक प्रकारचं समाधान देतात. चमत्कार असा की, दुःखद आठवणीसुद्धा आपल्याला गोड वाटतात.

आपण आत्मीयतेनं आणि तरीही काहीशा तटस्थतेनं. गतगोष्टीची उजळणी करीत असतो. आपलं व्यतीत झालेलं जीवन सुखमय असो की, दुःखमय असो ते आपण कधीच विसरू शकत नाही. पदरात पडलेले आनंदाचे क्षण मनाला गुदगुल्या करतात. वाट्याला आलेली दुःखं एक प्रकारचं विषण्ण समाधान देतात. झाडाची मुळं जशी जमिनीत खोलवर गेलेली असतात त्याप्रमाणं हे संमिश्र अनुभव आयुष्याच्या भूमीत रुजलेले असतात.

पण भूतकाळातल्या कित्येक घटना आणि आठवणी कित्येकांच्या बाबतीत अत्यंत तापदायक असू शकतात. त्या जुन्यापुराण्या घटनांची पिशाच्चे कायमची त्यांच्या मानगुटीवर बसून राहतात. नको असलेलं हे ओझं फेकून देण्याचं स्वातंत्र्य या लोकांना कधीच मिळत नाही. जिथं जावं तिथं भूतकाळाच्या काळ्याकुट्ट सावल्या त्यांचा पाठलाग करतात. एकदा येरवड्याच्या कारागृहात व्याख्यानासाठी मला बोलावलं होतं. 'तुरुंगात जाण्याची' ही एक संधी होती. कुठल्यातरी नैतिक सिद्धांतावर तेथील कैद्यांसमोर मी बोलावं असं मला तुरुंगाधिकाऱ्यानं सांगितलं होतं. माझ्या बोलण्यामुळं कैद्यांच्या मनात नैतिक विचार ठसतील असा माझा केव्हाच गैरसमज नव्हता. व्याख्यानं आणि साहित्य यांचा लोकमनावर कितपत संस्कार होऊ शकतो याची मला चांगलीच कल्पना होती. पण निरनिराळ्या कैद्यांशी औपचारिक का होईना थोडा संवाद करता येईल अशा कल्पनेनं त्या प्रसिद्ध कारागृहात पाऊल टाकलं. संत तुकारामांच्या चरित्रातल्या दोन तीन गोष्टी मी सांगितल्या. व्याख्यान संपल्यावर पंचेचाळीशीच्या सुमाराचा एक कैदी माझ्यासमोर नम्रतेनं उभा राहिला. पूर्वायुष्यात कुठल्यातरी भजनीमंडळात तो होता. नामदेव, तुकाराम वगैरे संतांचे शेकडो अभंग त्याला तोंडपाठ होते. 'ओस' जाल्या दिशा, मज वाटे भिंगुळवाणे। जीवलग नेणे मज कोणी॥' हा अभंग अत्यंत मधुर आवाजात त्यानं गाऊन दाखवला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. अभंगातल्या भावनेशी तो समरस झाला होता. नंतर तो म्हणाला, 'माझा भूतकाळ मला सतत छळतोय.

विसरण्याचा किती प्रयत्न केला. तुकोबारायांचा अभंग रात्रभर गुणगुणतो. मनाला शांती नाही. कशी मिळणार ? मी केलेलं पाप रात्रंदिवस माझ्या उरावर नाचतंय. ते मला विसरता येत नाही. इथून सुटून बाहेरच्या जगात आलो तरी ते माझा पाठलाग करणारच.'

मी त्याची समजूत घालण्याचा केवळ शब्दांतून प्रयत्न केला. शब्द कितीही प्रेमळ असले तरी काही दु:खाचे सांत्वन ते करू शकत नाहीत. तुकारामांचे शब्दसुद्धा त्या कैद्याच्या दु:खावर परिणाम करू शकले नाहीत. माझ्यासारखा सामान्य मनुष्य.....

कुठलं तरी पातक घडल्यामुळं तो कैदी अस्वस्थ होता. कुणाच्या तरी खुनात सहभागी झाल्यामुळं त्याचे हात रक्ताळलेले होते. ही घटना, वर्षानुवर्षे शिक्षा भोगून देखील त्याचं काळीज कुरतडीत होती. आपल्या जीवनातला भूतकाळाचा तुकडा तोडून टाकण्यासाठी तो उत्सुक होता. पण वर्तमानकाळाला चिकटून राहिलेला आणि भविष्यकाळावरही आपली सावली पसरणारा तो भूतकाळ तुटता तुटत नव्हता. काही व्यक्तींना भूतकाळ एखाद्या असह्य ओझ्याप्रमाणे छळत राहातो. एक गोष्ट मात्र निश्चित की, माणसाच्या समग्र जीवनाचा तो एक अविभाज्य भाग असतो. कृत्रिम उपायांनी आपलं गतायुष्य मनुष्याला दूर झटकून टाकता आलं तर काही लोकांना ते निश्चितच वरदानासारखं वाटेल.

आपण शकुंतलेशी लग्न केलं होतं ही काही महिन्यापूर्वीची घटना दुष्यंत विसरून गेला होता. (विसरणं त्याला सोयीचं वाटलं असावं किंवा तो खरोखरच दुर्वासाच्या शापाचाही परिणाम असावा.) 'प्रेमसंन्यास' नाटकात गोकुळ विसरभोळे या नावाची एक विनोदी व्यक्तिरेखा गडकऱ्यांनी रंगवली आहे. हा गोकुळ स्वत:चे वय विसरतो, स्वत:चे नावही विसरतो. त्याच्या विसराळूपणावर गडकऱ्यांनी केलेल्या कोट्या गमंतीदार आहेत. कधीकधी मनात विचार येतो की, आपल्यालाही विस्मृतीचं वरदान मिळावं. स्मरणशक्ती कधीकधी फार त्रासदायक वाटते. काल केलेल्या गोष्टी आज आठवू नयेत असं झालं म्हणजे दररोजचं जगणं नवीन होईल. पण त्यातले धोकेही लक्षात येतात. काल जिच्यावर प्रेम केलं तिला आज विसरणं विस्मृतीच्या शक्तीमुळं शक्य असलं तरी ते इष्ट आहे का ? कालची स्वप्नं आपण आज विसरू लागलो तर जीवनात काही कर्तृत्व घडणारच नाही. भूतकाळाच्या बळकट पायावर वर्तमानातले क्षण उपभोगायचे असतात आणि भविष्य काळाकडे

सौंदर्यवादी दृष्टिकोनातून बघायचे असते. म्हातारी माणसंसुद्धा आपल्या शैशव काळातील आठवणींची, तारुण्यातील आठवणींची सुकलेली फुलं हृदयाशी धरून राहतात. त्या वाळलेल्या फुलांचा मंद सुगंध हीच त्यांच्या वर्तमानकाळाची व भावी काळाची शिदोरी असते.

ज्या तत्त्वचिंतकानं भूतकाळ विसरून जाण्याचा उपदेश केला त्याला तरी हे शक्य होणार आहे का ?

●●●

# एक मैफल रंगलेली !

गप्पागोष्टींची मैफल रंगायला कोणत्या साधनांची आवश्यकता असते ? या प्रश्नाचे उत्तर देतांना मी म्हणेन, रसिक आणि कांहीशा उनाड, वात्रट पण तरीही अभिरुची संपन्न असे मित्र कुठेही एकत्र आले की रंग खुलायला लागतो. आम्ही काही निवडक मित्र महिन्यातून एक-दोन वेळा रात्री एकत्र जमतो. मध्यभागी टेबलावर मिसळ, भजी, पाणीपुरी वगैरे चमचमीत पदार्थांच्या बशा भरलेल्या असतात. कोणीतरी आपल्या खिशातून उंची सिगरेटचे पाकीट काढतो, गप्पांचा आनंद वाढवण्यासाठी काही वेळा सिगरेटचा सुगंधी धूर उपयोगी पडतो असे म्हणण्यास हरकत नाही. वात्रट रसिकांच्या या मैफलीत कुणी गंभीर प्रकृतीचा प्राणी आला तर मग मात्र मैफलीची दैना उडाली म्हणून समजा. स्वैर गप्पाष्टकात समरस होणारे रसिकच अशी बैठक रंगवू शकतात. एका तत्त्वज्ञाने म्हटले आहे, 'तुम्ही काय खाता, यापेक्षा तुम्ही कुणाच्या सहवासात बसून खाता ते अधिक आनंदाचे आणि महत्त्वाचे असते.' एखाद्या असंस्कृत मूर्खाच्या संगतीत पक्वान्ने सुद्धा कडवट वाटल्याशिवाय राहात नाहीत. गप्पांची मैफल सुद्धा रंगेल रसिकांमुळे खुलत जाते. पण काही वेळा दुर्दैवाने एखादा कंटाळवाणा रटाळ इसम आपल्या मूर्ख, अडाणी बोलण्याने रंगाचा बेरंग करून टाकतो. कुठे काय बोलावे आणि कुठे कसे वागावे याचे भान नसलेल्या लोकांनी रसिकांच्या बैठकीत मिसळण्याचा आग्रह धरू नये. विद्वानांच्या सभेत एखाद्या दारुड्याने व्यासपीठावर चढून काहीतरी घाणेरडे उद्‌गार काढावेत आणि ती सारी घडी बिघडवून टाकावी तशी अवस्था कित्येक वेळा मैफलीतही होऊ शकते.

एकदा एक 'महनीय' प्राध्यापक (प्राध्यापक म्हटल्यावर तो महनीय असणारच ! 'महनीय' या शब्दापेक्षा त्याला 'दयनीय' म्हणणे मला अधिक चिंतनीय वाटते) आमच्या गप्पाष्टकांच्या बैठकीत आमच्या दुर्दैवाने उपस्थित झाले. त्यांची मुद्रा गंभीर होती. यालाच कुणी 'त्यांच्या मुद्रेवर ज्ञानाचे तेज पसरले होते' असेही म्हणू शकेल. मी गरम भज्यांची चव जिभेवर घोळवीत होतो. प्राध्यापकाला मी म्हणालो, 'भजी फार फर्मास झाली आहेत. स्वर्गात अप्सरा आणि अमृत असेल.

पण पृथ्वीवर जोपर्यंत अशी खमंग भजी आहेत तोपर्यंत त्या स्वर्गीय गोष्टीकडे लक्ष देण्याचे कारण नाही.' भज्यांची एक डिश् मी प्राध्यपकांपुढे सारली त्याबरोबर अंगावर शहारा आल्याप्रमाणे करून त्यांनी भज्यांकडे एक भीतीयुक्त कटाक्ष टाकला.

ते म्हणाले, 'तुमच्या मैफलीतले हे वातावरण शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे. वैद्यक शास्त्रात असले तळलेले पदार्थ खाऊ नयेत असे सांगितले आहे. हे तामसी पदार्थ सात्विक प्रकृतीला मारक असतात. यांच्या सेवनाने मनात वासना भडकते. विवेक पळून जातो. दुष्प्रवृत्तीकडे मन ओढू लागते.' प्राध्यापक महोदय आपल्या विद्वत्तेला साजून दिसेल अशा गांभीर्याने बोलले. हसऱ्या, खेळकर आणि चेष्टेखोर विद्यार्थ्यांच्या वर्गात या पंडितवर्यांचे काय होत असेल कुणास ठाऊक! भज्यांवर त्यांनी टीका केल्यामुळे माझ्या मनातली हिंस्त्र वासना उफाळून आली. जबरदस्तीने या महापंडिताच्या तोंडात दोनचार भजी कोंबली पाहिजेत असा एक सात्विक विचार मला स्फुरला. त्या रात्रीची आमची मैफल या प्राध्यापकाच्या उपस्थितीमुळे अगदीच हिरमुसून गेली. एखाद्याने विनोद करण्याचा प्रयत्न केला की हे गृहस्थ त्याच्याकडे कांहीशा रागाने आणि तुच्छतेने पाहात. माझ्या एका मित्राने हार्मोनियमच्या साथीवर एक सुंदर प्रेमगीत गाऊन दाखवले. त्याचा आवाज फारसा मधुर नव्हता. पण त्या गीतातले भाव मधुर आणि उत्कट होते. गीताचा अर्थ असा होता,

'जिवलगा, तुझी किती वाट पाहायची ? वन सळसळत आहे, मन तळमळत आहे. अंधार दाटत चालला आहे. माझ्या मनाच्या सतारीतून मीलनोत्सुक सूर उमटत आहेत. केव्हा भेटंणार तू ? हिंडून हिंडून आणि धुंडून धुंडून आता माझी गात्रे थकली आहेत. डोळे शिणले आहेत. विरहाची ज्वाला पेटली आहे. रक्ताचा प्रत्येक थेंब तुला भेटण्यासाठी आतुर झाला आहे. पण अजून तू भेटत नाहीस. आजूबाजूची रात्र चढत आहे, वाढत आहे. आता रात्र चांगलीच तरुण झाली आहे. करुण शब्दांनी मी तुझी आळवणी करीत आहे. या रात्रीच्या तरुण प्याल्यात शृंगाराचे रसायन ओतून ही रात्र रंगवलीच पाहिजे मी तुला साद घालत आहे. जिवलगा केव्हा भेटणार तू ?'

या गीताचा भावार्थ कसा कोमलार्त आहे. कोणी सुंदर युवती प्रेमभावनेने न्हालेल्या शब्दांतून प्रियकराला आमंत्रित करीत आहे. ही घटनाच किती रोमहर्षक आहे. गीत संपल्यावर मी त्या गीताची आणि ते लिहिणाऱ्या कवीची मनसोक्त

प्रशंसा केली. प्राध्यापक महोदयांची प्रतिक्रिया मात्र अत्यंत विरोधी झाली. ते रागावून म्हणाले, 'तुम्ही समाजातले महत्त्वाचे मानले जाणारे लोक असल्या हिणकस कवनात आणि वासनेच्या आविष्कारात रस घेत आहात हे आपल्या संस्कृतीचे दुर्दैव आहे. ही सारी व्यभिचार गीते आहेत. ज्या काव्यात परमेश्वराचे स्मरण नाही, वर्णने नाहीत त्या सगळ्या काव्यांची गणना मी 'रण्डागीतानि काव्यानि' या सदरात करतो. काव्यात ईश्वरशक्ती असावी, देशभक्ती असावी, असल्या शृंगाराला कधीही स्थान असू नये. शृंगार म्हणजे विकृती आणि स्त्रीचा सहवास म्हणजे विकृतीची परमावधी होय.' प्राध्यापक महाशयांचे हे विवेचन ऐकून मी कपाळावर हात मारून घेतला. या प्राध्यापकाला चार मुले आणि चार मुली होत्या. आणि आमच्या मैफलीत येऊन हे 'स्त्री सहवास म्हणजे विकृती' असे आपले अनुभविक मत प्रकट करीत होते. आमच्या एका वेड्या मित्राने केवळ गफलतीने या मूर्ख इसमाला त्या दिवसाच्या बैठकीस आमंत्रित केले होते. आजची मैफल या अरसिकामुळे उधळली जाणार अशी चिन्हे मला दिसू लागली. पण आपण प्रयत्नांची पराकाष्ठा करायची. मैफल बिघडू द्यायची नाही असा मी निश्चय केला. त्या गायक मित्राला मी म्हणालो,

'काय छान गीत तू निवडलंस. शृंगार आणि प्रेम म्हणजे आपल्या आयुष्याच्या वेलीवर फुललेली फुले असतात. ती थोडीच असतात. पण ही फुले आपल्या मनाच्या एका सुंदर कोपऱ्यात व्यवस्थितपणे ठेवली पाहिजेत. केव्हाही मनाचे बंद दार उघडले की त्यांचा अवीट सुगंध दरवळलाच पाहिजे. शृंगार आणि प्रेम ज्याला रुचत नाही आणि पचत नाही त्याला भक्ती आणि अध्यात्मही समजणे शक्य नाही. कुठलाच रस त्याला कळणार नाही. अरे, हळुवार पण गाढ शृंगाराच्या आणि प्रणयाच्या कितीतरी सुंदर ओळी या क्षणी माझ्या मनात गर्दी करीत आहोत. एक प्रेयसी आपल्या प्रियकराला म्हणते.'

'मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे सुरेश भटाचे हे शब्द अेका गायिकेने लता की आशा नीटसे आठवत नाही, पण तिने अंगांगांतून आणि अंतरंगातून जिवंत केले आहेत. 'मल्मली तारुण्य' या शब्दात तारुण्याचे सारे विशेष किती सहजतेने प्रकट होतात. तारुण्य ओघळून गेले तरी तारुण्याची मखमली आठवण ज्याच्या मनातून पुसून जाते तो कधीच तरुण नव्हता असेच म्हटले पाहिजे. आमच्या जुन्या साहित्यातून - अगदी संतांच्या काव्यातून सुद्धा तारुण्याचा, प्रेमाचा आणि शृंगाराचा अनेक ठिकाणी हृदयंगम आविष्कार झाला आहे. प्राध्यापक साहेब, शृंगार आणि

प्रेम यांच्याकडे पाठ फिरवल्यावर आपल्याला जगता तरी येईल काय याचा थोडा विचार करा.' पण माझे हे मत त्यांना पटण्याची शक्यताच नव्हती. या गृहस्थाच्या डोक्यात निकोप आणि सुसंगत विचारच नाहीत. अतिरेकी सोवळ्या कल्पनेने पछाडलेल्या 'चिंतातूर जंतूंना' शृंगाराचे कलात्मक काव्य वाचताना किंवा चित्र पाहाताना मळमळायला लागते. कुठल्यातरी भ्रांतिष्ट संकेतांच्या आहारी गेलेल्या या रोगट मनोरुग्णांना खरे सांगायचे तर औषध नाही. होनाजी, राम जोशी यांच्या लावण्या वाचतांना यांना उगीचच ओशाळल्यासारखे वाटते. एखादा कांहीसा ग्राम्य शब्द काव्यात आढळला की, यांच्या छातीत धडकीच भरते. मनमोकळेपणाने शृंगाराच्या कवितेला सामोरी जाण्याची यांना भीती का वाटावी ? मला वाटते रसिकतेचे अंगच यांना नसते. साहित्यातल्या, चित्रातल्या किंवा शिल्पातल्या सौंदर्याला कसे भेटावे, कसे भिडावे हे त्यांना कळतच नाही. एकदा अशाच एका सोवळ्या कर्मठ गृहस्थाने मला विद्यापतीच्या एका शृंगारिक कवितेबद्दल आक्षेप घेऊन विचारले, 'असली उत्तान कविता की ज्यात एका स्त्रीच्या अंगप्रत्यंगाचे वर्णन केले आहे असली विकृत अभिरुचीची कविता तुम्हाला योग्य वाटेल का ?'

मला त्या गृहस्थाच्या प्रश्नाचा नीटसा बोध झाला नाही. स्त्रीच्या सौष्ठवपूर्ण शरीराचे वर्णन व चित्रण ज्यात रसिकतेने केले आहे अशी काव्ये आणि चित्रे जगात सर्वत्र आढळतात. सौंदर्याचा मोह वाटावा यात अस्वाभाविक काय आहे ? जगातल्या सर्व भाषांतील साहित्यात सौंदर्य, तारुण्य आणि शृंगार यांचे रंग प्रतिभावंतांनी उधळले आहेत. मला तर बुद्ध महावीरांची विरक्ती जितकी सुंदर वाटते. तितकीच कृष्णाची अनुरक्तीही मोहक वाटते. वैराग्यालाही आकर्षण आहे. अनुरागालाही त्याचे खास वैशिष्ट्यपूर्ण सुंदरपण आहे. विद्यापतीच्या ज्या काव्यावर त्या सोवळ्या गृहस्थाने आक्षेप घेतला होता त्यात एका तरुणीच्या अंगोपांगांची तुलना सृष्टीतल्या अन्य सुंदर वस्तूंशी यथार्थपणे केली होती. ही तुलना वाचतांना साधर्म्य भावामुळे रसिकाला निश्चित आनंद वाटतो. पण हे सारे ज्याच्या रसिकतेला सुसंस्कृत अभिरुचीचा सुवास येतो त्यालाच आनंद वाटेल. व्यास आणि वाल्मीकी यांनी संन्यासी अवस्थेत आपली महाकाव्ये लिहिली. जीवनातल्या विप्रलंभ आणि संभोग शृंगाराचं वर्णन करतांना व्यासासारखा ऋषिवर्य कोठेही संकोचला नाही. कालिदासाचं 'मेघदूत' तर शृंगार भावनेचा अखंड झुळझुळणारा झराच नव्हे काय? पण स्त्री वर्णन आले किंवा स्त्रीचं चित्र दिसलं रे दिसलं की हे सारं विकृतपणाचं

आहे असं समजणाऱ्या कर्मठांना काय सांगायचे ? माणसांच्या मनावर अरसिकतेची बुरशी एकदा चढली की तिच्यावर मग औषध नाही. एका यौवनवतीच्या उभार वक्षांना एका कवीनं डौलदार कबूतरांची उपमा दिली आहे. भर्तृहरीसारखा कवी त्यांचा उल्लेख 'सुवर्णकलश' असा करतो. कवींच्या सरस कल्पना विलासाचे हे मनाला गुदगुदल्या करणारे आविष्कार आहेत. काम हा जीवनातला एक महत्त्वपूर्ण पुरुषार्थ आहे हेच ज्यांना मान्य नसेल त्यांच्याशी वादविवाद करण्यात अर्थ नाही. त्यांना खुशाल हातात जपमाळ घेऊन बसू द्या. परमेश्वर जर सर्वत्र आहे तर तो स्त्री सौंदर्यातही दिसू शकणार नाही का ?

ज्ञानेश्वरांसारखा रससिद्ध कवी कधीकधी विठ्ठलाची उपासना प्रियकराच्या रूपात करतांना आढळतो आणि मग या संताच्या सौंदर्यवादी मनाचा सुगंध जाणवू लागतो.

**घनु वाजे घुणुघुणा । वारा वाहे रुण झुणा ।**
**भवतारकु हा कान्हा । वेगी भेटवा का**
**चंदनाची चोळी । माझे सर्व अंग पोळी**
**कान्हो वनमाळी । वेगी भेटवा का**

एका विरहिणीच्या भूमिकेतून ज्ञानेश्वर कृष्णाचे आराधन करीत आहेत. उत्कट भक्तीला तीव्र प्रेमाचा रंग चढावा यात आश्चर्य नाही. भक्ताला देखील ईश्वराचं प्रियाराधन करण्याचा मोह होतो. यालाच मधुराभक्ती म्हणतात. मीरेच्या पायातल्या घुंगुरांतून देखील कृष्णप्रेमाचेच सूर झंकारत होते. आणि आमचे हे अरसिक प्राध्यापक मात्र प्रेम गीत ऐकतांनाही खरवसाच्या वडीसारखा चेहरा करून (मुळातच तसा होता) बसले होते.

त्या रात्रीच्या मैफलीत अरसिक प्राध्यापकाच्या येण्यामुळे दुधात मिठाचा खडा पडावा तसे झाले. पण मी मात्र त्यांची फारशी दखल न घेता मैफल रंगवण्यासाठी एक गमंतीदार प्रश्न माझ्या सहकाऱ्यांना विचारला,

'प्रीतीची भावना चित्रातून किंवा साहित्यातून आपल्याला अनेक वेळा पाहायला मिळते. पण एखाद्या गमंतीदार प्रसंगातून व्यक्त झालेली कुणी पाहिली आहे काय ? असा एखादा प्रसंग तुम्ही सांगितलात तर ही मैफल अधिकच रंगेल.' टेबलावर आता गरम टोस्ट आणि फेसाळलेल्या कॉफीचे प्याले दाखल झाले होते माझा एक वकील मित्र प्रथम टोस्टकडे वळला. कॉफीचे दोन घोट घेऊन तो म्हणाला,

'कित्येक वर्षांपूर्वीची एक गोष्ट सांगतो. काल्पनिक नव्हे. कल्पना करायला मी काही कवी नव्हे. पुराव्याशिवाय बोलणार नाही. आता माझी ही गोष्ट ऐकून आपले हे प्राध्यापक मित्र नाराज होऊन एखादे व्याख्यान देतील पण त्याला माझा इलाज नाही. जसं घडलं तसं सांगतो. वकील मित्रानं कॉफीचे आणखी दोन घोट घेतले. पाकिटातली सिगरेट काढून पेटवली आणि तिचा एक दीर्घ झुरका त्याने घेतला. आमची उत्सुकता तो वाढवीत होता. तो म्हणाला,

'माझा एक खेळाडू मित्र होता. सुरेख क्रिकेट खेळायचा. याच्या स्टायलिश बॅटिंगवर एक सुंदर मुलगी आषक झाली होती. ती त्याला काव्यमय भाषेतून प्रेमपत्रे पाठवायची. या खेळाडूला मात्र चार ओळी शुद्ध लिहिता येत नव्हते. एके दिवशी आपल्याला आलेली डझनभर प्रेमपत्रे माझ्या पुढे टाकून तो काकुळतीने म्हणाला मी बॅट वाटेल तशी चालवतो. पण लेखणी मात्र मला चालवणं शक्यच नाही. या प्रेमपत्रांना तूच तुझ्या सुंदर भाषेत उत्तरे लिही. तुझ्याशिवाय मला कोण मदत करणार? मी रात्र रात्र जागून त्याला धुन्द भाषेतली पत्रे लिहून दिली. आता अशा पत्रातली भाषा ही काही कायदेशीर असत नाही. तिच्या रूपाची आणि गुणांची बेफाट स्तुती मी माझ्या भाषेतून केली. प्रेम त्याचे पण पत्रलेखन माझे. ती अशा भ्रमात होती की या खेळाडूची भाषासुद्धा त्याच्या खेळासारखीच किती मोहक आहे. अखेर एक दिवस त्यांचे लग्न झाले. लग्नानंतर काही दिवसांनी तिला सारे रहस्य समजले. कांहीशा रागाने ती मला म्हणाली. त्या काव्यमय भाषेतल्या पत्रांमुळेच मी लग्न करण्याचा निर्णय घेतला. इतकी परिणामकारक भाषा लिहिणारा पती आपल्याला मिळणार या आनंदात मी तरंगत होते पण तुम्ही तरी इतकी गोंडस भाषा कशी लिहिता ? तुमच्या एकंदरीत बोलण्यावरून तुमचा आणि कवितेचा कांही संबंध असेल असे वाटत नाही. तिने मला बरोबर पकडले होते. 'प्रेमपत्रे कशी लिहावीत ?' या नावाचे एक पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले होते. त्यात काही नमुनेदार पत्रे दिली होती. मी त्यांची सही सही नक्कल करून या मुलीकडे पाठवली होती.'

वकील मित्र थोड्याशा खिन्नतेने पुढे म्हणाला, 'नकला मी केल्या पण फळ मात्र त्या खेळाडूच्या पदरात पडले. हीच माझी दुःखद प्रेमकहाणी आहे.' आम्ही सारे खळखळून हसलो. प्राध्यापकांच्या विद्वत्ताप्रचुर मुखावर मात्र स्मिताची एकही रेषा उमटली नाही. त्यांनी आपल्या बायकोला तरी आयुष्यात एखादे कार्ड लिहिले असेल की काय याची शंकाच वाटते. स्वैर गप्पांच्या मैफलीत थोडे हलके-फुलके,

मनमोकळे बोलावे. एकमेकांशी थट्टाविनोद करावा. खट्याळपणाने कोणाला शाब्दिक कोपरखळी मारावी किंवा चिमटा काढावा. मनात कसलेही किल्मिष न ठेवता मनमोकळेपणाने हसावे. दुसऱ्यालाही हसवावे. यातला आनंद आम्ही मनापासून घेतो. मग एखादे प्राध्यापक दुद्धाचार्य आम्हाला पोरकट म्हणाले तरी पर्वा नाही. वाढत्या वयात सुद्धा आपले पोरपण जतन करून ठेवण्याचा हा एक प्रयत्न आहे. वयाचे ओझे आपल्या मानगुटीवरून कांही वेळ खाली उतरवून ठेवावे आणि अशी एखादी खुमासदार मैफल रंगवावी इतकाच मी आपल्याला सल्ला देतो. चार दिवस जगायचे असेल तर आपल्या आयुष्याची मैफल आपण का रंगवू नये ? हे माझे साधे, सोपे, सरळ तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाचे सूर आपल्या रसिकतेने एकदा कानामनात भरून घेतले की मैफलीला जो रंग चढतो तो विचारू नका. अशा रंगातच श्रीरंग भेटतो. अंतरंगाचा रंग उजळून निघतो.

●●●

# तारुण्य : एक चिंतन

तारुण्याची स्तुतिस्तोत्रे अनेक प्रकारांनी गायिली जातात. तारुण्य म्हणजे गती आणि साहस. तारुण्य म्हणजे नवनवीन स्वप्नांचे भांडार. आदर्शाकडे झेप घेण्याची दुर्दम्य प्रवृत्ती म्हणजेच तारुण्य. आकाशातल्या हसऱ्या तारकांकडे पाहात पायाखालच्या काठ्याकुट्यांची उपेक्षा करण्याच्या या छंदाला तारुण्य हीच संज्ञा योग्य. अशा साहसी वेडातूनच जग बदलते. कला फुलतात. संस्कृतीला आकार येतो. न्यायाला प्रतिष्ठा मिळते. शस्त्रांना धार येते. दगडाचा देव किंवा देवाचा दगड होतो. जुने मोडीत निघते. नवे फुलत राहते. प्रगतीला वेग आणि आवेग येतो. तारुण्याच्या भूमीतच बंडखोरी जन्माला येते. कशाने तरी झपाटून जावे आणि जुन्याला छेद देवून नव्याला आकार द्यावा ही महत्त्वाकांक्षा तारुण्यातच रसरसून येते.

पण तारुण्य हे अविचारी आणि उन्मार्गगामी असते. ते उतावळेपणाने कांही विध्वंसक प्रवृत्तीत रमून जाते अशी टीका अनेकवेळा वृद्ध माणसांकडून केली जाते. या टीकेत तथ्य नाही असे मला मुळीच म्हणायचे नाही. यौवनाला वादळाची गती असते आणि एकदा वादळ सुरू झाले की, ते सैराटपणाने वाहात राहाते. वादळाची शक्ती हवी पण तिला नियंत्रित करण्याची सूत्रे विवेक बुद्धीच्याच स्वाधीन असावीत. तारुण्याच्या भरात नाना प्रकारच्या अनर्थकारक गोष्टी घडल्या आहेत. एकदा एका तरुणीने आपल्या हातून घडलेल्या कांही लाजिरवाण्या चुकांची कबूली माझ्यासमोर दिली. ती म्हणाली,...

'दहा वर्षांपूर्वी : माझ्या वयाच्या अठराव्यावर्षी मी एक भयानक चूक करून बसले. त्या चुकीनं माझं सारं आयुष्यच अंधारून गेलं. चटोर हिन्दी चित्रपट पाहून माझी बुद्धी बहकून गेली होती. मला वाटलं प्रीतीच्या पूर्तीसाठी घरादारावर लाथ मारणं आणि ज्याच्यावर आपलं प्रेम आहे त्याच्यासाठी प्राणांचीही आहुती देणं, हीच जीवनाची कृतार्थता असते. पण मी ज्याला प्रेम समजले ते प्रेम नव्हतेच. ती एक तात्पुरती भुरळ होती. अनेक पोरींना फसवणारा, श्रीमंतीच्या बळावर त्यांना फूस लावणारा एक लफंगा तरुण मला भेटला. माझ्या मैत्रिणींनी सावध राहण्याचा

इशारा दिला होता. पण मला त्या उन्मादात कसलंच भान राहिलं नाही. मला वाटलं आपलं आयुष्य आता काव्यमय प्रेमानं बहरुन निघालं आहे. माझे वडील थकलेले होते. त्यांनी दोन तीन वेळा डोळ्यांत पाणी आणून अविचार न करण्याबद्दल मला विनविल होतं. आईनं पदर पसरला होता. पण माझ्यातल्या तारुण्याला आणि विकाराला म्हाताऱ्या माणसांचा विचारी सल्ला रुचणं शक्यच नव्हतं. एका घातकी क्षणी त्या श्रीमंत तरुणाबरोबर मी घर सोडून पळून गेले. सहा महिने त्याच्या बरोबर उनाडले. माझे आईबाप जिवंत आहेत की, माझ्या ध्यासानं त्यांनी प्राण सोडला याचीही साधी चौकशी मी केली नाही. सहा महिन्यानंतर खाली मान घालून पुन्हा मला घरी परतावं लागलं. माझ्याच हातानं तारुण्याच्या उन्मादात मी माझं आयुष्य नासून टाकलं. आता या गोष्टीचा पश्चाताप होतो. तारुण्याला जर संयमाचा आणि विवेकाचा किनारा भेटला नाही तर ते तारुण्य माणसाला आयुष्यातून उठवतं असा माझा अनुभवं आहे.'

दु:खानं व्याकुळ झालेली ती प्रौढा स्त्री जे सांगत होती ते खरंच होतं. तारुण्याची आपण स्तुतिस्त्रोत्रं गातो. तारुण्य म्हणजे प्रगती, पराक्रम आणि क्रांती अशी समीकरणे मांडतो. तारुण्याची उर्मीच जग बदलू शकेल. कांही तरी नवीन निर्माण करू शकेल असे आपण मानतो. ते कांही खोटे नाही. पण तारुण्यातल्या साहसाला, महत्त्वाकांक्षेला सारासार विचारांचा अंकुश नसेल तर महापुराने उन्मत्त झालेली नदी ज्याप्रमाणे घरादारांचा, माणसांचा बळी घेत सुसाट धावते तशीच अवस्था अविचारी तारुण्याची होते. शिडात वारे भरावे आणि जहाजाला जोरदार गती मिळावी. पण कोणत्या किनाऱ्याकडे आपल्याला जायचे आहे याचे भान नसेल तर वारा भरलेली शिडे खोल समुद्रात एखाद्या खडकावर जहाजाला जलसमाधी द्यायला कारण होतात. तारुण्य म्हणजे भावनांचा विलास. असे आपण म्हणतो. कारण तरुण वयात भावनांची उत्कटता अनिवार असते. पण भावनेला अधिष्ठान विचारांचे नसेल तर त्या भावनेला कोणता किनारा सापडेल याची कल्पनाच करता येत नाही. आंधळ्या भावनेच्या आहारी जावून कित्येक मूर्ख तरुणांनी जीवनांतल्या पवित्र मूल्यांच्या चिंधड्या केल्या आहेत. एका अक्कलशून्य तरुणाने : हा तरुण अर्ध्या हळकुंडाने पिवळा झाला होता. एक दोन तथाकथित उपदेशकांनी सांगितले म्हणून त्याने एका सार्वजनिक देवस्थानातील मूर्ती फोडण्याचा 'महान पराक्रम' केला होता. स्वत:ला तो बुद्धिवादी समजत होता. देवदैवतांवर विश्वास ठेवणे न

ठेवणे, श्रद्धेने पूजा करणे, न करणे ही व्यक्तिगत स्वातंत्र्याची बाब असू शकते. हजारो लोकांच्या श्रद्धेला बुद्धिवादांची बैठक देण्यासाठी त्यांने वैचारिक लेख लिहिले असते.. भाषणे दिली असती तर त्याला तसे करण्याचा अधिकार होता. पण एखाद्या सार्वजनिक पूज्य स्थानावर हल्ला चढविणे आणि देव्हाऱ्यातल्या मूर्तींचा विध्वंस करणे यात शौर्याचा लवलेशही नाही. मानसिक विकृतीचा हा प्रभाव आहे. माथेफिरु तारुण्याचा हा एक नमुना आहे. तरुणांनी बंडखोर असावे हे मान्य करुन सुद्धा असली विकृत - रोगट बंडखोरी समाजाचा घात करणारी आहे. हे लक्षात ठेवलं पाहिजे. ज्या तरुणाच्या वृत्तीवर विचारांचे सदसद् विवेकाचे नियंत्रण असते त्यालाच कांही तरी रचनात्मक कार्य करणे शक्य होते. परीक्षेची प्रश्नपत्रिका अवघड निघाली म्हणून महाविद्यालयाच्या इमारतीवर शेकडो विद्यार्थ्यांनी 'अन्यायाचा निषेध' म्हणून जोरदार दगडफेक करून इमारतीची मोडतोड केल्याची बातमी मी जेव्हा वृत्तपत्रात वाचली तेव्हा या तारुण्यपूर्ण साहसाचे किती कोडकौतुक करावे हे मला समजेना. अन्यायाच्या विरूद्ध बुलंदपणाने उभे राहणे हा तारुण्याचा एक ज्वलंत विशेष असतो यात शंका नाही. संतप्तता कार्याला चालना देऊ शकते. पण संतापाच्या मागे कांहीतरी तत्त्वज्ञान असावे लागते. केवळ अज्ञान, केवळ संताप आणि तारुण्य यांच्या बेरजेतून विनाशाशिवाय आणखी काय घडणार ? कांहीतरी पार मोडून - तोडून टाकावे, उद्ध्वस्त करावे यात बंडखोरी आणि साहस निश्चितच आहे. पण एका तत्त्वचिंतकाने म्हटलेले आठवते. 'कुंपणे जरूर पाडावीत. पण पाडण्यापूर्वी कोणते कुंपण कशाला घातले होते, त्याच्यामागे कोणता हेतू होता, याचा प्रथम विचार केला पाहिजे. दिसेल ते कुंपण मोडूनच टाकायचे याला क्रांती म्हणत नाहीत. वेडेपणाचा तो एक नमुना आहे.'

केशवसुतांच्या एका कवितेत, सारे जुने जाळून किंवा पुरुन टाकण्याचा आवेशपूर्ण विचार आला आहे. नव्याची रचना करतांना जे जुनाट झाले आहे ते अपरिहार्यपणे नष्ट करावेच लागते. सृष्टीत सुद्धा ही प्रक्रिया सदैव चालू आहे. पण त्यांनीच एका दुसऱ्या कवितेत सर्वच्यासर्व जुने उखडून टाकणे इष्ट नव्हे असाही विचार मांडला आहे. जुन्यांतला सत्वांश स्वीकारावाच लागतो. तरुणांना नवरचना करतांना या विचाराचीच कास धरावी लागणार आहे. काय जपायचे आणि काय मोडायचे याचा विवेकच नसेल तर तारुण्याला, बंडखोरीला कोणते रूप येते याची अनेक उदाहरणे इतिहासाच्या पानांतून विखुरलेली दिसतात. हातात मशाल घेऊन

दिसेल त्या वस्तूला किंवा वास्तूला आग लावीत सुटणे या माथेफिरु वृत्तीला तारुण्याची उर्मी म्हणून गौरविता येईल का ?

तारुण्य म्हणजे स्वप्ने पाहण्याचा आणि ती परिश्रमाने साकार करण्याचा काळ. ब्रिटिशांच्या पारतंत्र्याचं जोखड झुगारुन देण्यासाठी ज्यांनी इंग्रज अधिकाऱ्यांचे दहशतवादी भूमिकेतून खून पाडले. त्यांना मी तरी 'अविचारी', 'वाट चुकलेले' अशी संज्ञा देणार नाही. स्वातंत्र्याच्या तीव्र इच्छेने धडाडून पेटलेले त्यांचे समग्र जीवन हा एक दिव्य होम होता. साऱ्या वैयक्तिक सुखाच्या समिधा आपल्या हातांनी त्यांनी त्या होमात टाकल्या होत्या. त्याग आणि बलिदान यांचे ते तेजस्वी - धगधगीत रूप होते. हे तरुण अधीर - उतावळे होते. पण त्यांच्या उतावळेपणाचे एक विशिष्ट तर्कसंगत, तत्त्वज्ञान होते. यांत संशय नाही. अन्यायाच्या सहस्त्र फणा उभारून साम्राज्यशाहीचा महासर्प सर्वत्र विषारी फूत्कार टाकीत होता. अशा वेळी तरुण मनात उचंबळून आलेला 'साहसी विचार' कांहीतरी नवे घडवू शकतो. त्या सर्पाचा फणा ठेचून काढण्याचा प्रयत्न केवळ तरुण मनोवृत्तीलाच पेलण्यासारखा होता. या देशातल्या कित्येक वेड्या समजल्या गेलेल्या क्रांतीकारकांच्या मन:स्थितीचे वर्णन विनायक दामोदर सावरकर नावाच्या क्रांतिकारकानेच केले आहे. संसाराकडे पाठ फिरवून जन्मठेप आणि फाशी यांना कवटाळलेल्या क्रांतिप्रवण तरुणांबद्दल काय बोलावे ? दाहक असेल त्याला कडकडून भेटण्याचा सोस हेच खरे तर तारुण्याचे रोमँटिक लक्षण आहे. फासावर जातानाही भगतसिंग छाती काढून ताठ मानेने चालत होता. ही मरणाला आव्हान देणारी बंडखोरी कुणाला अर्थशून्य वाटेल पण या मनोवृत्तीला आणि कृतीला तत्त्वज्ञानाचा आधार आहे. नवनिर्मितीच्या दिशेने या क्रांतिकारकांची पाऊले योग्य दिशेनी पडत होती. राष्ट्र घडविण्याची अदम्य इच्छा त्यात सामावली होती.

आज पंजाबमध्ये अतिरेकी तरुणांनी भारतीय लोकांचेच म्हणजे स्वजनांचे त्यातही निरापराध लोकांचे खून पाडण्याचे सत्र सुरू केले आहे. रक्तपात, लुटालुट, जाळपोळ आणि खून यांच्या माध्यमातून जी चळवळ हे लोक करीत आहेत त्याच्या मागील क्षुद्र विचारसरणी सहज लक्षात येते. स्वातंत्र्यपूर्व काळातले पंजाबातले तरुण हिंदुस्थानातल्या स्वातंत्र्यासाठी प्राण देत होते. आता देशाचा तुकडा तोडून टाकण्यासाठी धर्माचे नाव पुढे करून आजचे तरुण रक्तपात करीत आहेत. ही विचारसरणीच मुळात भ्रमिष्ट आहे. योग्य तत्त्वज्ञानाच्या अभावी बंडखोर तरुणांची

चळवळ विनाशाकडे घेवून जाते. तारुण्याला विवेकपूर्ण तत्त्वदृष्टी मिळाली नाही तर ते तारुण्य व्यक्तीला आणि राष्ट्राला कोणत्या खड्ड्यात घेवून जाईल. हे सांगता येत नाही. चेस्टर फील्डने एका ठिकाणी असे म्हटले आहे की, 'दारूड्याला ज्याप्रमाणे आपण शुद्धीवर आहोत असे वाटते. त्याप्रमाणे तरुणांना आपण शहाणे आहोत असे वाटते.' पण कोणी काही म्हटले तरी क्रांतीची ध्वजा फडकविण्याचे कार्य तरुण रक्त करू शकते. जगाचा इतिहास चाळून पाहिला तर बंडखोर वृत्तीच्या तरुणांनीच देशाच्या सामाजिक आणि राजकीय आणि अन्य अनेक क्षेत्रात नावीन्य निर्माण केले. नावीन्याचे आकर्षण हा तरुण मनाचा धर्मच असतो.

तारुण्यातल्या उत्कट ऊर्मीला - क्रियाशीलतेला विधायक विचारांची जोड मिळणे मात्र आवश्यक असते. शिवाजीच्या तारुण्यात त्यांच्या बंडखोर व महत्त्वाकांक्षी मनोवृत्तीला आणि साहसाला स्वराज्य स्थापनेचा उदात्त विचार लाभला होता. संभाजीच्या उतावळ्या तारुण्याला मात्र विकारांच्या मागे कांही काळ भरकटत जावे लागले केवळ वयाने तरुण असणे याला फारसा अर्थ असत नाही. तारुण्य ही काही नुसती शारीरिक अवस्था नाही. शरीराचे तारुण्य काही वर्षातच गळून पडते. पण मनाचे, विचारांचे आणि भावनांचे यौवन दीर्घकाळ साथ करू शकते. वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी सुद्धा कित्येकांची मने जातिवंत तारुण्याने आशावादी विचाराने ओथंबलेली असतात. त्यांच्या मनात तारुण्याची एक मशाल अखंड जळत असते. पाजळत असते. वाऱ्यावादळात सुद्धा ती विझत नाही. आपल्या मानसिक आणि बौद्धिक तरुणपणाची आपल्याला जरूरी आहे. कित्येक शतकांच्या झोपेतून जागे झालेले राष्ट्र विचार आणि भावना यांच्या सळसळत्या तारुण्याने उठून उभे राहावे हीच इच्छा आहे. पण आज पहावे तर आपापल्या स्वार्थाच्या निरुंद घरकुलात ते घरकोंबडे बसून राहिले आहेत. आपले क्षीण म्हातारे झालेले पंख सावरून बसले आहेत. ते वयाने तरुण असतील पण वृत्तीने झिजून गेलेल्या या कोंबड्यांच्या दुबळ्या आरवण्याने सूर्य कसा उगवणार ? ध्येयवादाने भारलेल्या मनातच तारुण्याचे खरे सामर्थ्य आढळते. विचारांच्या अधिष्ठानावर महत्त्वाकांक्षा, बंडखोरी नवरचनेची जिद्द घेऊन तरुणमने उफाळून उठतात यापेक्षा अधिक काय सांगायचे ?

येथे मला कवी अनिलांच्या 'अजून यौवनात मी' या कवितेची आठवण होते. 'अजून' या शब्दाचा अर्थ मी 'जुना झालेला नाही' 'नवीन' असा करतो. रसिक, ध्येयवादी मन कधी जीर्ण होत नाही. त्या मनाचे रंग ताजे राहातात.

सूर कधी बेसूर होत नाहीत. ओठावरचे गीत तुटत नाही. दृष्टीतले कुतूहलआटत नाही. जगण्यातली सुखदु:खं आसुसलेल्या अंत:करणात स्वीकारण्याची ज्याची आसक्ती कधीच मावळत नाही ते मला खरं तारुण्य वाटतं. अनिलांनी म्हटलं आहे. -

**अजून ऊन रक्त हे भरे नसानसांतुनी**
**तसाच रोमहर्ष आणि अंग ये थरारुनी**
**विरक्ती ? छे ! सदानुरक्ति, भक्ति ?**
**प्रेमभक्त मी तरंग ऊर्मी प्रीतिच्या**
**अजून यौवनात मी !**

●●●

# हे राहूनच गेलं !

आपण गतायुष्याबद्दल जेव्हा विचार करतो तेव्हा मनाला अशी खंत वाटते की, अरे ! कितीतरी गोष्टी करायच्या राहूनच गेल्या. अमुक मिळवावं, तमुक पाहावं, दूर देशात प्रवास करावा, भिन्न भिन्न लोकांच्या जीवनपद्धतींचा अभ्यास करावा, कारखानदार व्हावं, कुठल्यातरी चळवळीचं नेतृत्व करावं. पण मनातल्या या साऱ्या गोष्टी तशाच राहून गेल्या. आयुष्य मात्र वाहून गेलं. वाहून गेलेलं पाणी पुन्हा परत येत नाही. ते कायमचं गेलं. अनेक मनोराज्यं करण्याचं एक रोमँटिक वय असतं. वयापेक्षाही वृत्ती असते असं म्हटलं तर अधिक बरोबर ठरेल. एका विशिष्ट वयात आणि वृत्तीत मी काही रोमहर्षक स्वप्नांचा पाठलाग केला. आता शांतपणानं विचार करताना असं वाटतं की, तो साराच वेडेपणा होता. पण एखादी सुंदर साहसी कल्पना मनात फुलवावी आणि तिच्यामागं बेभांनपणानं धावावं यात देखील आनंद होता. आजच्या एखाद्या विजयापेक्षा तारुण्यातल्या एखाद्या पराभवाला सुद्धा अधिक सौंदर्य होतं. आज हा वेडेपणा वाटतो. पण त्यावेळी असली व्यवहारी चिकित्सा कुणीच करीत नसतो. सीतेच्या प्रेमासाठी रामासारखा विवेकी तरुणसुद्धा सुवर्णमृगामागे धावत जातो मग आमच्यासारख्या सामान्य माणसानं एखाद्या फुलपाखराचा पाठलाग केला तर त्यात काय चुकलं ? फुलपाखरानं मोह घालणं आणि आपण मोहवश होणं हे सुद्धा सुखाचं आणि दु:खाचं सुंदर रूपच आहे.

मित्रहो, केवळ दृष्टान्त म्हणून मी फुलपाखराचं उदाहरण घेतलं. आमच्या वाट्याला डांस आणि चिलटांशिवाय दुसरं काही आलं नाही. केवळ मुद्दा स्पष्ट करण्यासाठी मी फुलपाखराचा उल्लेख केला. आज सहज मनात विचार येतो की जे जे मिळवायचं आपण ठरवलं होते. त्यातलं किती आपल्या पदरात खरोखरच पडलं? थोडासा आढावा तरी घेऊन पाहू.

मलाच आश्चर्य वाटतं पण शाळेत असतांना आपण एक उत्तम क्रिकेटर व्हायचं ही कल्पना एके दिवशी माझ्या मनात चमकली. तिनं माझ्या मनाचा पूर्ण ताबाच घेतला म्हणाना ! कित्येक वर्षापूर्वीची गोष्ट असेल ही. त्यावेळी मी एस.एस.सी. च्या वर्गात होतो. शाळेच्या मैदानावर एके दिवशी क्रिकेटचा सामना

ठरला होता. सोलापूरातल्या दुसऱ्या शाळेतल्या क्रिकेट टीमनं लागोपाठ दोन वेळा आमच्या संघाला पराभूत केलं होतं. आता त्या जबरदस्त संघाबरोबर हा सामना व्हायचा असल्यामुळं मैदानावर विद्यार्थी - विद्यार्थिनींची, क्रिकेट प्रेमी नागरिकांची झुंबड उडाली होती. दोन्ही संघ अटीतटीनं खेळत होते. आम्ही खेळाडूंना ओरडून उत्तेजन देत होतो, विद्यार्थिनीही आपले हातरुमाल फडकावीत होत्या. टाळ्या, शिट्ट्या आणि आरोळ्या यांनी सारं वातावरण कोंदलं होतं. माझ्याच वर्गातला एक विद्यार्थी संघनायक होता. त्यानं तर त्यादिवशी कमाल केली. सर्वात अधिक धावा काढून त्यानं आमच्या संघाला विजय मिळवून दिला. चौकार आणि षट्कार यांचा त्यानं वर्षाव केला. शिक्षकांनी त्याचं केवढं कौतुक केलं ! खांद्यावर बसवून त्याला क्रीडांगणावर त्यांनी मिरवलं. मुख्याध्यापकांनी हार घालून त्याचा गौरव केला. त्या आकर्षक चेहऱ्याच्या धष्टपुष्ट क्रिकेटरशी हस्तांदोलन करुन त्याचं अभिनंदन करण्यासाठी आम्ही धडपडत होतो. पण 'लेडीज फर्स्ट' असं मिस्कीलपणानं म्हणून तो मुलींकडे वळला. आम्ही कितीतरी वेळ काहीशा मत्सरानं हेव्यानं ते दृश्य पाहात होतो. एकजण म्हणाला,

'चैन आहे बेट्याची ! आम्ही कबड्डी, खो खो खेळतो. आमचं कुणी असं कौतुक करीत नाही. चार चेंडू फटकावले म्हणजे काय स्वर्गाला हात लागले का ?' पण या उद्‌गारात मत्सर होता. खेळाडूपणा नव्हता. एक दिवस चांगली बॅटिंग केल्याबरोबर तो माझा वर्गमित्र 'हीरो' झाला होता. आम्ही मात्र अपयशी व्हिलनसारखे त्याच्याकडं पाहात होतो. पण त्या दिवसापासून आपणही क्रिकेटर व्हायचं हे वेड माझ्या डोक्यात घट्ट बसलं. येन केन प्रकारेण मी मुख्याध्यापकांचं मत वळवण्यात यशस्वी झालो आणि शाळेच्या शिकाऊ टीममध्ये त्यांनी मला प्रवेश दिला. माझी कल्पना अशी होती की गोलंदाजानं टाकलेला प्रत्येक चेंडू झोडपून काढणं फारसं कठीण नसावं. बॅटिंगप्रमाणं बॉलिंगदेखील मी सहज करु शकेन असाही माझा समज होता. पहिल्या दिवशी बॅट हातात घेऊन ग्राऊंडवर निघालो तेव्हा काही दिवसांतच आपण एक नामवंत क्रिकेटपटू होणार ही कल्पना मनात घोळू लागली. पण पुढच्या चार-पाच दिवसांतच माझ्या कल्पनेचा पार त्रिफळा उडाला. बॅट्समननं टोलवलेला चेंडू झेलतांना तो माझ्या नाकाचा वेध घेऊन गेला. मी बॅटिंग करतांना बॅट आणि बॉल यांची सहसा भेटच होत नसे. एकदा केव्हातरी सुमुहूर्तावर ती भेट झाली आणि जवळच्याच एक दुष्ट फिल्डरने माझा झेल पकडून

मला बाद केलं. हळूहळू हा उत्साह मावळत चालला. क्रिकेटच्या एखाद्या मैत्रीपूर्ण सामन्यातही एक्स्ट्रा खेळाडू म्हणून सुद्धा माझा समावेश शाळेत असताना कधी झाला नाही. क्रिकेटशी आपलं नातं जुळणं शक्य नाही ही जाणीव जसजशी वाढत गेली तसतसा मी या खेळाचा धसकाच घेतला. पण अजूनही मनात कुठंतरी खोल आकर्षण आहे. गोलंदाज आणि फलंदाज यांचं कर्तृत्व पाहिलं की मनातल्या मनात त्यांच्यासमोर नतमस्तक होतो. क्रिकेटर होण्याचं माझं त्या वयातलं स्वप्न हास्यास्पद होतं हे आज मला पटतं. पण हा खेळ आपण खेळू शकत नाही या जाणीवेनं शाळा-कॉलेजात असतांना मी अस्वस्थ झालो होतो, हताश झालो होतो.

एक गोष्ट मात्र मला क्रिकेटनं शिकवली आपण हातात बॅट घेऊन वीराच्या आवेशात उभे राहात असलो तरी मनासारखा एकही चेंडू कधी पडत नाही. जीवनाच्या क्रिकेटची ही दारुण अवस्था आहे. उसळणारे चेंडू, तिरकस चालीचे चेंडू, सरळ येऊन त्रिफळा उडवणारे चेंडू हे योग्य रीतीनं ओळखण्यातच बॅट्समनचं कौशल्य असतं. माझ्याबद्दल म्हणायचं तर मी चौकार आणि षट्कार कधीच ठोकला नाही. एकेक धाव मुश्किलीनं जमवीत आयुष्याच्या ग्राऊंडवर हातात बॅट घेऊन अद्यापि उभा आहे. एकदोन वेळा पंचानी बाद म्हणून मला घोषित करावं असं 'अपिल' करण्यात आलं. अजून तरी हे पंच माझ्याबाबतीत सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेऊन आहेत. उत्तम क्रिकेटर होणं काय किंवा आयुष्याच्या मैदानात कर्तृत्व गाजवणं काय दोन्ही गोष्टी सारख्याच अवघड आहेत. स्वत:ला विसरल्याशिवाय परिश्रमांची पराकाष्ठा केल्याशिवाय ध्यानी, मनी, स्वप्नी एकच ध्यास घेतल्याशिवाय गावसकर उदयाला येत नाही. आपल्या प्रेयसीची जेवढी आराधना त्यानं केली नसेल त्याच्या शतपटीनं त्यानं बॅटचा अनुनय केलेला आहे. तीच त्याची अधिष्ठाची देवता. कोणी तलवारीनं इतिहास लिहितो. कोणी आपल्या सुरांनी इतिहास घडवतो. कुणाच्या बाहुबलात नव्या इतिहासाचं सर्जन करण्याची शक्ती असते, कुणाचे शब्द इतिहासाला दिशा देतात. त्याप्रमाणं गावसकरच्या बॅटनं भारतीय नव्हे तर जागतिक क्रिकेटच्या इतिहासाला वैभव प्राप्त करुन दिलं. क्रिकेटर होण्याचं शाळेतलं माझं ते हळवं आणि दुबळं स्वप्न वितळून गेलं हे चांगलं झालं पण आज क्रिकेटचे सामने पाहाताना तेंडूलकरच्या रूपानं ते स्वप्न साकार होत असल्याचं मी अनुभवतो. जे मी करू शकत नाही ते कुणीतरी करतो हे आत्मीयतेनं पाहाता येणं यात देखील एक आगळा आनंद आहे. असो सोलापूरच्या आणि भारतीय क्रिकेटच्या सुदैवानं मी

खेळाडू या नात्यानं पुन्हा कधीही ग्राऊंडवर उतरलो नाही. माझी ही क्रिकेटसेवा नोंदवून ठेवण्यासारखी आहे.

आपण काय व्हायचं हे आपल्या हातात असतं असा कित्येकांचा समज आहे. कदाचित तो खराही असेल. पण कुठली तरी एक अदृश्य शक्ती मनुष्याच्या आशा आकांक्षांना आपल्या लहरीप्रमाणं आकार देत असते असंही मला कधीकधी वाटतं. कॉलेजात विद्यार्थी असतांना काही नामांकित कायदेपंडिताची भाषणं मी ऐकली होती. त्यांच्या वक्तृत्वाचा, विचारांचा माझ्यावर पुष्कळच प्रभाव पडला होता. लो. टिळक यांनी कायद्याचा अभ्यास केला नसता तर त्यांच्या लेखनात आणि भाषणात इतका निर्दोष युक्तिवाद, उत्तम तार्किक संगती आली नसती आणि त्याच्याअभावी ते इंग्रज सरकारशी इतक्या मुत्सद्दीपणानं लढू शकले नसते. अशा अर्थाची विधानं मी कुठल्याशा पुस्तकात वाचली. त्या काळात वकील हे बुद्धिमत्तेचं प्रतीक मानलं जायचं. बहुतेक राजकीय पुढाऱ्यांनी कोर्टात वकिलीही केली होती. माझ्याही मनात या व्यवसायाबद्दल थोडंफार आकर्षण वाढू लागलं होतं. काही वेळा न्यायालयात जाऊन वकीलाचं प्रतिपादन कसं असतं हेही ऐकलं होतं. लॉ कॉलेजात पहिल्या वर्षाला माझं नाव नोंदवलं. पहिल्या सहामाहीची फी भरली आणि आता आपण लॉ-स्टुडंट झालो या आनंदात दोनचार मित्रांबरोबर लॉ कॉलेजाच्या कॅन्टीनमध्ये टोस्ट आणि मिसळ यांच्यावर ताव मारला. कायद्याची पुस्तकं आता विकत घ्यायची आणि त्यांच्या पद्धतशीर अभ्यासाला सुरुवात करायची असं ठरवून टाकलं. प्रत्यक्षात त्या पुस्तकांचा आकार पाहिल्यावर आणि पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचं स्वरूप समजल्यावर 'सीदन्ति मग गात्राणि मुखंच परिशुष्यति' अशी माझी अवस्था झाली. पण दुसऱ्या वर्षाचा एक अनुभवी विद्यार्थी (त्यानं चारपाच वर्षे कॉलेजात काढली होती) मला म्हणाला,

'अरे ही लठ्ठ पुस्तकं वाचण्यासाठी नाहीत. ती 'शो' साठी असतात आमचे वडील वकील म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत. असले ग्रंथ ते कपाटात ओळीनं लावून ठेवतात. येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना वकीलसाहेबांच्या विद्वतेची ओळख असल्या जाडजूड ग्रंथांवरुन पटते. परीक्षेसाठी शंभर दीडशे पानाचं गाईड वाचलं की काम भागतं.'

पण असल्या सोप्या युक्त्यांचा अवलंब करुन आपल्याला कायद्याचं ज्ञान कसं मिळवता येईल या शंकेनं मी व्याकुळ झालो. एखाद्या नाटकात किंवा चित्रपटात

तडफदार वकीलाची भूमिका पाहाणं वेगळं आणि तसा यशस्वी बुद्धिमान वकील होणं वेगळं. एकंदरीत आपल्याला वकिलीचा अभ्यास करणं जमेल का हा प्रश्न मला टोचू लागला. माझी शंका त्या आठवड्यात मी अनेकांजवळ बोलून दाखवली. माझे प्राध्यापक म्हणाले,

'हा निर्णय तुम्ही स्वत:च करायचा आहे. तुमचं साहित्यावर विशेष प्रेम आहे. साहित्य वाचण्यात आणि लिहिण्यात तुम्हाला रस आहे. एखादी कथा लिहिण्याच्या ऐवजी घटस्फोटाची नोटीस लिहिणं तुम्हाला जमेल काय ? पुष्कळ चांगले वकील साहित्यिक आहेत. पण म्हणून वकील झाल्यावर साहित्यासाठी तुम्हाला किती वेळ देता येईल याचा विचार करा. मी साहित्याची वकिली करीत नाही. पण तुम्हाला वाटतं तितकं वकीलाचं काम आणि त्याची भूमिका सुलभ नाही.'

माझ्या दृष्टीसमोर आवेशानं आपल्या अशीलाच्या बाजूनं आर्ग्युमेंट करणारे कित्येक वकील उभे राहिले. 'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकात शायलॉकसारख्या खलपुरुषाला आपल्या वकीली कौशल्यानं पूर्णपणे पराभूत करणारी पोर्शिया आठवली. वकिली व्यवसायात 'थ्रिल्' असतं असं मला वाटायचं. हरतऱ्हेची माणसं या व्यवसायात भेटतात. जीवनाची जी बाजू सर्वसाधारण मनुष्याला सहसा दिसत नाही ती वकीलाला पाहाता येते. मनुष्य स्वभावाचा ज्याला बारकाईनं अभ्यास करावासा वाटतो त्यानं वकील व्हावं यात शंका नाही. एका कायदेपंडितानं आपल्या आत्मकथनात म्हटलं आहे. 'माणूस किती रंगी बेरंगी असू शकतो, तो किती दांभिक, किती अहंकारी आणि किती निर्दय असतो याचं मला आकलन या व्यवसायात झालं. सज्जनांशीही माझा संबंध आला पण मला बदमाश अधिक भेटले. समाजाच्या वरिष्ठ वर्गात, राजकारणी पुढाऱ्यात बदमाशांची संख्या बरीच मोठी आहे. समाजाच्या या सडलेल्या भागाचं दर्शन मला नेहमीच अस्वस्थ करतं. पण वस्तुस्थिती स्वीकारलीच पाहिजे. फार संवेदनशील वृत्तीच्या स्वप्नाळू माणसानं या व्यवसायात येऊ नये. त्यानं कवी व्हावं.' कायदा भावना जाणीत नाही हे खरं आहे. जीवनाकडे वास्तवनिष्ठ, व्यवहारी दृष्टीनं पाहून जीवन जगण्याचं शिक्षण या व्यवसायात मिळू शकतं. पण वकील होऊन काळा झगा अंगावर घालणं आणि न्यायाधीशासमोर आपली केस मांडणं आपल्याला जमणार नाही, हा शहाणपणाचा निर्णय मी घेऊन टाकला. एक दोन नाटकांत वकीलाची भूमिका मात्र मी बऱ्यापैकी केली.

जीवनाच्या रंगभूमीवर आपण कोणती भूमिका वठवायची याचा निर्णय कुणीतरी अज्ञात सूत्रधार घेत असतो. खरं तर प्रत्येक भूमिकेला एक विशिष्ट आकर्षक वलय असतं. जी भूमिका वाट्याला येईल ती मन आणि आत्मा ओतून केल्याशिवाय आयुष्याचं नाटक काही रंगत नाही. भूमिकेशी अंत:करणाच्या तारा जुळाव्या लागतात. मला क्रिकेटर होणं शक्य नव्हतं. वकील होणंही जमलं नसतं. कुठलीच भूमिका सोपीही नसते आणि अवघडही नसते. एका निरुपद्रवी प्राध्यापकाचा 'मेकअप' करुन अनेक वर्षे रंगभूमीवर वावरलो, माझ्यातला चोखंदळ प्रेक्षक, मला म्हणतो -

'मनापासून काम कर. समरस हो. समरसतेतून मिळणारी सुखदु:खं हेच तुझं पारितोषिक.'

●●●

# त्याचा येळकोट राहीना !

कधी कधी मनात एक विचार असा येतो की, त्यामुळं मग अगदीच विषण्ण होऊन जातं. साधुसंतांची चरित्रं मी वाचली आहेत. एखादं मळकट झालेलं वस्त्र कसोशीनं धुवून ते स्वच्छ करावं त्याप्रमाणं कित्येक संतांनी समाजाला स्वच्छ आणि शुद्ध बनवण्याचा जन्मभर प्रयत्न केला. पण अशा नि:स्वार्थी सत्पुरुषांना जगात काय मिळालं ? ते निंदेचे आणि हेटाळणीचे विषय झाले. शिव्याशापांचे धनी झाले. उपेक्षा आणि उपहास याशिवाय त्यांच्या पदरात काय पडले ? पण तरीही जन्मभर हे लष्करच्या भाकरी भाजीत राहिले. आपली चूल मोडून दुसऱ्याची चूल मांडीत बसलेल्या या महाभागांची व्यवहारी जगानं कुचेष्टा केली तर त्यात आश्चर्य कसलं ? पण एक गोष्ट मात्र निश्चित की, या संतांच्या वाट्याला जे भोग आले ते विपरीत असूनही आपल्या वाटेने ते चालतच राहिले. त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न जगानं केला नाही. उलट संतांचा छळ करण्यात एक प्रकारचा आसुरी आनंद मात्र लोकांनी मिळवला. असं का घडावं हा विचार मनाला क्लेश देतो. कारण उत्तर तर सापडत नाही. मग संत सज्जनांना नेहमीच दुर्जनांनी विरोध करावा हा एक अलिखित संकेत आहे, असलं न पटणारं विधान स्वीकारावं लागतं. संत तुकारामांनीही या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांनीही मूळ प्रश्नाची सोडवणूक होत नाही. ते म्हणतात,

'हत्तीच्या पाठीमागे एखादे कुत्रे भुंकत भुंकत जात असते. आता त्या मच्छराकडे हत्तीचे लक्षही नसते पण तरीही भुंकत राहाणं हा त्याचा स्वभावधर्म आहे. एखादे पिसाळलेले माकड सिंहाचीही कुचेष्टा करते. त्याच्या मूर्खपणाला काय करायचे ? संतांचा छळ करणारे लोक आपल्याच हातांनी आपल्या तोंडाला काळे फाशीत असतात. कारण तो त्यांचा स्वभाव असतो. स्वभावाला काय करायचे?'

'संत तुकारामांनी 'स्वभावावर' बोट ठेवले आहे. पण या स्वभावाचे मूळ कशात आहे याचं स्पष्टीकरण मात्र मिळत नाही. दुर्योधनानं एकदा श्रीकृष्णाला म्हटलं होतं, 'धर्म म्हणजे काय हे मला कळतं. पण माझी धर्माकडं प्रवृत्ती होत

नाही. अधर्मापासून माझी निवृत्ती होत नाही. तो माझा स्वभाव आहे.' हा असा का बनत गेला त्याची कारणमीमांसा केली पाहिजे. स्वभावात बदल होत नाही अशा आशयाचं एक दृढ मत आहे. कुत्र्याचं वाकडं शेपूट कधी सरळ होणं शक्य आहे का असा प्रश्न विचारण्यात येतो. ज्ञानेश्वरांनीही दंश करणे हा विंचवाचा स्वभाव म्हणूनच वर्णिला आहे. तुकोबांचा आणखी एक अभंग या संदर्भात उल्लेखिता येईल. ते म्हणतात.'

**आधी होता वाघ्या, दैवयोगे झाला पाग्या।**
**त्याचा येळकोट राहीना, मूळ स्वभाव जाईना।**
**आधी होती दासी, पट्टराणी केले तिसी।**
**तिचे हिंडणे राहीना, मूळ स्वभाव जाईना।**

दुसऱ्या एका कवितेत त्यांनी याच विचारांची वेगळ्या दृष्टांतांच्या माध्यमातून पुनरुक्ती केली आहे. 'गाढवाला कितीही सजवलं तरी ते काही घोडे होणार नाही. श्वानाला पालखीत बसवलं तरी त्याचं भुंकणं थांबणार आहे काय ? तुका म्हणे स्वभावकर्म काही केल्या न सुटे धर्म'

मूळ स्वभाव बदलत नाही हे मत मला तरी काही अंशी पटत नाही. बदलणं हा एक सृष्टीचा नियम आहे. ऋतू बदलतात. नद्यांचे ओघही बदलतात. कालमानात फरक पडतो. रखरखीत वाळवंटातही हिरवं नंदनवन निर्माण करता येतं. माणसांचे स्वभावसुद्धा याला अपवाद नाहीत. त्यांच्यातही परिवर्तनाची लाट येते आणि पाहाता पाहाता ही माणसं पार बदलून जातात. बदलत राहाण्याची प्रक्रिया घडत नसेल तर या जीवनाला जे जिवंतपण आज आहे ते उरणार नाही. कधी धुकं, कधी चांदणं तर कधी स्वच्छ ऊन आणि केव्हा केव्हा मिट्ट काळोख, कधी अंधार आणि प्रकाश यांची सरमिसळ, अशी जीवनाची एक कडू आणि गोड चव आहे.

'अश्रूंची झाली फुले' या नाटकाचा नायक एक ज्ञानवंत, पापभीरु, सज्जनवृत्तीचा प्राध्यापक असतो. प्रेमळ, उदार आणि रसिक असलेला हा माणूस आपल्या महाविद्यालयावर, विद्यार्थ्यांवर आणि सहकारी प्राध्यापकांवर प्रेम करीत असतो. पण त्यानंच वाढवलेला, प्रेमानं जोपासलेला त्याचा एक विद्यार्थी प्राचार्य होण्याच्या महत्त्वाकांक्षेनं या उमद्या माणसाचा जीवघेणा विश्वासघात करतो. हा निरपराधी नायक तुरुंगात खडी फोडीत बसतो आणि इथूनच त्याच्या वृत्तीत जबरदस्त परिवर्तन होतं. तुरुंगातून सुटल्यानंतर तो एक स्मगलर बनतो.

या प्रकारचं अत्यंत अनपेक्षित, आश्चर्यकारक परिवर्तन मनुष्याच्या स्वभावात होऊ शकतं काय ? ज्यानं आपलं अर्ध्यापेक्षा अधिक आयुष्य ज्ञानमय, संस्कारित वातावरणात व्यतीत केलं, ज्यानं आपल्या महाविद्यालयात काही उत्तम आदर्श विद्यार्थ्यांसमोर ठेवले, तो प्राचार्य स्मगलरांच्या टोळीचा नायक होऊ शकतो हे सकृद्दर्शनी मनाला पटत नाही. त्याच्या स्वभावात या प्रकारची काही बीजं सुप्तावस्थेत आहेत असं कुठंही जाणवलेलं नव्हतं. पारिजातकाच्या फुलासारखं सुगंधित कोवळं आयुष्य आपल्या पत्नीसह जगत राहिलेला हा शिक्षणप्रेमी, नैतिक मूल्यांचा आदर करणारा विचारवंत इतका अध:पातित होऊ शकेल काय ? काही टीकाकारांनी हे परिवर्तन नाटककारानं ओढून ताणून आणलेलं आहे. त्यात कोणत्याही प्रकारची स्वाभाविकता नाही अशी टीका केली आहे. या संदर्भात मी बराच विचार केला आणि आता अशा निष्कर्षाला मी आलो आहे की, मनुष्याच्या स्वभावात काही अकल्पनीय बदल घडू शकतात. 'त्याचा येळकोट राहीना, मूळ स्वभाव जाईना' या तुकोबांच्या वचनात जरी सत्य असलं तरी देखील मूळस्वभावात विश्वास बसू नये अशी संक्रमणं होऊ शकतात. माझ्या माहितीतलं एक उदाहरण देतो.

माझ्या एका परिचिताला, त्याला कल्पना नसेल इतक्या जवळून मी पाहिलं आहे. त्याच्या घरातलं वातावरण अत्यंत शुद्ध, सात्विक, धार्मिक होतं. त्या घरात त्याच्यावर जे संस्कार झाले त्यामुळं तो पराकाष्ठेचा आस्तिक आणि पापभीरु बनला. एका शाळेत काही वर्षे त्यानं अध्यापन केलं. अत्यंत शुद्ध चारित्र्याचा हा शिक्षक होता. कोणत्याही प्रकारच्या अनैतिक गोष्टींशी त्याचा स्वप्नातसुद्धा संबंध आलेला नव्हता. त्याच्या आयुष्याची वाट ठरलेली होती. नीट नाकासमोर पाहून नेमस्तपणानं चालणारा हा माणूस एकदा अशा एका भोवऱ्यात सापडला की त्याच्या आयुष्याची आणि त्याच्या मन:प्रवृत्तीची दिशाच पार बदलून गेली. कुठल्याशा लॉटरीत त्याला दहा लाख रुपयांचा अचानक लाभ झाला. कुणीतरी त्याच्या डोक्यात परदेशवारीची कल्पना रुजवली. विलायतेचा प्रवास करून आलेल्या या शिक्षकाच्या स्वभावात अंतर्बाह्य बदल झाला. तो शाळेतला शिक्षक आणि आताचा एक रंगेल व्यसनी माणूस अशी दोन परस्परविरोधी चित्रं माझ्यासमोर उभी राहिली. मी त्याला एकदा विचारलं,

'तुझ्या स्वभावात आणि जीवनक्रमात इतका चमत्कारिक बदल होईल असं

मला वाटलं नव्हतं. आत्ताचे तुझे हे रंग ढंग लोकांच्या चर्चेचा विषय झाले आहेत. तुला याबद्दल काय वाटतं ?'

त्यानं आपल्या ओठात एक सिगरेट ठेवून ऐटीनं पेटवली. आणि मग मला म्हणाला, लोकांच्या चर्चेची आणि मतांची मला फिकीर करण्याचं कारण नाही. ज्या व्यवसायात मी पैसा गुंतवला त्या व्यवसायात माझा दसपटीनं फायदा होतो. माझे हॉटेल आणि परमिट रुम यातून मला भरपूर पैसा मिळतो. या पैशाच्या बळावर मी सगळी सुखं विकत घेतली. आजपर्यंत परंपरेच्या वाटेनं चालत होतो. ती वाट आता मी पुन्हा कधी स्वीकारणार नाही. देव आणि धर्म, नीती आणि संस्कृती या सगळ्या भंपक कल्पना आहेत. पैसा हे एकमेव सत्य आहे. पैसा हाच परमेश्वर आहे. सारी पापं पैशाच्या स्पर्शानं पुण्यशील होतात.

हा गृहस्थ आता सर्वार्थानी बदलला होता. धर्मराजानंच दुर्योधनाचं अनुकरण करावं किंवा रामानं रावणाचं समर्थन करावं म्हणजे जो धक्का बसेल तो याच्या बदललेल्या वृत्तीमुळं मला बसला. खरं तर या अकल्पित परिवर्तनाची चिकित्सा कशी करायची ? अखेर निष्कर्ष निघतो तो इतकाच की सारी सृष्टी परिवर्तनशील आहे. माणसांतही या प्रकारचे अगम्य वाटणारे बदल घडू शकतात. त्यामुळंच 'अश्रूंची झाली फुले' मधला प्राचार्य अपवादात्मक वाटला तरी तो वास्तविक असू शकतो. दीर्घकाळ तुरुंगात राहिलेल्या कित्येक कैद्यांच्या आचारविचारात बदल झालेले दिसतात. वाल्याचा जर वाल्मीकी होऊ शकतो तर एखाद्या विद्यानंदाचा स्मगलर झाला तर त्यात आश्चर्य मानण्याचं काही कारण नाही. ज्याप्रमाणं काही नद्यांचे प्रवाह बदलतात त्याप्रमाणं व्यक्तिस्वभावही बदलतात. 'त्याचा येळकोट राहीना' असं जरी संत तुकोबांनी म्हटलं असलं तरी ते स्थूलपणानं सांगितलेलं आहे. स्वत: तुकारामांच्याच वृत्तीत परिवर्तनं होत गेली. उत्तम व्यवहारानं धन जोडणारा हा तुका वाणी धनाकडं पाठ फिरवतो आणि 'विठ्ठल विठ्ठल' म्हणत कवित्व करू लागतो. हा देखील वृत्तीतला बदलच आहे. स्वत: तुकारामांनी कित्येक बदल आजूबाजूच्या लोकांत घडवून आणले 'आपणासारिखे करिती तात्काळ' हे संतांच्या व्यक्तित्वाचं सामर्थ्य असतं.

एक गोष्ट अशी की तुकोबांचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या त्यांच्या हितशत्रूंनी एक कारस्थान रचलं. एका सुंदर वेश्येला तुकोबांचा शीलभंग करण्याच्या कामगिरीवर नियुक्त करण्यात आलं. तिला आपल्या सौंदर्याचा गर्व होता. कोणत्याही पुरुषाला

आपण आपल्या जाळ्यात पकडू शकतो असा तिला आत्मविश्वास वाटत होता. ती तुकोबांकडे आली आणि आपल्या मोहपाशात त्यांना ओढण्याचा व्यर्थ प्रयत्न करू लागली. तुकाराम महाराज म्हणजे वैराग्याचं मूर्तिमंत प्रतीक होतं. त्यांच्या चित्तात त्या वेश्येच्या पतित जीवनाबद्दल करुणा उत्पन्न झाली. त्यांनी तिला आपल्या परिणामकारक वाणीनं असा उपदेश केला की तिच्याही मनातली वासनेची ठिणगी विझून गेली. विवेकाचं चांदणं पसरलं. तुकारामांचा हात धरण्यासाठी आलेली ती रूपसुंदर तरुण गणिका त्यांचे पाय धरून म्हणाली,

'महाराज, मी चुकले. मला क्षमा करा. आपल्यासारख्या महापुरुषाला फसवण्याचा नुसता विचार करणं हे सुद्धा पाप आहे. माझं आजपर्यंतचं आयुष्य चिखलात लोळण्यात गेलं. आता इथून पुढं माझ्या कल्याणाची वाट दाखवा.'

संत तुकोबा म्हणाले, 'पराविया नारी रखुमाई समान. भूतकाळाचा विचार करू नको. सुंदर भविष्यकाळ पुढे आहे. विठ्ठलाच्या सेवेत आपलं आयुष्य अर्पण कर.' त्या गणिकेच्या आयुष्याला एक नवी कलाटणी मिळाली. ईश्वरभक्तीचा मार्ग तिनं स्वीकारला. आता ती वेश्या उरली नव्हती. तिची भूमिका पार बदलली होती. एखाद्या पंडिताचा किंवा आचार्यांचा जसा अट्टल गुन्हेगार बनू शकतो, त्याप्रमाणंच एखाद्या कसबिणीच्या हृदयात सुद्धा नव्या मंगल जीवनाची पहाट फुलू शकते. 'तुकाराम' चित्रपटात तन्मयतेनं भूमिका केल्यामुळं विष्णुपंत पागनीस नावाचा नट तुकाराममय झाला. अशी कित्येक उदाहरणं देता येतात. आपल्याला ती अशक्य कोटीतली वाटली तरी ती संभवनीय असतात. स्वच्छ आकाशात एकाएकी काळेकुट्ट ढग जमा होऊ लागतात. विजा कडकडू लागतात. वादळ आणि पाऊस यांचं थैमान सुरू होतं. दिशा अंधारतात. पण एखाद्या तासातच पुन्हा वातावरण निवळून जातं. सूर्याचे किरण पुन्हा आसमंत उजळून टाकतं. क्षणोक्षणी अनेक प्रकारचे फेरबदल या सृष्टीत घडून येतात. परिवर्तन हा अपरिवर्तनीय स्वरूपाचा नियम आहे. काही बदल चांगले असतात. कांही बदल वाईट असतात. अंधार बदलून प्रकाश यावा, वासनेची जागा सुविचारानं घ्यावी, मृत्यूतून नवजीवन फुलावं ही अपेक्षा ठेवून आपण धडपड करावी. इतकंच आपल्या हाती आहे.

मानसशास्त्राच्या दृष्टीनं विचार केला तर 'त्याचा येळकोट राहीना, मूळ स्वभाव जाईना' या विधानातही पुष्कळसं तथ्य आहे याची कल्पना येते. जो तो आपल्या जन्मजात स्वभावाला चिकटून असतो. सिंहाचं कातडं पांघरुन बसलेल्या

कोल्ह्याला सिंहाचा 'अभिनय' थोडा वेळ करता येईल. पण काही झालं तरी या उसन्या अवसानामुळं त्याच्या मूलभूत प्रकृतीत बदल होण्याची शक्यता नाही. आपल्या जातबांधवांची कोल्हेकुई ऐकली की, त्यालाही त्या सुरात आपला सूर मिसळण्याची इच्छा होणारच. कार्ल्याच्या वेलीला आंबे लागल्याचं कधीही ऐकिवात नाही. किंवा द्राक्षांच्या सहवासात कार्ली ठेवली म्हणून ती गोड होण्याचा संभव नाही. कावळ्याच्या घरट्यात वाढलेली कोकिळा अखेर आपला जन्मजात गुणधर्म प्रगट केल्याशिवाय राहात नाही. या अर्थानं संत तुकोबांनी तो मार्मिक अभंग लिहिला आहे. त्यातून व्यक्त झालेल्या विचारांचा साधक - बाधक दृष्टीनं आपण आपल्याही अनुभवाच्या संदर्भात विचार केला पाहिजे.

●●●

# बोले तैसा चाले

'या पुरुप्रधान समाजरचनेत स्त्रीवर सर्वात अधिक अन्याय झाला आहे. एकीकडे तिला संस्कृतीची रचना करणारी शक्ती म्हणायचं आणि दुसरीकडे तिला दासी मानायचं. तिची पदोपदी विटंबना करायची. या विटंबनेतून सीता आणि द्रौपदीसारख्या महनीय स्त्रियाही सुटल्या नाहीत. पुरुषी संस्कृतीत स्त्री उपेक्षित, अपमानित राहिली यात शंका नाही. आजच्या जगातही ती कालच्या इतकीच परतंत्र आणि पुरुषावलंबी राहिलेली आहे. आता या नव्या युगात तुम्हाला प्रतिष्ठा मिळालीच पाहिजे. आम्ही पुरुषांनी या स्त्रीची महती ओळखली पाहिजे. तिच्या भोवती उभारलेली सगळी कृत्रिम कुंपणं आम्हीच मोडून टाकली पाहिजेत. माझ्या मते आता स्त्रीप्रधान समाज आणि संस्कृतीचं युग उजाडलं पाहिजे. जर परमेश्वर असेल तर तो स्त्रीच असला पाहिजे. आमचा जुना पुराणा पुरुषी दृष्टिकोन आता मुळातूनच बदलला पाहिजे.'

प्राध्यापक पिंपळवाडकर एका महिला मंडळाच्या सभेत अभिनवेशानं बोलत होते. त्यांच्या प्रत्येक वाक्याला मंडळाच्या सर्व सदस्या टाळ्या वाजवून दाद देत होत्या. प्राध्यापकांच्या या 'क्रांतिकारक' आणि 'जहाल' भाषणानं सारं महिलामंडळ खूष होऊन गेलं. स्त्री अधिक स्तुतिप्रिय असते हे जणू त्या भाषणानं सिद्ध झालं. 'शेवटचं गोड काम' करण्यासाठी सेक्रेटरीण बाई उभ्या राहिल्या. त्या लाडिक शब्दांत म्हणाल्या,

'पिंपळवाडकरांनी आम्हा स्त्रियांची इतकी चांगली बाजू मांडली की ते आम्हाला आमच्यातलेच वाटतात. त्यांनाही महिला मंडळाचे सदस्य करून घेण्याचा आम्ही विचार करीत आहोत.'

प्राध्यापक महाशय आपल्या वक्तृत्वावर फारच संतुष्ट झाले. दुसऱ्या दिवशी स्टाफरुममध्ये महिलामंडळाच्या व्यासपीठावर आपण आपलं वक्तृत्व कसं गाजवलं याची सुरस कथा कृतार्थ बुद्धीनं ते सांगत होते. एका प्राध्यापकानं मिस्किलपणानं त्यांना विचारलं,

'तुमची खरोखरच ही मतं आहेत की केवळ महिला मंडळाला संतुष्ट

करण्यासाठी असं बोलतात ? तुमच्या नेहमीच्या वर्तनावरुन तुम्ही स्त्री स्वातंत्र्यांचे पुरस्कर्ते असाल असं आम्हाला कधीच वाटलं नाही.' हा चिमटा मात्र पिंपळवाडकरांना अस्वस्थ करून गेला. ते म्हणाले, 'सवंग लोकप्रियतेसाठी मी कधी बोलत नाही. जे माझ्या पोटात आहे तेच माझ्या ओठात येतं. स्त्रीचं स्वतंत्र अस्तित्वसुद्धा नाकारणाऱ्या या समाजाच्या पाठीवर कोरडे ओढणाऱ्या लोकहितवादी आगरकरांच्या परंपरेतला मी एक विचारवंत आहे. म्हणून तर महिला मंडळानं मला आमंत्रण दिलं होतं. तुम्हाला बोलावलं नव्हतं.'

आता ते दुसरे प्राध्यापक थोडेसे रागावले. पण आपला राग त्यांनी मुद्रेवर दिसू दिला नाही. काही उपहासानं ते म्हणाले, 'खरं आहे. मला कोण आमंत्रण देणार ? तुमचा तो अधिकार आहे. दोन वर्षांपूर्वी तुमची मुलगी आंतरजातीय प्रेमविवाह करण्यासाठी तुमची परवानगी विचारत होती. त्यावेळी दहा-बारा दिवस तुम्ही तिला जबरदस्तीनं घरात कोंडून ठेवलं होतं. अखेर पोलिसांनी तिची सुटका केली. हे आम्ही विसरलो नाही.'

प्रा. पिंपळवाडकर अधिकच अस्वस्थ झाले. स्टाफरुममध्ये इतरांच्या देखत त्यांच्या वर्मावर सहकाऱ्यानं बोट ठेवलं होतं. पण त्याला काहीही उत्तर न देता ते तावातावानं उठून गेले. पिंपळवाडकर व्यासपीठावर स्त्री मुक्तीचं मुक्त कंठानं समर्थन करीत. प्रेमविवाह, आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह यांचाही त्यांनी पुरस्कार केला होता. पण आपली मुलगी एका परजातीच्या तरुणाबरोबर विवाह करू इच्छिते हे समजल्यावर त्यांनी तिला मारहाण केली होती. कोंडून ठेवलं होतं. तिच्या इच्छेविरूद्ध तिचं लग्न करण्यासाठी धडपड केली होती. ही गोष्ट काही मोजक्या लोकांना माहीत होती. पिंपळवाडकरांचं समर्थन असं होतं की,

'मी समाजाला विचार देतो, मार्गदर्शन करतो. माझ्या प्रत्यक्ष जीवनात मी कसं वागावं आणि काय करावं याच्याशी समाजाचा संबंध येऊ शकत नाही. माझ्या मुलीचा निर्णय मला अविचाराचा वाटला म्हणून एक बाप या नात्यानं मी तिला विरोध केला तर त्यात माझं काय चुकलं ? आजच्या ग्रॅज्युएट झालेल्या पोरांना आणि पोरींना दूरवर पाहण्याची शक्ती नसते. शिवाय प्रेमविवाहसुद्धा आपापल्या जातीतच केले पाहिजेत असं माझं मत आहे. आधी विवाह करावा आणि मग प्रेम करावं ही माझी भूमिका आहे.' पिंपळवाडकर यांचा हा युक्तिवाद मला तरी फसवा वाटतो. विचार करण्याची त्यांची दिशाच चुकलेली आहे. आपण समाजाला

वैचारिक मार्गदर्शन करतो असं मानणारा विचारवंत आपल्या व्यक्तिगत कृतीशी समाजाचा काय संबंध असं विचारतो ही मुळातच चमत्कारिक विसंगती आहे. उपदेश करणाऱ्यावर उपदेशाचं पालन करण्याची जबाबदारी असलीच पाहिजे. विचार शिस्तबद्ध आणि कृती मात्र वेडीवाकडी व बेशिस्त अशी विसंगती असून चालणार नाही. जसे आपण बोलतो तसेच आपण चालतो हे सिद्ध करण्याची जबाबदारी या विचारवंतांनी पत्करली पाहिजे. नाहीतर त्यांच्यावर कोण विश्वास ठेवणार ?'

एकदा एक धार्मिक प्रवचनकार इराण्याच्या हॉटेलात मांसयुक्त पदार्थ चवीने खात होते. एका भाविक श्रोत्यानं ते दृश्य पाहिलं. त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. डिशमधल्या चिकनवर ताव मारणाऱ्या प्रवचनकाराला त्यानं भीत भीत विचारलं, 'शास्त्रीबुवा', प्रवचनात तर तुम्ही मांसाहारावर जळजळीत टीका करता आणि इथं पाहावं तर तुम्ही खुशाल हे पदार्थ खात आहात. आम्ही काय करावं ? प्रवचकार किंचितही गडबडले नाहीत ते म्हणाले, 'आम्ही सांगतो तसं वागा. आमच्या वागण्याची तुम्ही चिकित्सा करू नका. आमचं सांगणं शास्त्रशुद्ध आहे. वागण्याचं अनुकरण तुम्ही करू नये.'

त्या प्रश्नकर्त्यांचं या युक्तिवादानं कितपत समाधान झालं कोणास ठाऊक. पण उक्ती आणि कृती यातली विसंगती कुणालाच आवडत नाही. ज्याच्या बोलण्याला कृतीचं अधिष्ठान नसतं. त्याचं बोलणं म्हणजे पाण्यावरचे बुडबुडे असतात. प्रा. पिंपळवाडकर कदाचित तर्कशुद्ध बोलत असतील, परिणामकारक वक्तृत्वामुळं त्यांच्या विचाराचं स्वागतही होत असेल. पण प्रत्यक्ष स्वतःच्या जीवनात मात्र आपल्या विचाराशी ते प्रामाणिक राहात नव्हते. दांभिकतेचा दोष अशा परिस्थितीत त्यांच्या पदरी येणारच. बोलके सुधारक आणि कर्ते सुधारक असे सुधारकांचे प्रकार आजही केले जातात.

समाजातल्या अंधश्रद्धेवर आणि रुढीवादावर खरपूस टीका करणारे एक बुद्धिवादी सुधारक मुंबईहून दिल्लीला विमानानं निघाले होते. त्यांचा माझा पूर्वपरिचय होता. प्रवासात आमच्या गप्पा रंगल्या. मध्येच एक सूचना ऐकू आली. 'वाईट हवामानामुळं विमान खाली उतरवण्यात काही तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. प्रवाशांनी कमरेभोवती पट्टे व्यवस्थितपणे बांधावेत ? ते बुद्धिवादी सुधाकर बरेचसे अस्वस्थ झाले. कोटाच्या खिशातून त्यांनी शनिमाहात्म्य बाहेर काढलं आणि

अस्वस्थ मनानं ते पोथी वाचू लागले. खरं तर विमानात कोणताही बिघाड झालेला नव्हता. पण काही प्रवासी या सूचनेमुळं घाबरले होते यात शंका नव्हती. अवघ्या पाच-सात मिनिटांतच विमान व्यवस्थितपणानं जमिनीवर उतरलं. त्या बुद्धिवाद्यानं ती पुस्तिका भक्तिभावानं कपाळाला लावून खिशात ठेवली आणि मी काही न विचारताच स्पष्टीकरणाला सुरुवात केली,

'तसा माझा या गोष्टीवर विश्वास नाही. पण प्रवासात मला अपघातयोग आहे असं एका ज्योतिषानं सांगितलेलं आहे. शनीचं नित्यनेमानं पूजन आणि स्मरण केलं तर त्याच्या कृपेनं मी संकटातून तरुन जाईल असं ज्योतिषानं सांगितलं आहे. माझा असल्या क्रियाकाण्डावर मुळीच विश्वास नाही. मी जपजापही करीत नाही. पण प्रवासात मात्र शनिमाहात्म्याची ही पोथी जवळ ठेवतो. श्रद्धा नसली तरी कुठंतरी मनाला आधार वाटतो. तसं पाहिलं तर या कर्मकांडात काही स्वारस्य नाही. तुम्ही माझ्याबद्दल गैरसमज करुन घेऊ नये म्हणूनच हा खुलासा केला. लक्षात घ्या. असल्या गोष्टी बुद्धीवादाच्या चौकटीत कधीच येऊ शकणार नाहीत.

मी यावर केवळ हसलो. हसण्यापलीकडं मला काहीच करणं शक्य नव्हतं. त्या बुद्धिवाद्याचा हा पराभव मी पाहिला होता. जो स्वत:च अंधश्रद्धेच्या वर्तुळातून बाहेर पडलेला नाही त्याच्या बुद्धिवादी विचारांवर कोण विश्वास ठेवणार ? आठ-दहा मुलं असलेल्या माणसानं संतती-नियमनावर व्याख्यान द्यायला उभं राहावं हा तसा प्रकार आहे. विचारात शास्त्रीयता आणि आचार मात्र शास्त्रविरुद्ध. ही विसंगती हास्यास्पद नव्हे काय ? म्हणून तर तुकोबांनी 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' असं म्हटलं आहे. तुकोबांच्या काळात कीर्तनकार आणि प्रवचनकार गल्लोगल्ली होते. पण तुकोबा कीर्तनाला उभे राहिले की आवार फुलून जायचं. कारण तुकोबांची वाणी जितकी रसमय होती तितकीच त्यांची करणीही तत्त्वशुद्ध होती. बोलण्यात आणि वागण्यात लेशमात्रही फरक नसलेली माणसं हीच अखेर समाजमनावर संस्कार करू शकतात. नुसत्या पांडित्यानं समाज बदलत नाही. पांडित्य हे परिवर्तनाला गती देण्यासाठी आवश्यक असलं तरी त्याला प्रामाणिक आचारधर्माची जोड मिळाल्याशिवाय खरं संक्रमण होऊ शकत नाही. राजकारणातही निरर्थक घोषणाबाजीचा कळस झालेला दिसतो. निवडणुकीच्या काळात तर इतक्या नवनवीन घोषणा ऐकायला येतात की या घोषणा पिकवणाऱ्यांच्या कल्पकतेचं कौतुक करावंसं वाटतं. घोषणांतून क्रांती होत असती तर आज आमचा देश जगातला

अत्यंत समृद्ध आणि सुखी देश ठरला असता 'गरिबी हटाव'च्या घोषणा मी तीस-चाळीस वर्षे ऐकत आलो आहे. भोळ्या-भाबड्या समुदायासमोर असेच एक पुढारी बोलत होते,

'माझ्या बांधवानों, माझ्या बहिणींनो, येत्या पाच वर्षांत गरिबी हटली नाही तर मी बापाचं नाव सांगणार नाही. (इथं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. जिंदाबादच्या ललकाऱ्या उठल्या. मधून-मधून टाळ्या वाजवायला आणि पुढाऱ्यांच्या नावाचा जयघोष करायला जवळच्या दोन-तीन तालुक्यांतून ट्रक भरभरुन माणसं आणलेली होती. दर दोन वाक्यांनी त्यांनी टाळ्या आणि घोषणा देण्याचं कंत्राट घेतलं होतं.) तुम्ही मला पाच वर्षांची मुदत द्या. ही गरिबी कायमची हटवून दाखवतो. गरिबी हटवायलाच मी दंड थोपटून उभा राहिलो आहे.' पुढाऱ्याचं भाषण दणदणीत झालं. आणि आपला शब्द त्यांनी अक्षरश: शंभर टक्के खरा करुन दाखवला. जसं ते बोलले तसंच त्यांनी करून दाखवलं. ते निवडून आल्यानंतर त्यांना सत्ता मिळाली. पाच वर्षांच्या आत पुढारी महाशयांची गरिबी हटली. सध्या त्यांच्या मालकीच्या डझनभर गाड्या आहेत. मोठमोठ्या शहरात आलिशान बंगले आहेत. परदेशी बँकात त्यांनी किती पैसे ठेवले आहेत कुणास ठाऊक ? पण गरिबी हटवण्याची प्रतिज्ञा मात्र या मर्द पुढाऱ्यानं खरी करून दाखवली. या प्रकारच्या नेतृत्वाला काय करायचं ?

प्रत्येकाचे विचार महान असतात. महात्मा गांधींचा गहिरवल्या स्वरात उच्चार केल्याशिवाय यांचे भाषण पूर्ण होत नाही. गांधीजींचा साधेपणा आणि लोकहिताची तळमळ, त्यागाची कृती यांचा मात्र विसर पडला. 'वचनेषु किं दरिद्रता ?' या सुभाषिताला अनुसरून झोकदार शब्दांची, अप्रामाणिक शब्दांची एक मिरवणूक काढली की ही जनता फसते. फसण्यासाठी जनता असते आणि तिला फसवण्यासाठी अशा प्रकारचे लोकनेते असतात. पण खरं सांगायचं तर नि:स्वार्थी, प्रामाणिक ध्येयवादी नेत्याच्या साध्या शब्दालाही जी किंमत होती ती ट्रकमधून हजारो लोक भाड्यानं आणून प्रचंड गर्दीची सभा घेतली तरी आता शेंबडं पोरसुद्धा या देखाव्याला महत्त्व देत नाही. कृतीचं सूत्र तुटलेले. शब्दांचे भिरभिरणारे पतंग केवळ भरकटत चालले आहेत हा अनुभव येऊ लागला आहे. देशभक्त वनवासात आणि देशबुडवे एअरकंडिशन्ड बंगल्यात ही परिस्थिती जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत नुसत्या शाब्दिक घोषणांवर कोण विश्वास ठेवणार ?

बोलण्याप्रमाणं चालणं खरोखरच कठीण असतं. स्वातंत्र्यवीर सावरकर ज्वालाग्राही बोलत होते आणि यातनांच्या जळत्या वाटेनं चालत होते. त्यांच्या विचारात स्फोटकता होती. विचारांशी सुसंगत असा आचारही त्यांच्यापाशी होता. शुद्ध बुद्धिवादी विचार मांडतांना त्यांनी कोणाच्या रागालोभाची क्षिती बाळगली नाही. तेच विचार त्यांनी बेधडकपणानं कृतीतही उतरवून दाखवले. फुल्यांना आम्ही 'महात्मा' म्हणतो याचं हेच प्रमुख कारण आहे. ड्यूकच्या सन्मानासाठी योजलेल्या भव्य समारंभात सामान्य शेतकऱ्याच्या वेषात जाऊन शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची गाऱ्हाणी सडेतोड शब्दात फुल्यांनी जेव्हा मांडली तेव्हा त्या साम्राज्यशाहीच्या प्रतिनिधीचे डोळे विस्फारले. सत्य सांगायला धैर्य हवं. आणि सांगितलेल्या सत्याचं आचरण करायला जबरदस्त धैर्य आवश्यक असतं. 'बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात' खाऊन तृप्त होणं कसं शक्य आहे ? मुलींची शाळा काढण्याच्या आपल्या कृतीबद्दल फुल्यांना घर सोडावं लागलं. सुधारकाचार्य आगरकरांचीही हीच कथा आहे. लोकप्रिय होण्याच्या वाटा बऱ्याच सोप्या असतात. सरळ असतात. लोकांचे भ्रम कुरवाळले म्हणजे लोक संतुष्ट होतात हे आगरकरांसारख्या पत्रकाराला आणि प्राध्यापकाला निश्चित माहीत होतं. पण लोकानुनयाची वाट बाजूला सारून लोककल्याणासाठी लोकांचे शिव्याशाप वेचीत बुद्धिवादाची बीजे पेरीत राहिलेला हा विचारवंत आचारातही तितकाच प्रामाणिक होता.

आता उक्ती आणि कृती यात विलक्षण अंतर पडलं आहे. ज्यांच्या शब्दांना नैतिक वजन आहे असे विचारशील, आचारशील लोक दुर्मिळ झाले. त्यांची छायाचित्रं तेवढी उरली आहेत. 'आई' ही कविता वर्गात शिकवतांना आईची महती उत्कट शब्दांत वर्णन करणारा अध्यापक आपल्या आईला घराबाहेर घालवण्याचा प्रेमळ उद्योग करू शकतो हे मी पाहिलं आहे. शब्दांचं पावित्र्य आणि प्रतिष्ठा अखेर कृतीवर अवलंबून असते. देशविघातक, कारवाया करणाऱ्या गुन्हेगारांना अत्यंत कडक शासन करू असं पुन्हा पुन्हा लोकसभेत व जाहीर सभांत सांगणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी वचनाची पूर्ती केली असं दिसत नाही. जनतेला झुलवत ठेवण्यासाठी शब्दांची वारेमाप उधळण करायची असते. जोपर्यंत हातात शब्दकोष आहे. जोपर्यंत कृती करण्याची इच्छाच नाही किंवा खरं तर कुवत नाही तोपर्यंत शब्दांचा राजकारणी व्यापार करायला काय हरकत आहे ? जनता विसराळू असते. ती बिचारी जाब

विचारीत नाही. संत तुकोबा म्हणतात त्याची मात्र आठवण होते.

**बोले तैसा चाले। त्याची वंदीन पाऊले ।।**
**अंगे झाडीन अंगण। त्याचे दासत्व करीन ।।**
**त्याचा होईन किंकर। उभा ठाकेन जोडोनि कर ।।**
**तुका म्हणे देव। त्याचे चरणी माझा भाव ।।**

●●●

# यक्ष प्रश्न

चार मजूर लाकडाचा एक प्रचंड ओंडका उचलून बैलगाडीत ठेवण्याचा प्रयत्न करीत होते आणि एक अधिकारी घोड्यावर बसून त्यांच्या अंगावर अधिकाराच्या गुर्मीत खेकसत होता. 'उचला तो ओंडका. इतके कसे तुम्ही बावळट? सकाळी न्याहरी केली की नाही ? नीट जोर लावा. एवढं लहानसं काम करता येऊ नये याचा अर्थ तुम्ही कामचुकार झाला आहात. नीट काम झाल्याशिवाय आजची मजूरी मिळणार नाही.' घामाघूम झालेले ते मजूर आपल्यापरीने तो अत्यंत वजनदार ओंडका उचलण्याची सारखी धडपड करीत होते. पण त्यांची ताकद कमी पडत होती. आणखी एखाद्या माणसाची मदत मिळाली असती तर तो ओंडका प्रयत्नानं गाडीत ठेवणं शक्य झालं असतं. घोड्यावरचा अधिकारी मजुरांना शिव्या देत होता. भराभर हुकूम सोडीत होता आणि ते कष्टकरी सेवक पराकाष्ठेची धडपड करीत होते. हे दृश्य दूर अंतरावर उभा असलेला एक घोडेस्वार न्याहाळीत होता. तो तेथे आला आणि या अधिकाऱ्याला म्हणाला,

'अहो, अधिकारी महाशय, नुसते घोड्यावर बसून हुकूम काय सोडता ? तुम्ही स्वत:च त्या मजुरांना का मदत करीत नाही ?'

आता तो अधिकारी संतप्त झाला. त्याने खेकसून म्हटले, 'तुम्ही कोण मला सांगणार ? मी यांचा ऑफिसर आहे. मी काही सामान्य मजूर नाही. म्हणे, यांना मदत करा ! माझी पोझिशन काय, माझा हुद्दा काय ? मी केवळ हुकूम करीत असतो. माझ्या हुकूमाची अमंलबजावणी करणं हे या मजूरांचं काम आहे. समजलात?'

तो घोडेस्वार म्हणाला, 'अरे, हो ! तुम्ही बडे ऑफिसर आहात नाहीत का? ऑफिसरनं फक्त हुकूम सोडायचे असतात. पण काय हो महाराज, तो ओंडका उचलण्यासाठी मी या मजुरांना मदत केली तर तुमची काही हरकत आंहे का ?'

'माझी कसली हरकत ? तुम्ही जरुर मदत करू शकता' असे म्हणून तो अधिकारी ऐटीत धूम्रपान करू लागला. तो घोड्यावर बसूनच राहिला. या नवीन घोडेस्वाराने ओंडका उचलण्यासाठी आपली शक्ती एकवटून प्रयत्न केला. पाच

जणांचा हातभार लागल्यामुळे काम यशस्वी झाले. अंगावर बसलेली धूळ झटकून तो घोडेस्वार अधिकाऱ्याला म्हणाला, 'बरं आहे अधिकारी महाराज येतो मी. पुन्हा माझी आवश्यकता भासली तर मला जरुर बोलवा. मी इथून चार-पाच मैलावर राहतो. केव्हाही निरोप पाठवलात तर आपल्यासारख्या पोझिशन असलेल्या ऑफिसरच्या सेवेला धावून येईन. माझं नाव जॉर्ज वॉशिंग्टन. सध्या मी अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष आहे.' आता त्या अधिकाऱ्याला नखशिखान्त घाम फुटला. प्रत्यक्ष राष्ट्राध्यक्षांनी त्या मजुरांच्या बरोबर कष्ट केले आणि आपण मात्र अधिकाराच्या उन्मादात बोलत होतो ही जाणीव त्याला फार तापदायक झाली. त्याने जॉर्ज वॉशिंग्टनची पुन्हा पुन्हा क्षमा मागितली. अमेरिका त्यावेळी नव्याने आकार घेत होती. आपला देश प्रगत व्हावा यासाठी जॉर्ज वॉशिंग्टन सदैव जागरुक होता. सर्वच देशात शिस्तबद्ध कामकाज चालू असावे, याबद्दल त्याचा कटाक्ष होता. त्या अधिकाऱ्याला आपली चूक समजली आणि तो स्वत: शक्य तितकी कामे करू लागला.

राष्ट्राची रचना आणि प्रगती प्रामाणिक कष्ट करणाऱ्या नागरिकांमुळे होत असते. जॉर्ज वॉशिंग्टनची कथा कुणाला काल्पनिक वाटेल, अशी चमत्कृतीपूर्ण आहे. कारण स्वत: राष्ट्रप्रमुख, सर्व सत्ताधारी असलेला माणूस चार सामान्य कामगारांबरोबर कष्टाची कामे करतो यावर आज कुणीतरी विश्वास ठेवील काय ? पण ही एक सत्यकथा आहे. सामान्य नागरिकांपासून ते राष्ट्रप्रमुखांपर्यंत जेव्हा श्रम करायला आणि राष्ट्रबांधणी करायला उद्युक्त होतात तेव्हा कोणत्याही जगड्व्याळ समस्या वितळून जातात. आमच्या देशाकडे या संदर्भात ओझरता दृष्टिक्षेप केला तर काय दिसेल हे सांगणे खरोखरच कठीण आहे. आम्हाला स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे उलटून गेली. पण या कालावधीत राजकीय, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक जीवनात काही शिस्त निर्माण करता आली काय ? घोड्यावरुन हुकूम सोडणाऱ्या अधिकाऱ्याप्रमाणे येथे उंटावरुन शेळ्या हाकण्याची प्रवृत्ती मात्र वाढीला लागली आहे. प्रामाणिकपणाने कर्तव्य करीत राहिलेल्या व्यक्तीचा बावळट म्हणून उपहास करण्यात येतो. त्याला व्यवहारचातुर्य नाही. नांगराला जुंपलेल्या बैलासारखा तो बैलबुद्धीचा आहे, असे म्हटले जाते. कर्तव्याला बगल देऊन चकाट्या पिटीत बसणारा कामचुकार चतुरबुद्धीचा समजला जातो. या प्रकारची प्रवृत्ती पूर्वी अपवादात्मक असायची. आता ती नियम होऊ पहात आहे. साऱ्याच क्षेत्रात ही

बेशिस्त आणि अप्रामाणिकपणा वेगाने येत राहिला तर राष्ट्राचे काय होणार हा प्रश्न कुणाला अस्वस्थ करीत नाही. 'राष्ट्रीय जाणीव', 'सामाजिक जबाबदारी' वगैरे शब्द आज स्वस्त झाले असले तरी अर्थमूल्य हरवल्यामुळे ते गुळगुळीत होऊन बसले आहेत.

एक परीक्षक मानेवर खडा ठेवून विद्यापीठीय परीक्षेच्या उत्तरपत्रिका डोळ्यांत तेल घालून तपाशीत होते. आपल्या हातून या उत्तरपत्रिकांचे नियमानुसार व्यवस्थित मूल्यमापन व्हावे ही जाणीव ठेवून ते कार्य करीत होते. दुसरे एक 'अनुभवी' परीक्षक त्यांना भेटायला आले. आपला सहकारी फारच निष्ठेने उत्तरपत्रिकांची तपासणी करीत आहे हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, 'तुम्ही या कामात अद्यापी नवखे आहात. मी दोन दिवसांत तीन-चारशे उत्तरपत्रिकांचा फडशा पाडतो. गेली वीस वर्षे परीक्षक म्हणून मला नेमले जाते. तुम्ही जर ओळ न् ओळ वाचू लागलात, प्रत्येक पान तपासू लागलात तर एक महिनाभर तरी दररोज पाच-सहा तास कष्ट करावे लागतील. त्यापेक्षा सोपी युक्ती सांगतो. पस्तीस ते पन्नासच्या दरम्यान कमी अधिक असे सर्वांना गुण वाटायचे. उत्तरपत्रिका वरवर चाळायची. प्रत्येक उत्तरपत्रिका दोन मिनिटांत संपवली पाहिजे. शक्य तो कुणालाही नापास करायचं नाही. बहुसंख्य विद्यार्थी उत्तीर्ण झाले म्हणजे कुणाचीच तक्रार येत नाही. अहो, शिक्षण क्षेत्रात असली हमालीची कामे पुष्कळ असतात. ती जर तुम्ही इतक्या तत्परतेने करू लागलात तर तुमच्यात आणि मजूरी करणाऱ्या मजूरांत काय फरक उरला ?'

'पण असं करणं अन्यायाचं नव्हे काय ? शिवाय या कामाबद्दल आपल्याला विद्यापीठाकडून पैसे मिळतात. शक्य तितक्या प्रामाणिकपणानं हे काम आपल्याला केलं पाहिजे.' या उत्तरावर ते 'ज्येष्ठ व अनुभवी' परीक्षक अशा आविर्भावाने हसले की, या व्यवहारशून्य अडाणी माणसाला आता काय सांगायचे असेच त्यांना वाटत असावे. हा प्रकार इतर क्षेत्रांतही यापेक्षा अधिक उघडपणे चाललेला असतो. त्याची खंत कुणालाच वाटत नाही. एका विशिष्ट व्यवहाराचे लायसेन्स मिळविण्यासाठी मी संबंधित कार्यालयात गेलो. मुख्य अधिकाऱ्यांशी रीतसर बोललो. त्यांनी एका कनिष्ठ अधिकाऱ्याकडे जाण्याची सूचना केली. कनिष्ठ अधिकाऱ्याने मुख्य कारकुनाकडे पिटाळले. मुख्य कारकुनाने तीन-चार दिवस कार्यालयात हेलपाटे घालायला लावले. अखेर एका सर्वसाधारण कर्मचाऱ्याने माझी समस्या जाणून

मला हितोपदेश केला.

तो म्हणाला, 'साहेब, या कार्यालयात येण्याची तुमची ही पहिलीच वेळ दिसते. सांकेतिक भाषेत सांगितलेली कार्यपद्धतीही तुम्ही समजावून घेतलेली दिसत नाही. मुख्य अधिकाऱ्यांना तुम्ही घरी जाऊन का भेटत नाही ? तुमचे सगळे कागदपत्र नियमाला धरून असले तरी तुम्ही साहेबांच्या इच्छेला अनुसरुन योग्य ती तरतूद केली पाहिजे. 'ता' वरून ताकभात हे लक्षात आले पाहिजे. एक आपलं सुभाषित तुम्हाला सांगितलं. सध्याचं युग ताकभाताचं राहिलेलं नाही. स्कॉच आणि कोंबडी आणि नंतर दक्षिणा या पायऱ्या चढल्याशिवाय तुमची कागदपत्रं पाहाण्याइतके मागासलेले लोक निदान या कार्यालयात तरी नाहीत आता यापेक्षा अधिक स्पष्ट काय सांगावं ? सर्वच गरजू लोक या वाटेने जातात. तुमच्या दृष्टीने कदाचित ही आडवाट किंवा चोरवाट असेल पण आता हा राजमार्ग होऊन बसला आहे. मला तुमच्या भोळेपणाचे आश्चर्य वाटते.'

या असल्या पार्श्वभूमीवर जॉर्ज वॉशिंग्टन कथा एक अद्‌भुत आणि असंभवनीय कथा म्हणूनच तिची संभावना होणार. अब्राहम लिंकन राष्ट्राध्यक्ष झाला तेव्हा त्याने लिंकन आडनावाच्या कोणाही व्यक्तीला सरकारी नोकरी देऊ नये असे. आपल्या अधिकाऱ्याला सांगितल्याची कथा आहे. भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री मरण पावले तेव्हा त्यांना काही हजारांचे कर्ज होते ही सुद्धा अविश्वसनीय कथा वाटते. पण ही सत्यकथा आहे. प्रश्न असा पडतो की, आपल्या दैनंदिन व्यवसायात, जीवनव्यवहारात किमान सत्याचा आणि प्रामाणिकपणाचा लेशही का आढळू नये ? मूर्तिमंत असत्याने सत्याची वेशभूषा करून राजरोसपणे वावरावे आणि सत्याने मात्र आत्महत्या करावी इतकी या मूल्याची दुर्दशा का व्हावी? किमान सत्य आणि किमान समाजनिष्ठा यांची अपेक्षा केली तर ते चुकेल काय ?

पाश्चात्य संस्कृती स्वैर आणि अनीतिमान आहे, अशी टीका नेहमी ऐकू येते. पण कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि शिस्त या गोष्टी पाश्चात्य जीवन पद्धतीत आपल्यापेक्षा अधिक असून त्या खोलवर रुजल्या आहेत यात शंका नाही. येथे शेजारी असलेल्या दोन दुकानांत एकच वस्तू वेगवेगळ्या किंमतीची म्हणून सांगितली जाते. ग्राहकाला ठरलेल्या, नियमित दरापेक्षा अधिक किंमतीने वस्तू विकणे हा व्यापारी कौशल्याचा भाग मानला जातो. परदेशात हा गुन्हा ठरतो. 'सत्यमेव जयते' हा फलक लावून असत्य नांदत असते हे आपल्या लक्षात येत नाही, की असत्यालाच

आपण सत्याच्या सिंहासनावर सन्मानपूर्वक प्रतिष्ठित केले आहे कुणास ठाऊक ? याचा अर्थ कामचुकार, निष्ठाशून्य, असत्य व्यवहार करणारी, लाच घेणारी माणसे पूर्वी या देशात कधीच नव्हती असे मला म्हणायचे नाही. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प होते. या दुर्गणांचे समर्थन कुणी करीत नव्हते. माझी तक्रार अशी की, अशा प्रवृत्तींना आज एक प्रकारची प्रतिष्ठा आपण कळत न कळत देत आहोत. दुष्प्रवृत्तीं वाढल्या तर त्या निपटून काढणे शक्य असते. पण त्या समाजात सुप्रतिष्ठित होऊ लागल्या तर मात्र भयानक परिस्थिती निर्माण होते. आपल्या देशात हजारो वर्षांपासून काही दुष्ट प्रवृत्ती अस्तित्वात आहेत. रामायण - महाभारत त्यांचे प्रतिबिंब दिसते. पण त्या अवहेलनेचा आणि धिक्काराचा विषय होत्या. आज त्यांचा वाजत गाजत स्वीकार होत आहे काय ? तसा होत असेल तर आमच्या जीवनाची राष्ट्रजीवनाची होत चाललेली घसरगुंडी कशी थांबवता येईल ? या बेचैन करणाऱ्या प्रश्नाचे उत्तर कुठे शोधायचे ? का या साऱ्याच परिस्थितीकडे पूर्ण डोळेझांक करून उजाडेल तेव्हा उजाडेल असे म्हणून अंधारातच चाचपडत राहायचे ?

यक्षाने युधिष्ठिराला विचारलेले प्रश्न फार सोपे होते असे म्हणावे लागेल. आज यक्ष असता तर त्याने हा प्रश्नच विचारला असता आणि युधिष्ठिरालाही निरुत्तर व्हावे लागले असते.

●●●

# कलावंतांचं चारित्र्य

कित्येक वर्षापूर्वीची गोष्ट. सोलापूरच्या रोटरी क्लबमध्ये 'साहित्य आणि चारित्र्य' या विषयावर मी एक व्याख्यान दिलं होतं. साहित्याचा आणि वैयक्तिक चारित्र्याचा संबंध असण्याचं कारण नाही आणि तसा तो असला पाहिजे ही अपेक्षाही मनात ठेवणं सयुक्तिक ठरणार नाही अशा आशयाचं मी प्रतिपादन केलं होतं. माझ्या विधानाच्या पुष्टीसाठी अनेक उदाहरणं घेतली होती. एखाद्या नाटककाराच्या नाट्यकृतीत नैतिक आदर्शाचं चित्रण असू शकेल. पण कदाचित त्याच्या व्यक्तिगत जीवनात त्यानं प्रचलित नैतिकतेकडं पाठही फिरवलेली असेल. आपल्याला त्याच्या खाजगी आयुष्याशी काय करायचं ? त्याचं साहित्य कलेच्या दृष्टीनं उत्तम असलं म्हणजे झालं. कविकुलगुरू कालिदासाची काव्यनाटकं शतकानुशतकं रसिकांनी मस्तकावर घेतली आहेत. केवळ संस्कृत साहित्याची नव्हे तर जागतिक साहित्याची ती अमोल आभूषणे ठरली आहेत. कालिदासाचं साहित्य हे चिरंतन सौंदर्याचं लेणं मानलं जातं. पण त्याच्या चारित्र्याबद्दल मात्र मतभेद आहेत. शृंगाररसाचा प्रमत्त आविष्कार आपल्या काव्यातून करणारा हा कलंदर कलावंत शिथिल चारित्र्याचा होता असं त्याच्याबद्दल म्हटलं जातं. खरं तर त्याचं विश्वसनीय चरित्र आज मिळत नाही. कालिदासाचा नेमका कालखंडसुद्धा निश्चयानं सांगता येत नाही. कोणत्या गुरुकडे त्यानं अभ्यास केला याची कसलीही माहिती उपलब्ध नाही. आता त्याचं वैयक्तिक जीवन नीतीच्या चौकटीत बसण्यासारखं नव्हतं या टीकेला आधार तरी काय ? पण समजा ही दंतकथा खरी असली तरी त्याच्याबद्दलचा माझा आदर अभंग आहे. खरं तर या अप्रस्तुत गोष्टींची मला काहीच जरुर नाही. असेल कालिदास नावाचा महाकवी लंपट असेल. व्यसनासक्त असेल. पण म्हणून त्याचं 'महाकवित्व' बाधित होतं असं कुणी म्हणू शकेल का ? कलावंताच्या कलाकृतींचा रसिकतेनं आस्वाद घ्यावा. त्यांच्या चारित्र्याचा पंचनामा करीत बसलेल्या अरसिक मूर्खांना कोणतं विशेषण बहाल करावं हेच कळत नाही.

परवा एक नाटक पाहायला गेलो होतो. नाटकाची संहिता फारशी चांगली नव्हती. पण प्रयोग मात्र उत्कृष्ट वाटला. त्या नाटकातल्या नायिकेची भूमिका करणारी

नटी नवीन होती. तरीही तिच्या अभिनयात, संवादात, हालचालीत एक प्रकारचा सुंदर जिवंतपणा होता, तिचे डोळे विलक्षण बोलके, पारदर्शी होते. कारुण्याचा, निराशेचा, प्रणयाचा, आनंदाचा आणि अतृप्तीचा भाव तिच्या नेत्रांतून सहजपणे प्रकट होत होता. एखाद्या खळखळणाऱ्या झऱ्यासारखी ती हसायची. तिच्या समर्थ कलात्मक अभिनयामुळं ते सामान्य नाटकसुद्धा रंगत गेलं. सजीव सुंदर नाट्याभिनयाचा एक अविस्मरणीय नमुनाच तिनं सादर केला. तिचं मी मन:पूर्वक अभिनंदन केलं. एक परिचित सभ्य गृहस्थ मला म्हणाले,

'या नटीच्या अभिनया सामर्थ्याबद्दल प्रश्नच नाही. पण हिचा नाटकाच्या व्यवस्थापकाशी अनैतिक संबंध आहे असं ऐकलं. मला काही हे योग्य वाटलं नाही. ही गोष्ट मात्र मला खटकली.'

आता त्या सभ्य गृहस्थाला एक सोलापुरी असभ्य शिवी देण्याचा मला मोह झाला. 'म्हणे ही गोष्ट मात्र मला खटकली' अरे, तू कोण ? तिनं कुणाशी संबंध ठेवावा वा ठेवू नये हा तिचा पूर्णपणे खाजगी प्रश्न आहे. तुझ्याशी सल्ला मसलत करून तिनं संबंध ठेवावा काय ? कुठल्याही सुंदर स्त्रीविषयी नाना प्रकारच्या अफवा उठवण्याचं काही लोकांना जबरदस्त व्यसन असतं. असेच एक अफवासम्राट मला म्हणाले,

'अहो, एक विलक्षण बातमी आहे. ऐकाल तर चकितच व्हाल. त्या सुप्रसिद्ध नर्तकीनं कालचा नृत्य प्रयोग संपल्याबरोबर तबलजीला प्रेमानं मिठी मारली. केवढं अनैतिक कृत्य हे ! या महान नर्तकीला हे शोभतं का ?'

मी त्याला विचारलं, 'तबलजी हा तिचा साथीदार आहे. एखाद्या वेळेस ती त्याच्यावर प्रेमही करीत असण्याची शक्यता आहे. तिनं त्याला मिठी मारू नये तर काय तुम्हाला मारावी ? नीती आणि अनीती यांच्या रेषा फार सूक्ष्म असतात. तुम्हाला तिच्या नैतिक अध:पतनाची काळजी करण्याचं काहीच कारण नाही. नर्तकीच्या ऐवजी तुमचा पाय वाकडा पडू नये म्हणजे झालं !'

कलावंतांच्या खाजगी आयुष्याबद्दल अकारण चर्चा चिकित्सा करणं, त्यात रस घेणं हे मला तरी मानसिक आरोग्य बिघडल्याचं लक्षण वाटतं. कालिदासाच्या शाकुंतलाचं मी काही वेळा वाचन केलं. शकुंतलेच्या भावमधुर प्रीतीची ही सफल आणि विफल कहाणी मनाला अपूर्व आनंद देते. त्या नाटकातलं तपोवन, त्यातले पशुपक्षी, वृक्ष आणि वेली यांनासुद्धा कालिदासानं आपल्या संपन्न प्रतिभेनं एक

आगळं चैतन्य दिलं आहे. त्या नाटकात शृंगारापेक्षाही कारुण्य अधिक मधुरपणानं व्यक्त झालं आहे, अद्‌भुत आणि वात्सल्य या रसांचाही शिडकावा मनोज्ञ वाटतो. 'ऋतुसंहार' हे काव्यसुद्धा भिन्न भिन्न ऋतूंतल्या चित्रविचित्र निसर्गाचे रंग टिपणारं सुंदर काव्य आहे. केव्हाही कालिदास उघडून वाचायला लागलो की तो आपलं मन एका सुगंधानं भारुन टाकतो. हा आनंद नीती - अनीतीच्या पलीकडचा आहे. कलावंताच्या आयुष्यालासुद्धा काही कप्पे असू शकतात. कलावंत म्हणून, प्रतिभेचा धारक म्हणून त्याचं व्यक्तिमत्व सर्वोच्च असतं. रसिकाला त्याच व्यक्तित्वाची मोहिनी पडते. श्रीलंकेत एका गणिकेच्या घरी कालिदासाचा खून झाला ही घटना खरी की खोटी ते इतिहासाला ज्ञात नाही. पण ही शोचनीय घटना घडली म्हणून कालिदास नावाचा सरस्वतीचा कंठमणी आपल्या अनादराचा किंवा नापसंतीचा विषय होण्याचं काहीच कारण नाही. ज्यानं आपल्या प्रतिभेचे चिरंतन गंधानं भरलेले विविध रसांचे चषक रसिकांच्या पुढ्यात ठेवले त्याच्या व्यक्तिगत चारित्र्याची चिरफाड करणाऱ्या क्षुद्र पामरांना काय म्हणावं ?

कलावंत मनस्वी असतात. अत्यंत संवेदनशील असतात. सौंदर्याचा आणि जीवनातल्या रसरंगांचा मोह त्यांना विशेषत्वानं आकृष्ट करून घेतो. मला कॉलेजात संस्कृत शिकवणारे एक गबाळग्रंथी प्राध्यापक होते. डोक्यावर मेणचटलेली टोपी, कधीकाळी धुतलेला पण आता पार चुरगळून गेलेला, मूळचा रंग कोणता होता हे ओळखता न येणारा लांब कोट, काळ्या रंगाकडे झुकणारं धोतर, वाढलेली दाढी आणि मधून मधून नाक फेंदारुन फु र्‌ र्‌ करण्याची त्यांची अभिजात सवय. असे हे रसिक प्राध्यापक 'मेघदूत' शिकवतांना म्हणाले, 'हा कवी स्त्रियांच्या मोहात गुरफटलेला होता. त्याची विषयासक्ती 'मेघदूतात' स्पष्ट जाणवते. तुम्ही घरी हे काव्य वाचा आणि अडलेल्या श्लोकाचा अर्थ मला स्टाफरुममध्ये विचारा. स्त्री-पुरुष प्रेमासारख्या रोगट भावनेचं हे काव्य शिकवणं मला आवडत नाही. शृंगार हा रस माणसाला अध:पाताकडे नेणारा आहे. या रसाचे घाणेरडे पाट कालिदासाच्या काव्यातून वाहातात. खरं तर असलं काव्य तरुण तरुणींनी वाचू नये या मताचा मी आहे.'

प्रेम ही रोगट भावना आहे काय ? एका रोगट मनोवृत्तीच्या प्राध्यापकानं प्रेमाला रोगट समजावं यात आश्चर्य नाही. म्हणे कालिदास स्त्रीमोहात गुरफटलेला होता. स्त्रीच्या सौंदर्यावर लुब्ध व्हायला आणि तिच्या मोहात आपलं आयुष्य

उधळून टाकायलासुद्धा एक सौंदर्यपिपासू मन असावं लागतं. मला शिकवणाऱ्या प्राध्यापकाला हे आकर्षण निदान या जन्मात तरी वाटलं नसेल. कोणत्याही स्त्रीनं यांच्याकडं एकदाही ढूंकून पाहाण्याचं सुद्धा धाडस केलं नसेल. ज्याच्यावर मोहानंच बहिष्कार टाकला आहे त्यानं दुसऱ्याला मोहवश म्हणून हिणवावं हा विनोदाचा एक अजब नमुना म्हणावा लागेल. कलावंताच्या कलात्मक सामर्थ्यामुळं कित्येक प्रकारचे मोह त्यांच्या दारात आमंत्रण द्यायला उभे असतात. कलावंत हा अखेर माणूसच आहे. सारेच काही ज्ञानेश्वर तुकारामांसारखे संत नसतात. सारेच संत झाले तर जग म्हणजे विरक्तांची एक प्रचंड धर्मशाळा बनेल. या कलावंतांच्या अत्यंत व्यक्तिगत चारित्र्याची चिकित्सा करण्याचा खरं तर आपल्याला काय अधिकार आहे ? त्यांचा कलाविष्कार पाहाणं, अनुभवणं हेच सर्वाधिक महत्त्वाचं नव्हे का ? पण ज्यांच्यापाशी रसिकता नसते, त्यांना असल्या उठाठेवी करण्यात एक चमत्कारिक आनंद मिळत असतो. यांच्या नीती-अनीती संबंधीच्या कल्पनाही अवास्तव आणि अतिरेकी असतात. जगात सर्वत्र या बाबतीत परिवर्तनं होत आली. स्त्री-पुरुषांच्या दैनंदिन स्वाभाविक बोलण्या-वागण्यालाही नैतिकतेचा धारवाडी काटा लावून पाहाणारे काही लोक असू शकतात.

पहिला बाजीराव हा पराक्रमी पुरुष होता. समशेरीच्या सान्निध्यात त्यानं महाराष्ट्राचा नवा इतिहास घडवला. त्याच्या पराक्रमामुळे संतुष्ट झालेल्या राजा छत्रसालानं आपल्या दरबारातली एक सौंदर्यवती गायिका आणि नर्तकी बाजीरावाला नजर केली. शृंगारप्रिय बाजीरावानं ही भेट तत्परतेनं स्वीकारली यात आश्चर्य नाही. तिच्या सहवासात बाजीराव रंगून गेला. मधून मधून तिच्या छावणीत तिचं नृत्य पाहाताना मदिरेचा प्यालाही ओठाला लावू लागला. बाजीरावाचं जीवन आणि कार्य शत्रूचं निर्दालन करणाऱ्या वीराचं आणि संस्कृतीचं रक्षण करणाऱ्या समाजपुरुषाचं आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. तो भिक्षुकी करणारा सामान्य ब्राह्मण नव्हता. मराठ्यांच्या शत्रूला खडे चारणार एक राजबिंडा, देखणा, मर्द होता. मस्तानीमुळं बाजीरावानं धर्म बुडवला अशी क्षुद्र जीवजंतूंनी हाकाटी पिटली. मस्तानी तर कलावती होती. सौंदर्य आणि कला यांचं वरदान मिळवलेली ती बाजीरावाची प्रणयिनी त्याच्या पराक्रमाला चेतना देणारी स्फूर्तिदात्री होती. आपले हरवलेले सुखाचे आणि शृंगाराचे क्षण मस्तानीच्या आरक्त ओठांतून बाजीरावानं काही काळ शोषून घेतले. पण नीतिमत्तेचा बागुलबुवा उभा करणाऱ्या काही नीतिमार्तंडांनी या

प्रणयी दांपत्याची ताटातूट करुन नैतिकतेच्या क्षेत्रात आपलं निशाण फडकावलं. या सामान्य मळखाऊ लोकांनी बाजीरावाला कधी ओळखलंच नाही. आपल्या हातातल्या चिपट्या, मापट्यांच्या साहाय्यानं नीती-अनीतीची मोजणी करीत बसलेल्या या पामरांना पराक्रमही कळला नाही आणि प्रणयही समजला नाही. त्यांना शृंगाराचीही महती पटली नाही आणि भक्तीची व प्रेमाचीही श्रेष्ठता आकळली नाही. ते केवळ जानवी सांभाळीत होते. बाजीरावाच्या समशेरीमुळं यांची जानवी शाबूत राहिली. हे ज्ञान यांना कधी झालंच नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर एकदा एका तरुणाला म्हणाले होते, 'बाजीरावासारखा पराक्रम कर. मग मस्तानीला का आणलंस असं आम्ही विचारणार नाही.'

काही क्षेत्रातं माणसं भव्य कर्तृत्वाची इमारत बांधतात. त्यांच्या निर्मितीशील प्रतिभेकडं पाहून तुम्ही आम्ही स्तिमित व्हावं. आनंदित व्हावं. त्यांनी निर्माण केलेला आनंद अंत:करणाच्या कोंदणात जपून ठेवावा. त्यांच्या खाजगी आयुष्यात डोकावून पाहाण्याचं काहीच कारण नाही. काही कलावंत प्रतिभावंत अंतर्बाह्य गंगाजलासारखे स्वच्छ असतात, काही जणांच्या आयुष्याला एखादं कुसळ चिकटलेलं असू शकेल. त्याची चिकित्सा करण्याचं कारण काय ? अनंत लाटांनी उंचबळत असलेला सागर पाहातांना त्या सागराच्या तळाशी किती दलदल माजली असेल याचा विचार करणं हे रोगटपणाचंच नव्हे काय ? कलावंतांच्या वैयक्तिक आयुष्याविषयी फाजील कुतूहल दाखवणं चुकीचं आहे. त्यांचं अनुकरण कलेच्या, तपस्येच्या संदर्भात करावं, त्यातच खरा आनंद आहे. असं मला वाटतं.

●●●

# भले तरी देऊ कासेची लंगोटी

एक प्रश्न अनेक वेळा मनात उद्‌भवतो आणि अस्वस्थ करीत राहतो. तो प्रश्न असा, उत्तम राज्य किंवा आदर्श राज्य कोणतं असतं ? चांगल्या राज्याची नेमकी कोणती लक्षणं मानावीत ? राज्यव्यवस्थेचा हेतूतरी कोणता असतो ? ज्या राज्यात आपण आज राहात आहोत ते व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासासाठी सदैव जागरुक असलेलं राज्य आहे काय ?

एकाच प्रश्नाची ही भिन्न भिन्न रूपं आहेत. अलीकडं माझ्यासारख्या सर्वसाधारण नागरिकांच्या मनात हा प्रश्न उचंबळून येतो. कुठल्याशा राज्यातील एक मनोरंजक कथा ऐकवली जाते. 'चोरी करण्यासाठी एक चोर धनिकाच्या घरात भिंत फोडून प्रवेश करीत असतांना ती भिंत एकदम ढासळते आणि चोर जखमी होतो. घराची भिंत नीट रीतीनं न बांधलेल्या गवंड्याला आणि त्या धनिकाला शिक्षा व्हावी आणि आपल्याला नुकसानभरपाई मिळावी असा चोराचा युक्तिवाद असतो. दयाळू राजाला चोराचं प्रतिपादन तर्कशुद्ध आणि न्याय्य वाटतं. बिचाऱ्या जखमी झालेल्या त्या सज्जन चोराचा चरितार्थ कसा चालणार ? त्याच्या कुटुंबातील लोकांची उपासमार होणार हा विचार राजाला फारच दुःखदायक वाटला. त्यानं घरमालकाला आणि गवंड्याला जबरदस्त दंड ठोठावला. चोराचं आर्थिक समाधान झालं. राजालाही नैतिक धन्यता वाटली. राज्यातल्या चोरमंडळींनाही आपला कोणीतरी त्राता, पालनकर्ता आहे हे पाहून आनंद झाला. राजाच्या न्यायप्रियतेबद्दल सर्वत्र गाजावाजा झाला.' अशा आशयाची ती गोष्ट मला केवळ कपोलकल्पित वाटली होती, कुणीतरी मनोरंजनासाठी ही कथा रचलेली आहे. अशा भ्रमात मी होतो. पण ही एक सत्यकथा असू शकते. कारण समाजातल्या चोर, दरोडेखोर, गुन्हेगार इ. घटकांकडेही सहानुभूतीनं व आपुलकीनं पाहावं आणि त्यांनाही आपापला व्यवसाय निर्वेधपणानं करण्यासाठी निर्भय वातावरण निर्माण करावं असा 'सर्वोदयी' विचार परमसहिष्णू राजाच्या मनात आला तर त्यात काय चुकलं ? हा साधा माणूसकीचा विचार आहे. दरोडेखोरांनाही जगायचं असतं. धनासाठी कुणाचाही बेमुवर्तखोरपणे प्राण घेणाऱ्या घातपाती लोकांनाही पोट असतं. त्यांनाही

आपल्या कुटुंबाचं पालनपोषण करावं लागतं ही व्यापक जाणीव चित्तात ठेवून गुन्हेगाराचं संरक्षण करणं हा उदात्त राजधर्मच आहे.

एकदा जत्रेतल्या गर्दीचा गैरफायदा घेऊन दोन रोडरोमिओंनी तरुण मुलींना मुद्दामच धक्के मारले. काही बीभत्स प्रकार करण्याचा प्रयत्न केला. एका तरुणीला या गुंडगिरीचा, असंस्कृतपणाचा संताप आला. ती जवळच्याच पोलीस स्टेशनवर या प्रकाराविरूद्ध तक्रार करण्यासाठी गेली. ड्युटीवर असलेल्या कर्तव्यतत्पर पोलीस इन्स्पेक्टरनं त्या तरुणीला मौलिक उपदेश केला. तो म्हणाला,

'बाई, तुम्ही दिसायला सुंदर आहात. तुम्ही स्वत:हून जत्रा पाहाण्यासाठी गर्दीत आलात याचा अर्थ रोडरोमिओंना तुम्ही उत्तेजन दिलं हे नाकारता येत नाही. सौंदर्याचा मोह गुंड प्रवृत्तींच्या तरुणांना झाला तर त्यांना दोष देता येणार नाही. भल्या घरातल्या मुलीबाळींनी रस्त्यातून फिरणं योग्य नाही. तुम्ही निवांतपणानं आपल्या घरातच बसून राहिला असता तर रस्त्यावरच्या उडाणटप्पू गुंडांना तुमची छेड काढण्याची संधी मिळाली असती काय ? आपण त्यांना अशी संधी द्यायची आणि मग त्यांच्याविरूद्ध तक्रार करायची यातली विसंगती तुमच्यासारख्या सुशिक्षित तरुणीला समजायला पाहिजे. अहो, रस्त्यावर भटकणारी उनाड पोरं काहीतरी चाळे करणारच. तो त्यांचा स्वभावधर्मच आहे. आपणच त्यांच्याविषयी थोडा सहानुभूतीनं विचार केला आणि सहकार्याची भावना मनात ठेवली तर असल्या तक्रारी उद्भवणं शक्य नाही. जा, तुम्ही समंजस आहात. झालेल्या प्रकाराकडं उदार दृष्टिकोनातून पहा. म्हणजे तुम्हीच या बाबतीत तक्रारीचा आग्रह धरणार नाही.'

पोलीस इन्स्पेक्टर अत्यंत समंजस होता. गुन्हेगारीचं मूळ कशात आहे याचं अत्यंत मार्मिक विश्लेषण त्यानं केलं होतं ! असे कर्तव्यदक्ष, उदारमनस्क पोलीस अधिकारी असले म्हणजे समाजजीवन सुरळीत चालू शकतं. गुंडांची धरपकड करणं, त्यांना शिक्षा करणं वगैरे अमानुष प्रकारामुळं असंतोष निर्माण होतो. एकदा मलाही पोलीस चौकीवर जाण्याचा प्रसंग आला. एस.टी. च्या बसमध्ये चढत असताना कुणीतरी माझ्या खिशातले सहाशे रुपये गर्दीचा फायदा घेऊन पळवले होते. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिल्यानंतर अधिकाऱ्यानं एक प्रश्न मला विचारला, 'खिशात पैसे घेऊन प्रवासाला निघण्याची चूक तुम्ही का केलीत ते प्रथम सांगा.'

आता या मार्मिक प्रश्नावर मी काय उत्तर देणार ? चूक माझीच होती. मी

चक्क पैसे घेऊन प्रवासाला निघण्याचा वेडेपणा केला होता. माझ्यासारख्या सुशिक्षित व्यक्तीनं ही चूक करावी याचं आश्चर्य पोलीस अधिकाऱ्यांला वाटलं. माझ्या खिशात पैसे नसते तर खिसेकापूला मोह पडला नसता आणि तो अनीतीच्या मार्गाकडं वळलाही नसता. त्याला चोरी करण्याची प्रेरणा माझ्यामुळं मिळाली. आणि त्यामुळं त्याचं नैतिक अध:पतन झालं याबद्दल मी दिलगिरी व्यक्त केली. पोलीस अधिकाऱ्यांनीही माझ्या गुन्ह्याबद्दल क्षमा करून माझं दु:ख हलकं करण्यासाठी मला चहा दिला, त्याचा निरोप घेतांना त्यानं मला प्रेमळ स्वरात सांगितलं, 'सर, अशी चूक पुन्हा करू नका.'

ज्या राज्यात गुन्हेगार सुखी आणि निर्भय असतात आणि सर्वसाधारण समाज भयाच्या दडपणाखाली वावरत असतो त्या राज्याला कोणती उपमा द्यावी हे मला कळत नाही. गुन्हेगारीचं मूळ केवळ दारिद्र्यात असतं असं मला वाटत नाही. खून, जाळपोळ, मारामाऱ्या आणि यापेक्षाही भयानक गुन्हे केवळ पोटाची भूक भागवण्यासाठी घडतात असं कुणाचं म्हणणं असेल तर ते चुकीचं आहे. ज्यांची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता आहे असे लक्ष्मीचे लालही अनेक गुन्ह्यात सहभागी असतात. थैलीच्या बळावरच त्यांची गुन्हेगारी संरक्षित राहाते. पोटासाठी चोरी करणाऱ्या एखाद्या भुरट्या चोराला तुरुंगात खडी फोडण्यासाठी पाठवलं जातं. पण खोऱ्यांनी संपत्ती ओढणाऱ्या आणि सत्तेची आसनं वाटेल त्या मार्गानं विकत घेणाऱ्या, काळाबाजार करणाऱ्या धनदांडग्यांना मात्र मानाचे मुजरे मिळू शकतात. अशी परिस्थिती राज्यसंस्थेच्या दुर्बलतेचं केविलवाणं प्रदर्शन मात्र घडवते.

सामान्य माणसाचा मग शासन संस्थेवरचा विश्वासच उडून जातो. आपल्या रक्षणासाठी राज्यसंस्था निर्माण झालेली आहे यावर त्याचा विश्वास बसणं अशक्य होतं. ज्याला गुंडांची भीती आहे तो पोलीस चौकीत जाण्याऐवजी आपल्या दैवालाच दोष देतो किंवा गुंड संस्थेसमोर गुडघे टेकून शरण जातो. आपले रक्षक आपल्याला न्याय देतील ही कल्पना आता कालबाह्य झालेली आहे. रामराज्यात असल्या मागासलेल्या गोष्टी आणि बुरसटलेली मूल्यं यांना प्रतिष्ठा असेल. त्या जुन्या कालखंडात गुन्हेगारीची शास्त्रशुद्ध चिकित्सा सहानुभूतीनं होण्याइतकी प्रगती झाली नव्हती. त्यामुळे गुन्हेगारांना ताबडतोब शासन मिळत असे. पण सुदैवानं तो पुराणमतवादी जमाना आता संपून गेला आहे. आता आपल्याला गुन्हेगारीच्या निर्मितीप्रक्रियेचा मुळापासून अभ्यास केला पाहिजे. हा अभ्यास करतांना आपली

दृष्टी पूर्णपणे सहिष्णुतेची आणि करुणेची असली पाहिजे. गुन्हेगारांना एकदम उतावीळपणानं शासन करणं, त्यांना तुरुंगात पाठवणं हे अज्ञानाचं आणि क्रूरतेचं लक्षण नव्हे काय ? बिचाऱ्याचं कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होईल म्हणून गुन्हेगाराकडे सहानुभूतीनं पाहाण्याची समाजानं सवय केली पाहिजे !

उत्तम राज्यात गुन्हेगारी डोकं वर काढू शकत नाही. कारण ते ठेचलं जाईल अशी दहशत तिला रात्रंदिवस वाटत असते. जेथे सज्जन धास्तावलेले असतात, पस्तावलेले असतात आणि जेथे शासन सुस्तावलेले असते, तेथे दुर्जन उजळ माथ्यानं वावरत असतात. आज वृत्तपत्रांतून येणाऱ्या निरनिराळ्या वार्ता वाचताना असं जाणवतं की, आमच्या देशात नाना प्रकारचे गुन्हे राजरोसपणे चालू आहेत. गुन्हेगारांना सामाजिक प्रतिष्ठाही प्राप्त झाली आहे. कदाचित सत्तेची लहानमोठी आसनंही आपल्या सामर्थ्यावर आणि संपत्तीच्या बळावर या लोकांनी मिळवलेली असतात. सत्ता आणि संपत्तीच्या छत्राखाली आपण निर्वेधपणानं आपला उद्योग करू शकतो, असा आत्मविश्वास यांच्या ठायी असतो. हे चित्र भयानक आहे. विनाशाच्या वाटेकडं आपली प्रगती होत आहे याचं हे द्योतक आहे.

एकदा एक भयभीत झालेला सत्प्रवृत्त समाजसेवक मला म्हणाला, 'ज्या पदावर मी आहे ते पद सामाजिक सेवेची संधी म्हणून मी स्वीकारलेलं होतं. माझ्या शक्तीप्रमाणं थोडंफार सेवाकार्यही मी करू शकलो. पण आता या पदाच्या माध्यमातून समाजकंटकांची काही अवैध कामं मी केलीच पाहिजेत अन्यथा मला ठार मारण्यात येईल अशा आशयाचे फोन रात्री - अपरात्री येत आहेत. या क्षेत्रातल्या एका जबाबदार वरिष्ठ व्यक्तीला मी हे सांगितलं तेव्हा तिनं मला सल्ला दिला की, 'जे आपल्या लाभाचं असेल ते जरुर करावं. समाज आणि धर्म, नीती आणि संस्कार असल्या शाब्दिक मृगजळापाठीमागं धावण्यात फारसा अर्थ नसतो. कोणतंही पद सेवेपेक्षाही आपल्या उपभोगासाठी आणि उन्नतीसाठी मुत्सद्दीपणानं वापरता आला पाहिजे. धर्म आणि सत्ता यांची निष्कारण गल्लत करू नका. हे जमत नसेल तर पदत्याग करा. दुसरा हुशार मनुष्य पदाधिकारी होईल आणि चातुर्यानं कारभार करील.'

त्या माणसाचा पावलोपावली कोंडमारा होत असावा. एके दिवशी तो आपल्या कार्यालयाकडे स्कूटरवरुन निघाला असताना एका ट्रकनं त्याला पाठीमागून धडक दिली आणि त्याचं आयुष्य संपवलं. अपघातात मृत्यू अशी नोंद करण्यात

येऊन हे प्रकरण समाप्त झालं. खरं तर हे प्रकरण कोणीतरी योजनापूर्वक संपवलं होतं.

आजच्या काळात 'रामायण', 'महाभारत' इत्यादी महाग्रंथांतली उदाहरणं देण्यात काही अर्थ नाही. पण या दोन्ही ग्रंथांत आदर्श राज्यशासनाचं चित्र रंगवण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'महाभारता'त तर राज्य आणि राजा यांच्या कर्तव्याचे विवरण अनेक ठिकाणी विस्तारानं केलेलं आढळतं. 'शांतिपर्वात्' भीष्मानं म्हटलं आहे, 'जेव्हा कार्यक्षम शासनकर्ता असा राजा नसेल तेव्हा बळी तो कान पिळी' ही अवस्था येऊन बलिष्ठ लोक दुबळ्यांना चिरडून टाकतील. त्यांना आपले दास बनवतील आणि स्त्रियांचे शील सुरक्षित राहणार नाही. त्यांचे अपहरण होईल. म्हणूनच समाजजीवन निकोपपणे चालू राहाण्यासाठी कल्याणकारी राज्य निर्माण झालं पाहिजे. प्रजेचे पालन करणारा राजा सिंहासनावर प्रस्थापित करावा म्हणजे राज्य आणि समाज सुव्यवस्थित राहील.' राजनीतीचं अनेकांगी विवरण महाभारतकारांनी केलं आहे. राजनीतीच्या मुळाशी सामाजिक कल्याणाची तात्त्विक बैठक असल्याशिवाय राजनीती उपकारक ठरत नाही हा या विवेचनाचा केंद्रबिंदू आहे. महाभारताचं उदाहरण आता फार जुनं झालं असं ज्यांना वाटत असेल त्यांनी हे लक्षात घेतलं पाहिजे की महाभारताचं अध्ययन पाश्चात्य विद्यापीठातही चालू आहे. केवळ कौरव-पांडवांचं घरगुती भांडण हा या ग्रंथांचा मध्यवर्ती विषय नाही. राजसत्ता आणि समाजकल्याण व नैतिकता यांची जेव्हा परस्परांपासून फारकत होते, तेव्हा उदात्त जीवनमूल्यांची कशी फरफट होते, आदर्श तत्त्वांचे कसे वस्त्रहरण होते याचं अत्यंत स्पष्ट आणि प्रक्षोभक दर्शन व्यासांनी घडवलं आहे. त्यामुळं हा ग्रंथ काळाच्या ओघात वाहून जाऊ शकत नाही. त्यातले विचार शिळे होतील असं मानणं हे शिळ्या दृष्टिकोनाचं लक्षण आहे.

पण तरीही काही लोकांना प्राचीन ग्रंथ आवडत नाहीत. फार तर जुने इंग्रजी ग्रंथ त्यांना चालतात. ऋषीप्रणीत ग्रंथांपेक्षा साहेबानं लिहिलेले ग्रंथ त्यांना शिरोधार्य वाटतात. इम्पोर्टेड वस्तू आणि इम्पोर्टेड ज्ञान (?) यांचं कौतुक करण्यात जी 'मॉडर्न ॲटिट्यूड' आहे ती भारतीय साहित्याबद्दल मुळीच नाही. आता अशा ज्ञानवंतांचं समाधान कोणत्या शब्दांतून करायचं ? त्यांना मी इतकचं सांगेन की, इंग्रजांनी आपल्या देशावर अनेक वर्ष राज्य केलं. त्या इंग्रजी राज्यातल्या सुव्यवस्थेचं आणि शासनाचं गुणगान न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या विद्वानानंही केलं आहे. ठग, पेंढारी, दरोडेखोर अनेक प्रकारचे गुन्हेगार यांना इंग्रजांनी पूर्णपणे मोडून काढलं.

कायद्याचा अंमल आणि वचक सर्वत्र प्रस्थापित केला. लोक घराघरातून बोलू लागले की, 'आता खुशाल काठीला सोनं बांधावं आणि काशीयात्रा करुन यावं' सुरक्षिततेची ही जाणीव इंग्रजी राज्यात होती. पारतंत्र्यांच्या काळात होती. आज राज्य आमचं आहे का ? सर्वसाधारण माणसाला या राज्याबद्दल आत्मीयता आणि विश्वास वाटला पाहिजे. गुंडपुंडांना या राज्यात भय आणि दरारा वाटायला हवा. प्रश्न असा आहे की, अशी परिस्थिती आपण निर्माण करू शकलो नाही याची कठोर मीमांसा केव्हातरी करणार आहोत का ? गुंडगिरीसमोर मान वाकवण्याची दहशतवादी प्रवृत्तीसमोर शेपूट हलवण्याची पोचट प्रवृत्ती जोपर्यंत एखाद्या राष्ट्रात असते तोपर्यंत ते राष्ट्र मरगळलेलेच राहाते. स्वाभिमान आणि क्रोध पुरुषार्थाला चेतना देतात. भेकडांनी कितीही सहानुभूती आणि दयाभावाचा अभिनय केला तरी त्यांना कोणी पुरुषार्थी म्हणणार नाही.

गेली कित्येक वर्षे आपल्या देशात घुसखोर घुसत आहेत. गुंडप्रवृत्तीशी त्यांचे लागबांधे जुळत आहेत. पंजाब, काश्मीर आणि आसाम या देशाच्या महत्त्वाच्या विभागांना ते भगदाडे पाडीत आहेत. याचा प्रतिकार करण्यासाठी आवश्यक असलेलं समर्थ आणि कठोर तत्त्वज्ञान राष्ट्राजवळ नसेल तर त्याचं भवितव्य काय असेल हे सांगण्याचीही आवश्यकता नाही. जे हात देशाचं स्वास्थ्यपूर्ण जीवन कुरतडीत आहेत त्या हातातली घातकी शस्त्रे खेचून घेण्याची आणि ते हात जेरबंद करण्याची ताकद राज्य संस्थेत असली पाहिजेत. जगातलं कोणतंही राष्ट्र याच नीतीचा अवलंब करीत उजळ माथ्यानं, स्वाभिमानानं जगत असतं. यापेक्षा अधिक काय सांगायचं ?

स्वातंत्र्यासाठी रक्त सांडून अटीतटीचा संघर्ष करताना प्राणाहुती दिलेल्या हुतात्म्यांच्या स्वप्नातलं बलिष्ठ असं राष्ट्र निर्माण करण्याच्या कार्यात आडवे येणारे कंटक व्यवस्थितपणानं बाजूला करता येणं हाच प्रगतीचा पहिला मंत्र आहे असं वाटतं.

संत तुकोबा म्हणतात ते त्यांच्यात शब्दात सांगणं भाग आहे.

मला भेटला तर त्याला कासेची लंगोटीही द्यावी. पण नाठाळाच्या टाळक्यात काठीचा प्रहार करण्यात काय चूक आहे ?

●●●

# एका कुलगुरूची व्यथा

एका विद्यापीठाच्या मराठी विभागात एक प्राध्यापक आणि दोन अधिव्याख्याते यांची नियुक्ती करायची होती. विद्यापीठाने नेमलेल्या निवड समितीचा मी एक सदस्य होतो. माझ्याबरोबर एक नामांकित संशोधक आणि निवृत्त संपादक हेही सदस्य म्हणून काम पाहणार होते. मुलाखत सुरू होण्यापूर्वी विद्यापीठाचे कुलगुरू आम्हाला म्हणाले, 'आपण दोघांनी गुणवत्तेला अनुसरुन उमेदवारांच्या नियुक्तीबद्दल निर्णय घ्यायचा आहे. अनेकांनी फोनवरुन काही विशिष्ट उमेदवारांच्याबद्दल आग्रहानं सांगितलं आहे. एकदोन मंत्र्यांचेही फोन आले होते. आपल्यालाही हा त्रास झाला असण्याची शक्यता आहे. पण माझ्या विद्यापीठातला प्रत्येक अध्यापक गुणवान असला पाहिजे. आपल्या अभ्यासाच्या विषयात अधिकाधिक व्यासंग करण्याची त्याची धडपड असली पाहिजे, हा माझा आग्रह आहे. विद्येच्या क्षेत्रात विद्या ही सर्वप्रथम महत्त्वाची मानावी या मताचा मी असल्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, आपण केवळ गुणवत्तेलाच प्राधान्य द्यावे हे मी आपल्याला सांगावं असं नाही. या निवडीसमितीत आमच्या विद्यापीठाशी संबंधित असे आणखी सदस्य आहेत. त्यांच्यावर दडपण येण्याचा संभव असतो म्हणून निर्णयाची सूत्रं मुख्यत: आपल्या दोघांच्या हातात असावीत अशी माझी इच्छा आहे.'

कुलगुरुंनी अत्यंत प्रांजळ शब्दांत आपली भूमिका स्पष्ट केलेली पाहून मला फार बरं वाटलं. गटबाजीचं, राजकारणाचं लोण विद्यापीठापर्यंत केव्हाच पोहोचलेलं आहे. अगदी कुलगुरुची निवडसुद्धा गुणवत्तेपेक्षा अन्य 'महत्त्वपूर्ण' निकषावर केली जाते हे आता सर्वांना माहीत आहे. पण या विद्यापीठातले कुलगुरू विद्याप्रेमी, सुसंस्कृत आणि निर्भय वृत्तीचे होते. मंत्र्याच्या शब्दालाही ते धूप घालीत नसत. चहा घेता घेता आलेल्या अर्जाची आम्ही थोडीशी छाननी केली आणि मग मुलाखतीला सुरुवात झाली. एका तिशीतल्या तरुणीनं प्रवेश केला. तिच्या मुद्रेवर नको तितकं स्मित होतं. स्वरात अनावश्यक लाडिकपणा होता. कोणताही प्रश्न विचारला तरी त्याच प्रश्नाचं उत्तर न देता मान वेळावून हातातल्या पर्सशी चाळा

करीत 'हे अजून वाचायचं आहे' हे ठराविक उत्तर देऊन ती आपल्या दंतपंक्तीचं प्रदर्शन करीत होती. आपल्या अभ्यासापेक्षा थोड्या फार सौंदर्याचा प्रभाव पाडून निवड समितीला प्रभावित करण्याचा तिचा प्रयत्न असावा. तिनं सादर केलेल्या प्रशस्तीपत्रकात एक पत्र खुद्द मंत्र्याचं आणि एक सिनेमा नटाचं होतं. आता त्या तरुणीला काही विचारण्यात अर्थ नव्हता. पण आर्टस् फॅकल्टीच्या डीननं एक नवाच मुद्दा उपस्थित केला. तो म्हणाला, 'या मिस् देशपांडे. नृत्यात विशेष प्रवीण आहेत. डिस्को नृत्यात विशेष प्रवीण आहेत. डिस्को नृत्यात तर त्यांचा हात कुणीच धरू शकणार नाही. चार महिन्यापूर्वी आमच्या सोशल क्लबवर त्यांचा प्रोग्राम झाला होता. नृत्याचं शिक्षण त्यांनी प्रसिद्ध नर्तक ... देवीप्रसाद यांच्याकडं .....

काहीशा रागानं पण आवाजात मार्दव ठेवून मी विचारलं 'या साऱ्या माहितीचा इथं काय संबंध आहे ? आपण मराठी विषयाच्या अधिव्याख्यात्याच्या जागेसाठी विचार करीत आहोत. बाई नृत्य-संगीत प्रवीण असतील पण त्यांची या मुद्यावर आपल्याला निवड करायची नाही. सध्या त्या पीएच. डी. चं काम करतात असं त्यांनी म्हटलं आहे. त्या कामाच्या प्रगतीबद्दल त्यांनी बोलावं.

बाईच्या चेहऱ्यावर नाराजी पसरली. डीनसाहेब म्हणाले, 'त्यांचा मीच मार्गदर्शक आहे. अद्यापी विषय, निश्चित झालेला नाही. पण 'नृत्यकला आणि मराठीतील बखरवाङमय' असा विषय देण्याच्या विचारात आहे.' कुलगुरुंच्या कपाळावर आठ्या पसरल्या. त्यांनी खुणेनंच बाईची मुलाखत संपल्याचं सांगितलं. हातातल्या पर्सला हेलकावे देत आणि समितीच्या प्रत्येक सदस्याकडं पाहून लाडिक हास्य करीत बाईंनी निरोप घेतला. दुसरे एक उमेदवार आपले करकरणारे बूट वाजवित आले आणि आमच्यापुढे स्थानापन्न झाले. त्यांची वीस पुस्तके प्रकाशित झाली होती. मला त्यांच्याविषयी साहजिकच आदर वाटला. पण त्यांच्या छोटेखानी पुस्तकावरची चित्रं आणि शीर्षकं पाहून त्यांच्या साहित्यिक प्रकृतीची मला चिंता वाटू लागली. माझ्या सहकाऱ्यानं त्यांना गंभीर प्रश्न विचारला.

'तुमच्या पुस्तकांच्या नावावरुन या पुस्तकांचा काही वेगळाच बोध होतो. उदाहरणार्थ 'माझ्या मिठीत तू' किंवा 'वाऱ्यावर फडफडला पदर तुझा गं' अथवा 'अंधाऱ्या रात्रीचे रहस्य' ही नावं फारच गमंतीदार वाटतात. साहित्य आणि समाजजीवन या संबंधी तुमच्या लेखनात फारसा विचार असेल असं वाटत नाही.'

ते उमेदवार म्हणाले, 'मी सामान्य माणसांसाठी लिहितो. गिरणी कामगार,

कष्ट करणारे मजूर आणि पंधरा सोळा वर्षांची पोरं-पोरी यांना माझं साहित्य आवडतं. 'धुंद प्रेमाची बहार' माझ्या पुस्तकात वाचायला मिळते.' त्यांना मी गमंतीन प्रश्न विचारला,

'तुमचा आदर्श कोण ?' त्यानं मोठ्या दिमाखानं उत्तर दिलं - 'दादा कोंडके'

आता ही मुलाखत ताणण्यात फारसा अर्थ नव्हता. एका महाविद्यालयात सात आठ वर्षे अध्यापन करणाऱ्या या तथाकथित लेखकाने 'इष्काची रात्र' आणि 'तुझ्या जवानीचा कहर' असल्या रद्दड, विकृत कामकथा लिहाव्यात आणि स्वत:ला सामान्यांचा असामान्य लेखक म्हणवून घ्यावं याची मला चीड आली. 'कॉलेजात नेमकं तुम्ही काय शिकवता ? सावरकर, गडकरी, हरीभाऊ आपटे, शिरवाडकर, फुले आणि टिळक यांचं साहित्य तुम्ही कधी वाचलं आहे का ? असा प्रश्न विचारल्यावर तो 'असामान्य लेखक' गडबडला. त्यांच्या साहित्यकृतीची नावंही त्याला धड सांगता येईनात. 'टिळकांनी गीता लिहिली' गडकऱ्यांची एक कादंबरी आपण वाचली आहे आणि शिरवाडकर हे सतराव्या शतकात होऊन गेले - असे अकलेचे तारे त्याने तोडले - अखेर त्याला आपल्या राष्ट्रगीतातल्या 'द्राविड' आणि 'उत्कल' या शब्दांचा अर्थ विचारला तोही त्याला सांगता आला नाही. मराठी साहित्याचे हे अभ्यासक पाहिल्यावर मलाच शरम वाटू लागली. मीही एक अध्यापक आहे. तीस-पस्तीस वर्षे कॉलेजात साहित्य विषय मनापासून शिकवला. पण माझ्या विद्यार्थ्यांत वाङ्मयाची अभिरुची मी कितपत निर्माण करू शकलो हा प्रश्न माझा पाठलाग करीत राहतो. एम. ए. झालेल्या आणि शाळा कॉलेजात शिक्षक असलेल्या लोकांनाही आपल्या राष्ट्रगीताचा कर्ता कोण ? हे कित्येक वेळा माहित नसतं. संपूर्ण राष्ट्रगीतसुद्धा त्यांना तोंडपाठ नसतं. ज्याला आपलं राष्ट्रगीत नीट आठवत नाही, राष्ट्रगीत ऐकत असतांना ज्याचं मन आपुलकीनं, अभिमानानं उचंबळत नाही. त्यानं खुशाल आत्महत्या करावी. जगण्याचा अधिकार त्यानं गमावला आहे. असंच मी म्हणेन. माझे हे विचार दुराग्रही आहेत असं ज्यांना म्हणायचं असेल त्यांनी तसं म्हटलं तरी माझ्या विचारात बदल होणार नाही.

मुलाखतीसाठी आलेले बहुतेक उमेदवार साधारण प्रतीचे असल्यामुळे आमची निराशा झाली. एकजण शेक्सपिअर ऐवजी सेक्सपिअर म्हणत होता, मराठी आणि हिंदीतल्या उत्कृष्ट अक्षर साहित्यकृतींची त्यांना फारशी माहिती नव्हती. आपल्या अज्ञानाची त्यांना खंत वाटत होती, असंही आढळलं नाही. एक उमेदवार

म्हणाला,

'सध्या आपण विज्ञानाच्या युगात आहोत. शेकडो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या ज्ञानेश्वर, तुकारामाशी आपला काय संबंध ? ते सगळं जुनंपुराणं जळून गेलं तरी काय बिघडणार आहे ?'

आपण फारच महनीय क्रांतिकारक बोलत आहोत. आपल्यासमोर बसलेल्या विद्यापीठीय विद्वानांना काहीतरी मौलिक मार्गदर्शन करावं अशा अविर्भावात तो बोलत होता. वस्तुत: त्यानं ज्ञानेश्वरी वाचलीही नव्हती आणि तुकोबाची गाथाही कधी उघडली नसावी. पण जुन्या परंपरा, जुनं साहित्य यांच्यावर पिंक टाकून तुच्छतेनं बोलण्याची काहीजणांना मॉर्डन सवय असते. जुनं आणि नवं या दोहोचाही त्यांचा अभ्यास नसतो. कुठेतरी ऐकलेली रेडिमेड मते त्यांनी दत्तक घेतलेली असतात. कुठल्याच विचाराची त्यांनी चिकित्सा केलेली नसते कारण तो त्यांचा वकूबच नसतो. अर्धवट वाचलेलं किंवा ऐकलेलं मूर्ख आत्मविश्वासानं सांगण्याचं धाडस हे लोक सहज करू शकतात.

मी त्या स्वयंमन्य, अर्वाचीन पंडिताला विचारले,

'संताचं साहित्य आता जुनाट झालं असं तुम्ही म्हणालात याला काही पुरावा देऊ शकाल काय ? शेक्सपिअर आणि मिल्टनसुद्धा जुन्या काळातलेच कवी आहेत. पण इंग्रजी साहित्यात आजही त्यांच्या वाङमयाविषयी भरपूर लिहिलं जातं. आजही शेक्सपिअर इंग्रजीतच नव्हे तर जागतिक साहित्यात श्रेष्ठ लेखक मानला जातो. तो वाचणं हे आधुनिकतेचं लक्षण ठरतं. ज्ञानेश्वर, तुकाराम तुम्हाला कोणत्या कारणांमुळं जुने-पुराणे वाटतात, काळाच्या अपेक्षेनं की विचार आणि भावना यांच्या अपेक्षेनं ? शैलीच्या अपेक्षेनं की जीवनचिंतनाच्या अपेक्षेनं ते स्पष्ट करा.'

आता मात्र तो उमेदवार थोडासा डळमळीत झाला. संत हे देवभक्त होते म्हणून ते मागासलेल्या विचारांचे होते असे केविलवाणे समर्थन करू लागला. ज्ञानेश्वरांच्या पसायदानात आणि तुकारामांच्या अभंगात मानवी संस्कृतीला उणेपणा येईल असा कोणता विचार आहे काय असे विचारून त्याला पसायदानातल्या कोणत्याही दोन चार ओळी म्हणण्यास सांगितल्यावर तो पार कोसळला. 'ज्ञानेश्वरी'च्या लेखनाचा कालखंडही त्याला नीटसा माहीत नव्हता. पण मराठीतलं संतसाहित्य प्रतिगामी विचारांनी ओतप्रोत भरलेलं आहे म्हणूनच ते वाचण्याच्या फंदात आपण कधी पडला नाही असा 'महत्त्वपूर्ण' निष्कर्ष काढून तो बाहेर पडला.

योग्य उमेदवार मिळाला नाही म्हणून पुन्हा जाहिरात देऊन मुलाखती घेऊ असे कुलगुरुंनी जाहीर केले. मी मात्र व्यथित झालो होतो. कुलगुरू मला म्हणाले, 'ही केवळ मराठी विषयाची अवस्था नाही तर साऱ्याच विषयांत जवळजवळ हाच विदारक अनुभव येतो. एखाद्या विषयाचा अभ्यास करतांना त्या विषयावर अधिकारी लेखकांनी लिहिलेली सर्व पुस्तकं प्रयत्नपूर्वक मिळवून आम्ही वाचत होतो, टिपणं काढीत होतो, साधक बाधक चर्चा करीत होतो. एखादं पुस्तक मिळालं नाही तर व्याकूळ होत होतो. ती परंपरा अलिकडं भलतीच क्षीण झाली आहे. मी कधी कधी रात्री नऊनंतर विद्यार्थ्यांच्या हॉस्टेलवर जातो. फिल्मी मासिकं, सिगारेटची पाकिटं आणि सांगायला लाज वाटते पण सांगतो, बिअरच्या आणि व्हिस्कीच्या बाटल्या कित्येक ठिकाणी आढळतात.

'आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर कुलगुरूंचं आक्रमण होत आहे म्हणून हा कुलगुरू बदला' अशा घोषणा मला पाहिल्यानंतर कधी कधी दिल्या जातात. आज शिक्षण घेणारे हेच विद्यार्थी उद्याचे प्राध्यापक, वकील, व्यापारी आणि प्रशासक होणार आहेत. त्यांच्यातून उद्याचा नागरिक कसा घडवला जाणार या प्रश्नांमुळं मी बेचैन झालो आहे. विद्यापीठाच्या ग्रंथालयात अमुक विषयावरचे ग्रंथ कमी आहेत ते वाढवा अशा मागणीसाठी मात्र विद्यार्थ्यांनी कधी मोर्चा काढला नाही किंवा मला घेराव घातला नाही. तरुणांच्या भावना मी समजू शकतो. कधीतरी त्यांच्या वर्तनाचा तोल ढळू शकतो पण बेताल वर्तन, अर्वाच्य बोलणं, गुंडगिरी यांच्या अभेद्य वर्तुळात हा विद्यार्थीवर्ग अडकून पडला आहे. आमचे उपदेशाचे शब्द त्याला मागासलेले व प्रतिगामी वाटतात. या विद्यार्थ्यांना फूस लावणारे काही राजकीय पुढारीही असतात. हे सारं निराश करणारं विषण्ण दृश्य पाहिलं म्हणजे मी कुलगुरू आहे या घटनेची मला लाज वाटू लागते. मूर्खपणा केला आणि या विद्यापीठाचा कुलगुरू झालो असा पश्चाताप होतो. ज्या भूमीत काही नवीन पेरणी करावी अशी इच्छा होती, ती भूमीच वांझ आहे. नव्हे आतून सडलेली आहे. या भूमीतून निघणारं पीक विषारी असणार असं वाटून तीव्र वैफल्य येतं. विद्यार्थ्यांच्या समोर असणारे प्राध्यापकांचे, प्राचार्यांचे आणि कुलगुरूंचे आदर्श कुठे स्वच्छ असतात ? दोन चार आमदार आणि मंत्र्यांचे कासोटे धरून, त्यांच्या पुढे शेपूट हालवणारे लोक 'येन केन प्रकारेण' कुलगुरूंची खुर्ची मिळवतात. ते आपल्या अधिकाराच्या तोऱ्यात असतात. गटबाजीच्या बळावर खुर्चीचा तोल सांभाळण्याची कसरत करीत

राहातात. ताठ मानेनं वावरणारा शिस्तबद्ध कारभार करणारा एकादा व्यासंगी कुलगुरू असू शकतो. पण असला माणूस कुणालाच हवासा वाटत नाही. राज्यकर्त्यांसमोर तो वाकत नसल्यामुळं राजकीय वर्तुळातही तो अप्रिय असतो. या वातावरणात विद्यापीठाला त्याचं सन्मानाचं स्थान उरणं शक्यच नाही. जनतेच्या शिक्षणापेक्षा राजकीय सत्तास्थानांच्या गरजेतून विद्यापीठांची निर्मिती होते. मूळ हेतूच बदलल्यावर विद्यापीठातून राजकारणाचे अड्डे निर्माण झाले तर त्यात आश्चर्य मानण्याचं कारण नाही.'

कुलगुरू आमच्याशी फारच मोकळेपणानं बोलले. मनातलं सारं दु:ख त्यांनी व्यक्त केलं होतं. एका मोठ्या विद्यापीठाचा हा विद्वान, प्रतिष्ठित कुलगुरू अंतर्यामी इतका व्यथित असेल याची मला कल्पना नव्हती. एका व्यापक सामाजिक जाणीवेतून ते दु:खी झाले होते. त्यांच्या वेदनेत व्यक्तिगत स्वार्थाचा लवलेशही नव्हता. ज्या क्षेत्रात ज्ञानाचे आणि संस्कृतीचे मळे फुलवावेत ते क्षेत्र उजाड आणि ओसाड होत आहे हे दृश्य त्यांना दिसत होते. जो विचार करतो तो दु:खी होतो हा जगाचा एक चमत्कारिक नियम आहे. जो केवळ सत्तेच्या खुर्चीवर बसून अहंकाराला कुरवाळीत राहतो, त्याला या प्रकारचं दु:ख होणं शक्य नाही. मी कुलगुरूंना म्हणालो, 'आपल्यासारखी माणसं जोपर्यंत आहेत तोपर्यंत थोडीतरी आशेला जागा आहे. तुमच्या प्रयत्नांतून काहीतरी विधायक घडू शकेल' कुलगुरू क्षीणपणे हसले. त्यांच्या हसण्यातही एक प्रकारची उदासीनता आणि निराशा होती.

●●●

# अशी ही स्नेह संमेलनं !

एका महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनातली घटना. संमेलनाचे प्रमुख अतिथी एक चांगले विचारवंत लेखक होते. अध्यापनाच्या आणि संशोधनाच्या क्षेत्रात त्यांनी उत्तम लौकिक मिळवला होता. प्राचार्यांच्या बरोबर ते व्यासपीठावर आले त्यावेळी केवळ प्राध्यापक वर्गानं टाळ्या वाजवून त्यांचं हार्दिक स्वागत केलं. विद्यार्थ्यांच्या समूहातून मात्र चमत्कारिक चित्कार उमटले. काही वात्रट विद्यार्थी उपहासानं 'या मास्तर ! कसं काय येणं केलं ?' असं म्हणाले. कुठून तरी कुत्र्या - मांजराच्या केकाटण्याचे आवाज येऊ लागले. व्यासपीठाच्या जवळच फटाकड्यांचे आवाज झाले. या अपूर्व स्वागतामुळं ते पाहुणे स्तंभित झाले. पण मुद्रेवर कृत्रिम हास्य आणून त्यांनी श्रोतृसमूहाकडं पाहून नमस्कार केला आणि ते आपल्या खुर्चीवर बसले. आजचा प्रसंग काही वेगळाच आहे याची त्यांना जाणीव झाली. पण स्नेहसंमेलनाच्या मनमोकळ्या वातावरणात कॉलेजातले तरुण विद्यार्थी शिस्तीची बंधनं काही अंशी झुगारुन देण्याचा प्रयत्न करतात याची त्यांना कल्पना होती. उथळ प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांना आपल्या शब्दांतून कसं आवरावं याचं तंत्र त्यांना अवगत होतं. त्या विद्यार्थ्यांनी संमोलनासाठी प्रमुख पाहुणा म्हणून एखाद्या लोकप्रिय नटीला किंवा चित्रपटातून तुफान हाणामारीच्या स्टंट भूमिका करणाऱ्या एखाद्या तरुण नटाला आमंत्रित करावं असा हट्ट धरला होता. कारण त्याच गावातल्या दुसऱ्या कॉलेजच्या संमेलनात रूपेरी पडद्यावरची एक दुय्यम-तिय्यम भूमिका करणारी, साधारण बरी दिसणारी (कुठलीही नटी बरी दिसावी लागते. कारण अभिनयापेक्षा 'दिसण्यावरच' तिचं महत्त्व अवलंबून असतं) नटी आली होती. त्या नटीला 'पाहाण्यासाठी' गाव जमा झालं होतं. तिच्या हातून बक्षीस मिळवणं हा आपल्या जीवनातला सर्वोच्च पराक्रम आहे, असं विद्यार्थ्यांना वाटत होतं. बक्षीस समारंभ संपल्यानंतर तिनं चक्क अडीच मिनिटं लाडिक भाषण केलं. ती आपल्या नमुनेदार मराठीत म्हणाली,

'माय डियर फ्रेण्डस् (टाळ्या आणि शिट्ट्या) मी तुम्हाला गुड वुईशेस द्यायला आली आहे. तुमचं फ्रॅक्चर - सॉरी बरं का, तुमचं फ्युचर ब्राइट आहे.

तुमच्या आमंत्रणाबद्दल मी थँक्स मानते.' एवढं दीर्घ आणि सुंदर भाषण केल्यानंतर तिनं चेहऱ्यावर आलेला घाम पुसला. पर्समधल्या छोट्या आरशात पाहून ओठावरून लिपस्टिकची कांडी फिरवली. मुंबईहून ती विमानानं आली होती आणि आता परतीचा प्रवासही तिला 'अस्मानातूनच' करायचा होता. अडीच मिनिटांच्या भाषणासाठी तरुणांची ती स्फूर्तिदेवता मुंबईहून आपल्या भक्तांसाठी आली होती. दर्शन देऊन आता ती कारमध्ये बसून विमानतळाकडे गेली. तिचं भाषण ऐकायला - चुकलो, तिला पाहायला आलेल्या प्रचंड गर्दीचं कितपत समाधान झालं कुणास ठाऊक ? पण कॉलेजातल्या विद्यार्थ्यांना मात्र आपण चीफ गेस्ट म्हणून आजच्या एका ॲक्ट्रेसला आणू शकलो याबद्दल कृतार्थता वाटली असावी. जनरल सेक्रेटरीनं आपल्या निवडक मित्रांना या दिग्विजयी कामगिरीबद्दल रात्री एक जंगी 'पार्टी' दिली. स्नेहसंमेलन पूर्णपणानं यशस्वी झालं. कॉलेजच्या इतिहासात ते अभूतपूर्व ठरलं. अशी अविस्मरणीय संमेलनं साजरी करण्याची पवित्र परंपरा मोडून कुठल्यातरी एका विचारवंत लेखकाला प्रमुख पाहुणा म्हणून बोलावण्याचा वेडेपणा त्या विद्यार्थ्यांना पसंत नव्हता. म्हणूनच, 'या मास्तर ! कसं काय येणं केलं ? घरचं समदं बरं हाय ना ?' असं म्हणून त्या लेखकाची त्यांनी टर उडवली होती. आपली मागणी डावलून प्राचार्यांनी विचारवंताला बोलावण्याचा अविचार करावा, याची चीड त्या 'स्वाभिमानी' विद्यार्थ्यांना आली होती.

बिचारा लेखक आणि विचारवंत ! त्या विद्यार्थ्यांना त्यानं कसं तोंड दिलं कुणास ठाऊक ? पुन्हा असल्या फंदात पडायचं नाही अशी प्रतिज्ञा करूनच तो आपल्या गावी परतला असावा. सध्या अनेक महाविद्यालयांतल्या स्नेहसंमेलनांची हीच कर्मकहाणी आहे. एखादा सवंग लोकप्रिय नट मिळवण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी प्रथम धडपड करतात. मुंबईला जाऊन चार-सहा नटनटींच्या दारात उभे राहातात. एखादा सुमार नट रिकामा असल्यामुळं होकार देतो आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचं मान्य करतो. व्यासपीठावर येण्यापूर्वीच 'स्फूर्तिदायक पेयाचं' प्राशन करून तो एखाद्या हिंदी सिनेमातला भडक संवाद तीन-चार मिनिटं पाठ म्हणून दाखवतो. असल्या फिल्मी संवादाला हमखास टाळ्या देण्याइतकी उच्च रसिकता सध्या कॉलेज विद्यार्थ्यांत असते यात शंका नाही. खरं तर उत्तम रीतीन विचार व्यक्त करणारे काही चांगले कलावंत नाट्य आणि चित्रपट व्यवसायात निश्चित आहेत. पण 'बाजारभाव' असलेल्या आणि रुपेरी पडद्यावर प्रेमाचे गुळचट

संवाद गळेपडू पद्धतीनं म्हणणाऱ्या नटनटींना संमेलनात बोलावण्याचा हा अट्टाहास हास्यास्पद आहे. गायक, नर्तक, अभिनेते, खेळाडू, कारखानदार, लोकनेते, लेखक - कवी किंबहुना जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात आपल्या परिश्रमानं आणि प्रतिभेनं नाव मिळवलेली माणसं शाळा-कॉलेजांतून आणि विद्यापीठांतून आवर्जून बोलवावी. कला क्षेत्रातलेही उच्च आदर्श विद्यार्थ्यांनी पाहावेत आणि अभ्यासावेत. हे एक आवश्यक शिक्षणच आहे. काही वर्षांपूर्वी मुंबईच्या एका महाविद्यालयात मी वसंत देसाई आणि सी. रामचंद्र या दोन संगीत दिग्दर्शकांची व्याख्यानं ऐकली होती. लोकांची संगीतविषयक अभिरुची नाटक-सिनेमातून कशी घडवता येईल यावर त्यांनी विचार व्यक्त केले होते. आपल्या काही गाजलेल्या गीतांना चाली लावतांना आपण कसे अस्वस्थ झालो होतो आणि विशिष्ट रसाला अनुकुल अशी चाल शोधण्यासाठी केवढी धडपड केली होती याचा इतिहास त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाला. संगीत असो, नाट्य, नृत्य, चित्र, शिल्प फार काय क्रिकेट, टेनिससारखा खेळ असो, या सर्व क्षेत्रांत विलक्षण निष्ठेची आणि तपस्येची आवश्यकता असते. केवळ केसांच्या ठेवणीमुळं किंवा विशिष्ट ढंगानं चालल्यामुळं आपल्याला एखाद्या प्रसिद्ध नटाप्रमाणं किंवा नटीप्रमाणं लोकप्रियता मिळेल असल्या भ्रमात कुणी राहू नये. कोणत्याही कलेत वा व्यवसायात उच्चपदी जायचं असेल तर अखंड परिश्रमाची जरुर असते हे वस्तुत: सांगण्याचंही कारण नाही. बार्शीच्या साहित्य संमेलनाला जाण्यापूर्वी एक दिवस सी. रामचंद्र सोलापूरात होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर तास-दोन तास संवाद करण्याची मला संधी मिळाली. ते म्हणाले,

'सी. रामचंद्र या नावाला आज मोल असेल. पण जगाच्या बाजारात आपल्या कलेचं नाणं खणखणीत वाजू शकतं हे सिद्ध करण्यासाठी जीवघेणा संघर्ष करावा लागतो. उगीच दोनचार उथळ आणि बाजारी चाली बांधल्या म्हणजे आपण मोठे संगीतकार झालो असल्या भ्रमात राहू नये. गाणं असं बांधावं की ते ऐकतांना काळजाला भिडावं. पुन्हा पुन्हा ते सूर मनात पिंगा घालीत राहावेत. ते सूर विसरले जाऊ नयेत.'

ऐ मेरे वतन के लोगों,
जरा आँख में भरलो पानी
जो शहीद हुए है उनकी,
जरा याद करो कुर्बानी

या शब्दांत निद्रिस्त असलेलं भावनिक सामर्थ्य मला जागं करायचं होतं. चार-सहा दिवस खूप धडपड केली. वीस-पंचवीस चाली लावून पाहिल्या. कुठलीच चाल मला परिणामकारक वाटली नाही. सकाळी सैनिकांच्या समोर कार्यक्रम होता. पंडित जवाहरलाल नेहरू येणार होते. सकाळ झाली तरी मला चाल सुचेना. मी बेचैन झालो. काय करावं ते समजेना. कार्यक्रमाच्या ठिकाणी मी आणि लता निघालो. वाटेतच एकाएकी वीज चमकावी तशी माझ्या डोक्यात एक नवी चाल चमकली. गाडीतच ती हार्मोनियमवर मी लतेला म्हणून दाखवली. आणि मग त्या हजारो सैनिकांच्या समोर लतानं ते गीत जेव्हा भावपूर्ण स्वरात गायिलं तेव्हा सैनिकांच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. पंडित नेहरूही आपले डोळे टिपीत होते. सारे श्रोते भारावले होते. त्या करुण, व्याकुळ सुरांनी त्यांच्या अंत:करणाची तार छेडली होती. लताचेही डोळे भरले होते. सारं वातावरण कंपित झालं.

मी आनंदानं हुंदके देत होतो. माझी तपश्चर्या फळाला आली होती. तो क्षण तृप्तीचा आणि कृतार्थतेचा होता. 'आजही तो माझ्या काळजात जिवंत आहे' वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या कलावंतांना आणि प्रयत्नवादी ध्येयनिष्ठ लोकांना अनेक प्रकारचे जिवंत अनुभव आलेले असतात. अशा कलावंतांना, नटनटींना कॉलेजात अवश्य आमंत्रित केलं जावं. ते आपल्या अनुभवाच्या भाषेतून काहीतरी मौलिक सांगू शकतात. पण वेगळंही घडतं. मागील वर्षी एका महाविद्यालयात एका दुय्यम दर्जाच्या नटाबरोबर मलाही स्नेहसंमेलनासाठी अतिथी म्हणून बोलावलं होतं. याबद्दल खुलासा करतांना प्राचार्य म्हणाले, 'आम्ही थोडी विभागणी केली आहे. नटानं बक्षीसं द्यायची आणि तुम्ही भाषण करायचं.' प्राचार्यांच्या योजकतेचं मला कौतुक वाटलं. नट महाशय माझ्या शेजारी खुर्चीत बसले होते. ते मला हळूच म्हणाले, 'माफ करा प्रोफेसरसाहेब, मी काही फारसं बोलणार नाही. एवढी प्रचंड गर्दी पाहून माझ्या तोंडून शब्द तरी बाहेर पडतील की नाही कळत नाही. कॉलेजात काय बोलावं लागतं याची मला कल्पनाही नाही. बोलण्याचं काम तुम्हीच करायचं आहे.'

सिनेमा नटाच्या उपस्थितीत आपलं कोण ऐकून घेणारं ही शंका माझ्याही मनात होती. पण 'रोमन हॉलिडे' या लोकप्रिय चित्रपटाची कथा त्यादिवशी मी रंगवून सांगितली. कर्तव्य आणि प्रेमभावना यांचा संघर्ष जीवनात कसा होत असतो. याची काही इतिहासातली उदाहरणं दिली आणि अखेर म्हणालो,

'व्यासपीठावर पडद्यावरचे सुप्रसिद्ध कलावंत मिलिंदकुमार हजर असतांना तुम्ही माझं भाषण इतका वेळ योग्य रीतीनं ऐकून घेतलंत याचं मला आश्चर्य वाटतं. सिनेनटासारखा मी 'प्रेक्षणीय' नाही. पण थोडा फार 'श्रवणीय' आहे असं तुम्हाला वाटावं यावरून तुमच्या रसिकतेबद्दल मला कल्पना आली.' असं म्हणून ती वेळ मी मारून नेली. पण असले प्रयोग पुन्हा करायचे नाहीत हा निर्णय मी घेतला. एक गोष्ट मात्र खरी की, संमेलनप्रसंगी बहुधा विद्यार्थी-विद्यार्थिनी हलकं-फुलकं, खेळकर, काहीसं खोडकर, प्रसन्न थोडंफार उद्‌बोधक ऐकण्याच्या मन:स्थितीत असतात. अशावेळी एखादे विचारवंत संशोधक 'वर्णव्यवस्थेचे भारतीय जीवनावर झालेली विविधस्वरुपी परिणाम आणि त्यातून घडलेला साधक-बाधक इतिहास' किंवा 'सहकारी पतपेढ्यांची चळवळ कशी यशस्वी होईल ?' अथवा 'अश्म युगातील मानव' असल्या विषयावर गंभीरपणानं आंबट चेहऱ्यानं बोलू लागले तर विद्यार्थी-विद्यार्थिनी काहीतरी बेशिस्त वर्तन करतील. निदान ते केव्हा हे भाषण संपेल याची वाट पाहत बसतील. एका प्राथमिक शाळेच्या स्नेहसंमेलनात एका वक्त्यानं 'भारताचं परराष्ट्रीय धोरण आणि मध्यपूर्वेतील परिस्थिती' या विषयावर चाळीस मिनिटं भाषण ठोकलं. वक्ते गावातील एक प्रसिद्ध पुढारी होते. त्यामुळं त्यांना अडवणं कुणालाच शक्य नव्हतं. शिक्षक मंडळी हैराण झाली होती. प्राथमिक शाळेतली ती पोरं एकमेकांना चिमटे घेत होती. मारामारी करीत होती. मधूनच मुख्याध्यापक 'शांत रहा ! नाही तर कानफाडात देईन' अशी भीमगर्जना करीत होते. पण पुढारी महाशय मध्यपूर्वेतलं राजकारण आटोपून शाळेच्या वातावरणात काही केल्या येत नव्हते. ते 'चित्तथरारक' भाषण ऐकतांना कुठे काय बोलू नये याचं शिक्षण प्रथम वक्त्यानं घेतलं पाहिजे असा माझ्या मनात विचार आला. ज्याला भारताचं परराष्ट्रीय धोरण कळतं त्याला लहान पोरांच्या समोर बोलण्याचं धोरण आखता येत नाही हा चमत्कारच आहे.

स्नेहसंमेलनं आनंदासाठी असतात. उद्‌बोधनासाठीही असतात. विद्यार्थी-विद्यार्थिनी, अध्यापक आणि पालक यांचा हा एक स्नेहमेळावा असतो. अशा प्रसन्न वातावरणात हसतखेळत रसिकतेनं चार ज्ञानाच्या आणि मनोरंजनाच्या गोष्टी पाहुण्यानं बोलाव्यात अशी अपेक्षा असते. महाविद्यालयात आणि विद्यापीठात काही संमेलनांतून मी सुंदर विचारप्रवर्तक व्याख्यानं ऐकली आहेत. तरुण विद्यार्थ्यांच्या तरुण मनोवृत्तीला गुदगुल्या करीत काही तात्त्विक विचार तळमळीनं

सांगितले तर ते विचार-गंभीर व्याख्यानसुद्धा विद्यार्थी ऐकतात. त्यांच्या अभिरुचीला आकार देण्याचं काम मुख्यत: शिक्षकांचं, प्राध्यापकांचं असतं. सिनेमा नटनटीला आमंत्रित करायला हरकत नाही, पण त्यांना पाहाण्यासाठी नव्हे! त्यांच्या अनुभवातून आणि अध्ययनातून काही प्रेरणा मिळावी म्हणून. अशा स्नेहसंमेलनातून मी सेनाधिकाऱ्यांची, उत्तम खेळाडूंची, चित्रपट दिग्दर्शकांची, शेतीत नवनवीन प्रयोग करणाऱ्या कृषितज्ञांची आणि गायकांची व्याख्यानं ऐकली आहेत. प्रत्येकाच्या अनुभवाला विशिष्ट अर्थ असतो. तो समजून घेण्याची वृत्ती मात्र विद्यार्थ्यात असायला हवी. स्नेहसंमेलनातले कित्येक अनुभव श्रोता म्हणून आणि वक्ता म्हणून माझ्या गाठी आहेत. कधी कधी त्यांची आठवण मनात जागी होते. या आठवणी देखील आगळा आनंद देत राहातात.

●●●

# कलावंत आणि रसिक

गाण्याची मैफल रंगात आलेली. मधुर स्वरलहरींनी सारं वातावरण मुग्ध झालेलं. त्या तरुण गायिकेनं ती रात्र आपल्या स्वरांचं चांदणं ओतून अशी फुलवली की, ही रात्र अशीच चिरकाल संगीताच्या रसात भिजलेली असावी, ही रात्र संपू नये, स्वरांचा उन्माद ओसरू नये असं माझ्याप्रमाणंच सर्व रसिकांना वाटत होतं.

ती गायिका कंठानं गात नव्हती. ती जणू हृदयानं स्वरांची बरसात करीत होती. हृदय गात असेल तरच ओठावर सूर येतात. मनात रंग असतील तर कुंचलीतून त्यांच्या छटा उमटतात. ती गायिका स्वत:ला विसरली होती. त्यामुळंच संगीताचे कल्लोळ आम्ही अनुभवीत होतो. थोड्या वेळानं गाणं संपलं. सूर विसावले. तिच्या दृष्टीत तृप्ती होती. आनंद होता. मनासारख्या कलाविष्कार झाला, याबद्दल तिला समाधान वाटत होतं. हळूहळू त्या कलादालनातले रसिक काही सुंदर सूर आपल्याबरोबर घेऊन बाहेर पडले. तिच्या गायनानं मलाही एक सुखदु:खमिश्रित व्याकुळ आनंद दिला होता. कालिदासानं, 'रमणीय दृश्य पाहून आणि मधुर सूर ऐकून सुखी माणसाला सुद्धा एक प्रकारची हूरहूर लागून राहते' असं म्हटलं आहे. पर्युत्सुक मनोवृत्ती असे त्याचे शब्द आहेत. एक प्रकारची मानसिक अतृप्ती आणि समाधान, व्याकुळता यांचा अनुभव त्या गाण्यानं मला येत होता. फार दिवसांनी रित्या मनात हळुवारपणानं स्वरसुगंध निर्माण झाला होता.

त्या तंद्रीत चालतांना कुणीतरी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि म्हटलं, 'बरं झालं ! गाणं संपलं. फार वेळ कटकट चालू होती. चल, गरम गरम चहा मारू आणि पान - तंबाखूचा आस्वाद घेऊ.' क्षणार्धात मी गंधर्वलोकांतून या रुक्ष जमिनीवर - नव्हे खडकाळ जमिनीवर - त्याच्या शब्दांमुळं उतरलो. एका विलक्षण भावप्रवाहात घेऊन जाणारं ते गाणं या माणसाला कटकटीचं वाटावं याचा अर्थ काय ? हा ऐटबाज कपड्यातला माणूस पहिल्या रांगेत बसला होता. त्याचा भुसार मालाचा मोठा व्यापार होता. पण त्याला संगीताचा कान अजिबात नव्हता हे पाहून मलाच अपराध्यासारखं वाटलं.

चहाचे घोट घेताना त्यानं आपल्या अरसिक वृत्तीला शोभेल असा एक

अनपेक्षित शेरा मारला. 'गाण्याचं जाऊ द्या ! पण बाई दिसायला फारशी बरी नव्हती.'

मी मनातल्या मनात त्याला दोन चार शिव्या दिल्या. अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरासि मा लिख, असं भवभूतीनं त्रिवार का म्हटलं असावं हे आता तीव्रतेनं माझ्या लक्षात आलं. हा सधन व्यापारी इतका अरसिक असेल याची मला कल्पना नव्हती. त्या गायिकेनं दोन अडीच तास संगीताच्या एका आगळ्या, अद्‌भुत सृष्टीत आम्हाला फिरवून आणलं होतं. तिच्या आवाजातच एक प्रकारचा उदास कारुण्याचा भाव होता. त्यानंतर तिनं शृंगाराची आणि भक्तीची काही गीतं उत्कटतेनं म्हटली. रसिकांच्या अंत:करणांतल्या नाजुक भावनांच्या तारा तिनं सहजपणानं छेडल्या होत्या.

गीतातल्या भावनेशी समरस होऊन भावाविष्कार करतांना ती निश्चितच सुंदर दिसत होती. स्वरांची समाधी लावून बसलेल्या त्या तरुण तपस्विनीच्या मुद्रेकडं पाहताना मनात कोणतीही विपरीत विचारांची रेषा उमटणं शक्य नव्हतं. हा अरसिक मूर्ख मात्र 'बाई सुंदर नव्हती,' ही हास्यास्पद तक्रार करीत होता. खरं तर कोणताही कलावंत जेव्हा एकतानतेनं आपली कला सादर करीत असतो तेव्हा तो सुंदरच दिसतो. साठी उलटल्यानंतरही बालगंधर्व एखादं भजन गातांना, नाट्यगीत म्हणताना दर्शनीय वाटायचे. या कलातपस्व्यांना सौंदर्याचं जणू वरदान मिळालेलं असतं. माझा हा परिचित व्यापारी मात्र बाईच्या दिसण्याचा विचार विकारी वृतीनं करीत होता. हेच अज्ञान होतं. गायिकेचं गाणं अनुभवायचं असतं. हा मात्र तिच्या बाह्य शरीराचं चिंतन करीत होता.

कोणत्याही कलेचा आस्वाद संवेद्य वृत्तीनं घेता न येणं हा एक प्रकारचा दु:खकारक शाप आहे. काही वर्षापूर्वीची गोष्ट आठवते. खजुराहोतली सुंदर कोरीव लेणी पाहात होतो. जीवनातल्या अनेक रसांचं प्रभावी आणि प्रमत्त दर्शन घडवणाऱ्या त्या शिल्पकृती सूक्ष्मपणानं न्याहाळताना इतर कोणत्याही व्यावहारिक गोष्टींचं भान उरलेलं नव्हतं. आम्ही दोन-चार मित्र त्या शिल्पकृतीविषयी बोलत होतो. आमच्या बरोबर असलेले अर्थशास्त्राचे एक प्राध्यापक कंटाळले होते. ते म्हणाले -

'ही दगड चित्रं कुठं पळून जात नाहीत. ती थोड्या वेळानंही पाहाता येतील, न पाहिल्यानं तसं काही बिघडणार नाही. पूर्वीच्या कारागिरांना भरपूर वेळ होता. त्या रिकामटेकड्या लोकांनी देवळातल्या भिंतीवर ही चित्रं खोदण्यात वर्षे फुकट

घालवली. हे सगळं अनुप्रॉडक्टिव्ह लेबर आहे. ज्याला मार्केट व्हॅल्यू आहे असली चित्रं त्यांनी खोदली असती तर... पण या बेट्यांना अर्थशास्त्र कळत नव्हतं. पलीकडच्या हॉटेलात बटाटेवडे चांगले मिळतात असं मी ऐकलं आहे. तिकडं जाऊ.'

आता अर्थशास्त्राच्या या विद्वान प्राध्यापकाला काय म्हणावं ? अरसिक वृत्तीचा एक अभ्यसनीय नमुना होता. या स्वारीने ताजमहाल पाहिला असता तरी 'या बिल्डिंगचं कॉन्ट्रॅक्ट कुणाला दिलं होतं ?' आणि त्याला किती फायदा झाला हा प्रश्न विचारला असता. खरं तर या प्राध्यापकाचा अर्थशास्त्राचा एक व्यासंगी अभ्यासक म्हणून चांगला लौकिक होता. अर्थ आणि वाणिज्य या विषयांवर त्यांनी ग्रंथलेखनही केलं होतं. पण या ग्रंथलेखनाला रसिकतेची देणगी मात्र परमेश्वरानं दिली नव्हती. एखादं चांगलं नाटक पाहतानाही त्याला हुकमी झोप यायची. नृत्य, संगीताशी त्याचा उभा दावा होता. एखाद्या कवितेचे शब्द त्याच्या ओठावर आले असतील असं मला वाटत नाही. बहुधा ग्रांथिकी विद्वत्ता आणि रसिकत्व यांचे सूर जुळत नाहीत हेच खरे. काही सामान्य अपवाद असू शकतील. पण एखाद्याही ललितकलेचं आकर्षण नसणं ही मलातरी एक चमत्कारिक, असाध्य व्याधी वाटते.

रुक्ष मनोवृत्तीची ही गद्यप्राय माणसं हे आयुष्य कसं जगत असतील याचा मला प्रश्न पडतो. तशी ही माणसं सुखी समाधानी असतात. कोणाला आपलं बँक बॅलन्स वाढत चाललं याचं सुख होतं, तर कोणी आपण आखून घेतलेल्या वाटेवरुन ठरल्याप्रमाणं चालत जात आहोत या जाणीवेतच सुख मानतो. जीवनातल्या काही रसमय खोल सुखदु:खाची त्यांना कल्पनाही नसते. ढोबळ आनंद आणि ढोबळ दु:ख यांच्या कुंपणापलीकडे कितीतरी चित्रविचित्र नाना रसरंगांनी भरलेला प्रदेश आहे याचं भान त्या लोकांना कधीच येत नाही. एका सांकेतिक चौकटीतलं आयुष्य जगत राहिलेली ही मंडळी सुखी असली तरी त्यांची सुखं क्षुद्र असतात.

ललित कलांनी निर्माण केलेलं विश्व खरोखरच रमणीय असतं. त्या विश्वात गुरफटून गेलेल्या काही कलावंतांशी माझी मैत्री आहे. विविध प्रकृतीच्या भूमिका रंगभूमीवर सजवणारा एक मनस्वी अभिनेता मला एकदा म्हणाला -

'मी नट झालो हेच फार बरं झालं. नट होण्यासाठीच जणू माझा जन्म झाला असं मला वाटतं. एखादा ऑफिसर झालो असतो किंवा दुकानदार बनलो असतो तर आजच्यापेक्षा कितीतरी अधिक पैसा मला मिळाला असता, पण माझ्यातल्या

कलावंताचं समाधान झालं नसतं. आज मी भिन्न भिन्न प्रवृत्तीची माणसं - कोणी सुष्ट, कोणी दुष्ट, एखादा मदोन्मत सत्ताधीश तर कोणी अन्यायाखाली भरडला जाणारा सामान्य माणूस अशा वेगवेगळ्या भूमिका सूक्ष्मपणानं रंगवतो. हे करतांना मी निरनिराळ्या पातळ्यांवर जगून सुखदु:खं अनुभवतो. त्यामुळं माझं जग मर्यादित राहात नाही. सर्व प्रकारच्या रसवृत्तीशी समरस होऊ शकणाऱ्या माझ्या मनाला जे सुख मिळतं त्याचं वर्णन मी करू शकत नाही. ऑथेल्लो नाटकात मी काही वेळा आयोगाची भूमिका केली, काहीवेळा ऑथेल्लोचीही भूमिका रंगवली. आश्चर्याची गोष्ट अशी की, प्रेक्षकांनी या दोन्ही भूमिकांत मला स्वीकारलं. कारण मी दोन्ही प्रवृत्तींशी तद्रूप होऊ शकलो.'

त्या कलावंतानं आपल्या मनाचं अचूक विश्लेषण केलं होतं. काही चित्रकार एकाच पद्धतीनं चित्र रंगवतात.काही प्राध्यापक अध्यापन विषयातला काही विशिष्ट भागच वर्षानुवर्षे अगदी ठरलेल्या पद्धतीने म्हणजे यांत्रिकपणानं शिकवीत राहतात. त्यात बदल म्हणून कसला करीत नाहीत. एकाच छापाचे गणपती तयार करणारा कारागीर आणि हे अध्यापक यांच्यात कसला फरक असतो ? आपल्या रसिकतेला असल्या मर्यादा पडू नयेत याची दक्षता अभिजात कलावंत घेत असतो. अशा कलावंताचं जगणं मला तरी संपन्नतेचं वाटतं. एकाच चाकोरीतून चालत राहिलेला माणूस केव्हातरी कंटाळतो. नवी वाट शोधण्याचा तो प्रयत्न करतो. कलावंतांलाही नवनवीन वाटा चोखाळाव्या लागतात. नाहीतर त्याची कला क्षीण होऊ लागते. त्याला स्वत:लाही पुन्हा पुन्हा तीच अक्षरं गिरवण्याचा कंटाळा येतो.

एकदा एक कादंबरीकाराला मी विचारलं, 'तुमच्या दोन ऐतिहासिक कादंबऱ्या चांगल्याच गाजल्या. तुम्हाला तुमचा सूर सापडला होता. पण ही तिसरी कादंबरी मात्र आजच्या एका सामाजिक समस्येचं चित्र रेखाटणारी तुम्ही लिहिली ती मात्र फसली. काहीतरी ऐतिहासिक लिहिण्याच्या ऐवजी तुम्ही या भलत्या वाटेनं का आला ?'

तो लेखक हसून म्हणाला, 'वेगळ्या वाटेनं चालताना अपयश आलं तरी माझ्यासारख्या लेखकाला ते अधिक समृद्ध करतं. एखादा ठरलेला फॉर्म्युला घेऊन हमखास यशस्वी होणारा कलावंत हळूहळू स्थिर होऊ लागतो. तुणतुण्याचा एकच सूर आपल्याला आवडत नाही. सतारीच्या तारांतून निघणारी वेगवेगळी सुरावट आनंद देते. कोणत्याही लेखकानं आणि कलावंतानं ही कलात्मक जाणीव ठेवली

पाहिजे. पुनर्निर्मितीपेक्षा नवनिर्मिती करणारा कलावंत माझ्या मते श्रेष्ठ असतो.'

मी कॉलेजात असताना आमच्या वर्गातला एक विद्यार्थी वक्ता म्हणून लोकप्रिय झाला. पण त्याची चार-पाच भाषणं ऐकल्यावर मला तो वक्ता म्हणून मुळीच चांगला वाटला नाही. घोटून ठेवलेले तीन-चार विषय ठराविक घाटणीने, ठराविक शब्दातून तो मांडत राहायचा. कोणताही नवा विचार त्यात आढळायचा नाही. याचा अर्थ वक्ता म्हणून तो संपलेला होता. ठराविक पद्धतीचा चेंडू खेळता येणारा चांगला फलंदाज होऊ शकत नाही. म्हणूनच मी ऐतिहासिक कादंबरीहून वेगळी वाट शोधली.

त्या लेखकानं केलेलं हे स्वत:संबंधीचं विश्लेषण खरोखरच मर्मग्राही होतं. कलावंतांची कला नावीन्याचा शोध घेणारी असणं आवश्यक आहे. पन्नास कादंबऱ्या लिहिणाऱ्या एका लेखकावर टीका करताना एक समीक्षक म्हणाले होते, 'या लेखकानं एकच कांदबरी पन्नासवेळा लिहिली आहे.' अत्यंत मोजक्या शब्दांत मार्मिक टीका करता येणं ही देखील एक कलाच नव्हे काय ? आपली अभिरुची अगदीच प्राथमिक अवस्थेतली राहू नये याची दक्षता कलावंतानं आणि रसिकानं दोघानींही घेतली पाहिजे. वय वाढलं म्हणून संवेदनशील वृत्ती कोमेजून जाऊ नये.

खरं तर वयाचा आणि वृत्तीचा फारसा संबंध नसतो. मी अनेक अभिरुचीशून्य तरुण-तरुणी पाहिल्या आहेत. जगातल्या विविध तऱ्हेच्या सौंदर्यांना अंत:करणापासून दाद द्यावी ही उर्मीच अनेक तरुणांच्या हृदयांत आढळत नाही. मेघदूतासारखं काव्य कसं वाचावं, त्यातली विरहाची आणि शृंगाराची फुलत गेलेली भावना कशी काव्याच्या माध्यमातून अनुभवाची, त्यात प्रकट झालेल्या आकाशाशी, डोंगर पर्वताशी आणि नद्या निर्झरांशी कसा संवाद साधावा हे अनेक शास्त्री पंडितांनादेखील उमगत नाही. एक विप्रलंभ शृंगाराचं काव्य म्हणून ते 'मेघदूता'ची बोळवण करतात. निदान आम्हाला कॉलेजात ज्या प्राध्यापकानं 'मेघदूत' शिकवलं त्याला संस्कृत भाषा चांगली अवगत होती. पण त्याची अभिरुची मात्र सुसंस्कृत नव्हती. गावंढळ अभिरुचीच्या या विद्वानानं कालिदासाच्या रोमँटिक काव्याचा पार चोळामोळा करुन टाकला. प्रौढपणाबरोबर दृष्टिकोन आणि अभिरुची यांनाही एक सुंदर प्रगल्भपण आलं पाहिजे.

अभिजात कलावंतांप्रमाणं अभिजात रसिकही दुर्मिळच असतात. म्हणूनच शाहीर रामजोशी यांनी एकदा असे उद्‌गार काढले,

कवितातरस झडकरी मनात यावा पुण्याचा ठेवा।
दाता परि नीरस काय करावा जन मार्मिक व्हावा ।।

या उद्गारात त्या कलावंताच्या मनातलं खुपणारं एक शल्य व्यक्त झालं आहे. लोक पैसे टाकतात. शंभर रुपयांचं तिकीट घेऊन नृत्याला नाटकाला ऐटीनं जातात पण त्यांना नृत्यातल्या विलक्षण सौंदर्याच्या जागा समजत नाहीत. ते फक्त नर्तकीचा रंगीबेरंगी पोषाख पाहतात. तिच्या अंगोपांगापलीकडं त्यांना काही दिसत नाही. एका पोरकट अभिरुचीच्या प्रौढ प्रेक्षकानं नाटकाचं रसग्रहण करताना सांगितलं, 'नाटक तसं ठीक वाटलं. पण नायकानं अंगावर घातलेल्या सुटाची शिलाई मला विशेष आवडली.' हे 'मार्मिक रसग्रहण' ऐकून मी स्तंभितच झालो. कारण उत्कृष्ट कथावस्तू असलेलं ते एक वरच्या दर्जाचं वास्तववादी नाटक होतं.

रसडोळस वृत्तीनं विविध कलांचा हळुवार मनानं आस्वाद घेणारा रसिक हा देखील कलावंताच्याच जातीचा असतो. एखादा कवी समजून घेण्यासाठी आपल्यालाही वृत्तीनं कवी व्हावं लागतं. 'To judge of poets is a faculty of poets.' भक्तिकाव्यातलं भावसौंदर्य ग्रहण करताना भक्तीच्या दोन तीन पायऱ्या चढाव्या लागतात. मीरेची कविता केवळ बौद्धिकदृष्ट्या नीटशी समजत नाही. या कवितेतला प्रत्येक शब्द एका उत्कट वृत्तीच्या प्रेमविव्हल प्रेयसीच्या भूमिकेतून जाणून घेण्याचा शक्य तितका प्रयत्न केला तरच ती कविता हृदयाला भिडते. मीरा होऊनच मीरेची कविता वाचावी लागते. समरसता, तदात्मता हे कलावंताप्रमाणेच रसिकाचेही गुणधर्म असतात. ज्ञानेश्वरांनी रसास्वादाची प्रक्रिया फार रसिकतेनं वर्णिली आहे, ते म्हणतात,

जैसे शारदेचिये चंद्रकळे। माजि अमृतकण कोवळे।
ते वेचिती मने मव्वाळे। चकोरतलगे ।।
तियापरी श्रोतां। अनुभवावी हे कथा।
अति हळुवारपण चित्ता। आणुनिया ।।

कलावंताची कलानिर्मिती हळुवारपणातूनच होते. रसिकाची अनुभूती हळुवारपणाचीच परिणती असते. कलेचं विश्व हे सौंदर्याचं आणि नावीन्याचं प्रतीक असतं. कलावंत रसिकाच्या पदरात आनंदाचे, उत्साहाचे, सुखदुःखाचे - सारांश, जीवनाचे रसरशीत अर्थपूर्ण क्षण टाकतात आणि त्यामुळं आस्वाद घेणारा रसिक भावनिकदृष्ट्या नेहमीच तरुण राहतो. रसिकाच्या मनाचं तारुण्य तजेलदार राहतं.

'अजून यौवनात मी' ही प्रतीती कलानिर्मिती करणाऱ्या कलावंताप्रमाणंच रसास्वाद घेणाऱ्या रसिकालाही येत असते.

चित्र, शिल्प, संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य या साऱ्याच कलांनी माणसाच्या आयुष्याला सौंदर्याचा आधार दिला आहे. फलकावर चित्र रंगवीत असलेल्या एका चित्रकाराकडं मी निरखून पाहिलं तेव्हा तो निर्मितीच्या आनंदात बुडालेला होता. खरं तर त्याच्या आयुष्यात अनेक अटळ दु:ख होती. पत्नी असाध्य रोगानं अंथरुणावर पडून होती. एकुलता एक मुलगा मतिमंद होता. पण या क्षणी त्याच्या प्रतिभावान कुंचल्यातून तारुण्याचे आणि उत्साहाचे रंगतरंग उचंबळत होते तो म्हणाला, 'जोपर्यंत माझ्या हाती हा निर्मितीशील कुंचला आहे तोपर्यंत मला मरणाचंही भय वाटत नाही.'

हेच कलावंताचं बळ असतं. "Every artist dips his brush in his own soul" प्रत्येक कलावंत आपल्या आत्म्यात ब्रश बुडवून कलोपासना करीत असतो. ज्ञानेश्वर नावाच्या एका उपेक्षित कलावंतानं आपल्या आत्म्यात लेखणी बुडवली आणि आत्मरंगानं ज्ञानेश्वरी लिहिली ती वाचताना आज आम्हा रसिकांच्या मनाला तृप्ती देते. वैचारिक सामर्थ्य देते.

ते कलावंत धन्य आहेत, जे मृतवत् जीवनात संजीवनी ओतू शकतात शुष्कतेला रसमय बनवतात आणि ते रसिक धन्य आहेत, जे कलाकृतीचा आपल्या अंत:करणानं आस्वाद घेऊ शकतात. कलावंत आणि रसिक दोघेही परस्परावर निर्भर आहेत. कवी नसेल तर रसिकाचा शोध लागणार नाही. रसिक नसेल तर कवीही जन्माला येणार नाही.

●●●

# सत्ता, मदिरा आणि प्रीती

एकदा गप्पाच्या ओघात कुणीतरी एक प्रश्न उपस्थित केला 'जगातली सर्वात अधिक मादक वस्तू कोणती ?' असे काहीतरी चित्रविचित्र प्रश्न निर्माण करायचे आणि त्यावर स्वैरपणानं आपापली मतं मांडायची, अशी आमच्या गप्पीदास मंडळाची अलिखित घटना होती. 'सध्या चित्रपट सृष्टीतली सर्वात सुंदर नटी कोण' हा प्रश्नही एकदा सौंदर्याकडं निरभिलाष दृष्टीनं पाहण्याच्या वयात आम्ही असल्यामुळं या प्रश्नाची चर्चा पूर्णपणे 'ॲकॅडेमिक' पातळीवर झाली. आता असल्या प्रश्नांवर चर्चा, परिसंवाद करणं हा एक निरर्थक उद्योग आहे असं कुणाला वाटेल. पण बाह्यत: विचित्र किंवा अर्थशून्य वाटणाऱ्या विषयांमागे सुद्धा एक वैचारिक सूत्र असते. काही गमतीदार विषय विनोदाला चालना देतात. कोट्या - प्रतिकोट्यांचा मग पाऊस पडतो. मनाला आलेली मरगळ नाहीशी होते. अलीकडे आयुष्याच्या रुक्ष धावपळीत पुष्कळजण हसणं विसरून गलेले आहेत. एखाद्या विद्वानासारखी फाजील गंभीर मुद्रा धारण करून बसण्यापेक्षा खेळकरपणानं लहानसहान गोष्टींचा परामर्श घेण्यात एक प्रकारचा आगळा आनंद आहे.

जगातली सर्वाधिक धुंद करणारी अगदी स्वत:ला सुद्धा विसरायला लावणारी कोणती वस्तू असू शकेल ? या विषयावर आमचा परिसंवाद सुरू झाला. एकजण म्हणाला, 'या जगात मद्यापेक्षा अधिक मादक काय आहे ?' धुंद वातावरणात, मंद संगीताच्या सुरात, चषकातली मदिरा ओठाला लावणं आणि तिच्या स्पर्शानं रसपानानं स्वत:ला आणि जगाला विसरणं हा सर्वात मोठा आनंद आहे. अशा मद्याची मादकता गालिब किंवा उमरखय्यामसारखा एखादा कवीच वर्णन करू शकेल. मला ते वर्णन जमू शकणार नाही. अहो, उमरखय्यामनं उगीच म्हटलं नाही 'सखीच्या संगतीत सुरापान करणं हे स्वर्गीय सुख आहे. सुरेची सुरई, कवितेची वही, थोडीशी भाकरी आणि प्रेयसीची सोबत या चार गोष्टींना महत्त्व देतांना पहिला क्रमांक मदिरेला दिला आहे हे विसरू नका. थोड्याशा ओझरत्या सहवासातही मद्य माणसाला कवेत घेऊ शकतं. मेंदूपर्यंत पोहोचलं की सगळे भेद संपून जातात. स्वत:चं आणि दुसऱ्याचं हा फरकसुद्धा माणसाला कळत नाही. याच मदिरेनं

श्रीकृष्णाचे यादव वीर रसातळाला गेले. याच मद्याच्या कैफात शुक्राचार्यांनी आपली संजीवनी विद्या शत्रूला देऊन टाकली. ही पौराणिक उदाहरणं कदाचित कुणाला पटणार नाहीत. पण आधुनिक काळात लहानमोठ्या क्लब्समधून रंगणाऱ्या पार्ट्या पाहाव्यात. भल्या-भल्यांचा तोल सुटतो. मैफल रंगायला लागते. एकदा एका समारंभात एक माजी संस्थानिक नर्तकीबरोबर नाचायला लागले. त्यांचा त्या अवस्थेतला फोटो कुणीतरी काढला आणि सरदार वल्लभभाई पटेलांच्याकडे पाठवून दिला अशी एक जुनी आख्यायिका आहे. सरदारांनी जाब मागितल्याबरोबर हे माजी संस्थानाधिपती गडबडून गेले. दिल्लीला जाऊन त्यांनी सरदारांच्या पायावर मस्तक टेकवलं असं म्हणतात. खरं खोटं देव जाणे. म्हणून म्हणतो माझ्या मते, मदिरेसारखी उन्मादक शक्ती दुसरी कोणतीही नाही.'

या मद्यवादी सज्जनाच्या प्रतिपादनात काही अंशी निश्चितच तथ्य आहे. सम्राट असो की भणंग असो, पंडित असो की अडाणी असो. मदिरेच्या प्याल्यात बुडून जातात. ज्ञान, संपत्ती, व्यावसायिक दर्जा या साऱ्या गोष्टी अशावेळी गौण ठरतात. मदिरा त्यांना अंतराळात घेऊन जाते. जमिनीवरचे सामान्य माणसांचे संकेत या 'गगनविहारी' माणसाला मग बंधनकारक कसे ठरतील ? प्रत्येक प्याला आणि प्याल्यातला प्रत्येक घोट त्याला नवनवीन प्रदेशात घेऊन जातो गडकऱ्यांनी म्हटलं आहे, 'दारू प्याल्यावर भिकारीसुद्धा स्वत:ला राजा समजतो. राज्य असणं किंवा नसण हो सारा समजुतीचाच भाग आहे.' दोन घोट पोटात गेल्यावर कल्पनेतल्या स्वर्गात इंद्राचं सिंहासन मिळत असेल तर मद्याच्या उन्मादकतेबद्दल शंका घेण्याचं कारणच नाही.

पण आमच्या मंडळातल्या दुसऱ्या एका सदस्यानं या विचारसरणीवर नशापाणी न करता पूर्ण सावधपणे प्रखर हल्ला चढविला. त्याच्या म्हणण्याचा आशय असा होता की, मदिरेचं माहात्म्यसुद्धा फिकं पडू शकेल असं मादक सामर्थ्य फक्त प्रेमात आहे. प्रेमासारखी साऱ्या दुनियेला बेहोष करणारी दुसरी कोणतीच गोष्ट नाही. एक प्रेमभावना वगळली तर जगात जगण्यासारखं काय उरणार आहे ? कशासाठी जगायचं ? हा प्रश्न रामायणातल्या राम-सीतेला विचारा. राम म्हणाला होता, सीतेशिवाय या आयुष्यात काही अर्थ नाही. माझ्या जीवनापेक्षाही मला सीता अधिक मोलाची वाटते. ती आहे म्हणून तर हे जीवित रमणीय वाटतं. श्रीकृष्णाच्या नावाशी राधेचं नाव कायमचं जोडलं गेलं आहे. पण प्रेम या संज्ञेचा -

भावनेचा मर्यादित अर्थ मला अभिप्रेत नाही. स्त्री-पुरुषांत उत्पन्न होणारं प्रेम सुंदर असतं यात मुळीच संशय नाही. शृंगार आणि प्रेम या भावना सृष्टीच्या उत्पत्तीला आणि जीवनाच्या सातत्याला कारण होतात. याच प्रीतीला भक्तीचा रंग चढला की आनंदाची पराकाष्ठा होते. मदिरेची बेहोषी थोड्याच वेळात ओसरते. पण प्रेमाच्या धुंदीला ओहोटी माहीत नसते. मीरा प्रेमदिवानी होती. तिच्या हातातल्या चिपळ्यांतून कृष्णप्रेमाचे अदम्य उत्कट सूर बाहेर पडत होते. सारा आसमंत, सारा मेवाड प्रांत त्या सुरांनी भारून गेला होता. प्रेम आणि भक्ती यांच्या हिंदोळ्यावर साऱ्या सृष्टीचं जीवन झोके घेत असतं. ज्याला सर्व सर्व मिळालं पण प्रेमाचा स्पर्श लाभला नाही त्याचं सारं वैभव माझ्या दृष्टीनं तुच्छ आहे. कुणीतरी लक्ष्मीपुत्र एकदा मला म्हणाला होता आयुष्यातली सारी वैभवं माझ्या पायाशी लोळण घेतात. पण अंत:करणातल्या खऱ्या प्रेमाचा एक बिंदूही माझ्या वाट्याला आलेला नाही. याबाबतीत मात्र मी पुरता कंगाल आहे.'

प्रेमाची सुद्धा अनेक रूपं असतात. डॉ. आंबेडकरांनी शतकानुशतकं धुळीत पडलेला, अंधारानं माखलेला आणि अज्ञानानं वेढलेला 'बहिष्कृत भारत' जागा केला. त्याला विचारांचे पंख दिले त्याला नव्या जीवनाच्या मोकळ्या वातावरणात भरारी घ्यायला लावली. समाजप्रेमाचं हे एक उदात्त उदाहरण आहे. काही माणसं स्वत:च्या प्रेमात पडलेली असतात त्यापेक्षा सभोवतालच्या समाजावर आपल्या प्रेमदृष्टीनं सिंचन करुन तो समाज स्वत:त सामावून घेणं हा देखील विलक्षण आनंदाचा, चांगल्या बेहोषीचा एक प्रकार आहे, असं मला वाटतं एका कवीनं म्हटलं आहे, 'भीतीने मरतील मानव कुळे, प्रीती निमाली तर 'प्रेम हा साऱ्या जीवनसृष्टीचा प्राणबिंदू आहे. फुलात ज्याप्रमाणं सुगंध, ज्योतीत जसा प्रकाश, सूर्यात जसं ओज, अन्नात ज्याप्रमाणं सत्व त्याप्रमाणं जीवनात प्रेमतत्त्व असतं म्हणून सर्व उन्मादात प्रेमाचा उन्माद मी अधिक महत्त्वाचा मानतो. जीवनाचा आदि आणि मध्य व अंत्यबिंदू केवळ प्रेम हाच आहे.'

प्रेमाचं हे समर्थन फारच प्रभावी भाषेत त्यानं केलं. मदिरेचं माहात्म्य गाणाऱ्या मित्राचं भाषण ऐकताना त्याचे मुद्दे मला बिनतोड वाटत होते आता प्रेमाची स्तुतिस्त्रोत्रं गाणाऱ्या प्रतिपादनातले विचार मला पूर्णपणे पटत होते. चांगली भाषणं ऐकताना प्रत्येक वक्त्याचं प्रतिपादन हेच सर्वोत्तम आहे असं अनेक वेळा वाटतं. मदिरा आणि प्रेम यांचा विचार झाल्यानंतर आणखी एकानं आपला विचार आवेशानं

मांडायला सुरुवात केली. त्यानं म्हटलं.

'तुमच्या या मतांत फारसा अर्थ नाही. मी तुम्हाला साधा प्रश्न विचारतो, दारूची धुंदी किती वेळ टिकते ? मधुपान केल्यामुळं मनुष्य अंतराळात जातो असं तुम्ही म्हणता. क्षणभर वादासाठी हे मी गृहीत धरतो. पण थोड्याच वेळात अंतराळात गेलेलं विमान दुप्पट वेगानं खाली जमिनीवर कोसळतं त्याच काय ? जो लवकरच ओसरून जातो त्याला उन्माद म्हणता येईल काय ? प्रेमाच्या धुंदीबद्दलही आता काही उत्तम विचार व्यक्त झाले. स्त्री-पुरुषांतलं प्रेम किती दिवस टिकतं ? प्रणयाराधनेच्या काळात दोघेही एकमेकांना काव्यमय शब्दात थापा मारीत असतात. 'हे चंद्र, सूर्य आणि तारे जेव्हा नसतील तेव्हासुद्धा आपलं प्रेम दरवळत असेल. तू आणि मी प्रेमरूपी चैतन्यानं एकात्म झालो आहोत. शरीरं दोन असली तरी आत्मा मात्र एकच आहे.' या भाषेला वास्तवाचं काहीतरी अधिष्ठान आहे का ? प्रेमात पडलेली माणसं दारू प्यालेल्या माणसाप्रमाण असंबद्ध बडबडत असतात. त्यातलाच हा प्रकार आहे. प्रेमाच्या धुंदीत विवाह करणारी जोडपी पुढं घटस्फोट मिळविण्यासाठी कोर्टात भेटू लागतात. त्यांचं सुरुवातीचं 'कोर्टींग' वेगळे आणि नंतरच 'कोर्टींग' वेगळं असतं. राम आणि सीता, कृष्ण आणि राधा ही दैवी प्रेमाची अपवादात्मक उदाहरणं झाली. सगळेच राम-सीता झाले असते तर जगाचं रामायण अधिक सुंदर झालं असतं. डॉ. आंबेडकरांचं उदाहरण एका श्रेष्ठ ध्येयवादाचं आहे. महान ध्येयवादी आपल्या उद्दिष्टांवर आमरण प्रेम करतात आणि ते प्रेम हेच त्यांचं सर्वस्व असतं हे मी मान्य करतो. पण शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, फुले आणि आगरकर, डॉ. आंबेडकर यांच्यासारखी विचारभावनांच्या अत्यंत व उच्च पातळीवर जगणारी माणसं किती आहेत ? समाजप्रेम, देशप्रेम, धर्मप्रेम यांनी भारून गेलेले आणि त्यासाठी आयुष्याची बाजी लावणारे धीरवीर फार थोडे असतात. म्हणूनच ही अपवादात्मक उदाहरणं मी सोडून देतो.'

प्रेमाची धुंदी आणि मद्याची धुंदी या दोन्ही विशेष उन्मादक समजल्या जाणाऱ्या गोष्टी अशारीतीनं त्यांन निकालात काढल्या. एखाद्या कसलेल्या वकीलाप्रमाणं प्रथम त्यानं प्रस्थापित विचार खोडून काढले आणि नंतर तो म्हणाला,

'सर्व प्रकारच्या नशेपेक्षा सत्तेची नशा रक्तात सळसळत होती म्हणून दुर्योधन उन्मत्तपणानं म्हणाला होता, 'सुईच्या अग्रावर राहील इतकीही जमीन आम्ही पांडवांना देणं शक्य नाही.' आंधळ्या धृतराष्ट्राला सत्तेचा मोह होता. त्यामुळं तो

अन्यायाचं राजरोसपणानं समर्थन करीत सत्तेलाच चिकटून बसला होता. धृतराष्ट्र व्यासांच्या महाभारतातच सापडतात असं नाही जगातही त्यांचे वंशज सिंहासनावर ठाण मांडून बसले आहेत. सत्तेचा कैफ त्यांच्या मस्तकात भरून उरला आहे. या मस्तीतच सत्याला आणि न्यायाला पायदळी तुडवून असत्याची ध्वजा ते बेबंदपणानं नाचवीत आहेत. माझ्यामते सत्तेच्या अंगोपांगात उन्मादकतेचं एवढं जालीम रसायन भरलं आहे की मदिरा आणि प्रेम या दोन्ही गोष्टी त्यापुढं अगदीच नगण्य आहेत. सत्तेचं आसन मिळालं किंवा येनकेनप्रकारेण मिळवलं की मग साऱ्या जगताला मार्गदर्शन करण्याचं 'परमीट' त्याला आपोआपच मिळून जातं. खरं तर ज्ञानवंतांनी, साधुसंतांनी मार्गदर्शन करायचं असतं पण सत्ताधाऱ्याचं 'दर्शन' हाच एकमेव 'मार्ग' असं आजकाल मानलं जातं. सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या व्ही.आय.पी. माणसांच्या रटाळ शब्दांना सुद्धा रसाळ मानून कौतुकानं टाळ्या वाजवल्या जातात. एकदा एक मंत्रीणबाई साहित्यिकांच्या सभेत मार्गदर्शन करण्यासाठी आल्या. एस.एस.सी. च्या परीक्षेला चारवेळा बसून त्या हप्त्याहप्त्यानं उत्तीर्ण झाल्या होत्या. उभ्या आयुष्यात त्यांनी एखाद्या पुस्तकाचं मन:पूर्वक वाचन केलं होतं की काय याबद्दल जबरदस्त शंका वाटावी अशीच त्यांची मानसिक प्रकृती होती. साहित्यिकांच्या मेळाव्यात ठरलेल्या वेळेपेक्षा त्या फक्त दीड तास उशीराने आल्या. विलंबाबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याइतकं साधं सौजन्यही त्यांच्यापाशी नव्हतं. त्या विजयी मुद्रेनं प्रवेश करत्या झाल्या (त्यांनी दीप प्रज्वलन केलं म्हणजे दिवा लावला) आपल्या भाषणात त्यांनी समस्त लेखक जातीला उद्देशून एक अभिनव, मौलिक आणि महत्त्वपूर्ण संदेश दिला. तो तर सुवर्णाक्षरांनी कोरुन ठेवावा अशा योग्यतेचा होत्या. त्या म्हणाल्या -

'लेखकांनी लिहावे. लिहीत चला. लिहिल्यामुळं अक्षर सुधारतं. मी लहानपणी शाळेत असतांना कित्ते गिरवले आहेत. म्हणून माझं अक्षर सुधारलं. तसंच तुम्हीही दररोज लिहीत जावं. लिहिणं हे लेखकाचं काम आहे.' या बाईंनी दिलेला तो चिरंतन महत्त्वाचा संदेश ऐकल्यानंतर सर्व साहित्यिकांच्या कोणत्या मानसिक प्रतिक्रिया झाल्या असतील ते सांगण्यात अर्थ नाही. 'लिहिणं हे लेखकाचं काम आहे' हे विधान 'समुद्रात पाणी असतं' किंवा 'स्वयंपाक घरात स्वयंपाक करतात' असल्या विधानाइतकचं सत्य आहे. मंत्रीणबाईचं विधान अगदीच बालिश आणि हास्यास्पद होतं. पण बाईची खुर्ची मोठी होती. त्यांनी हे वाक्य उच्चारल्यानंतर

श्रोतृसमुदायाकडे अपेक्षेनं पाहिलं. त्यांचा पी.ए. हुशार होता. त्याने टाळी वाजवली. पी.ए. चे अनुकरण इतर सरकारी अधिकाऱ्यांनी केले आणि मग नंतर साऱ्याच सभेने निरुपायाने टाळ्या वाजवल्या. सांगण्याचा इत्यर्थ असा की, सत्ताधाऱ्यांच्या क्षुद्र शब्दांतही ताकद असते. पाच-दहा मिनिटे साहित्यिकांना आपलं भाषण ऐकवून मंत्रीणबाई सरकारी गाडीत बसून हुजऱ्यांचे मुजरे घेत निघून गेल्या. काही झाले तरी 'सत्ता' हीच सर्वात अधिक मादक शक्ती असते.

ज्यांची सत्ता निघून जाते व रात्रंदिवस तिच्या रोमांचक आठवणींची जपमाळ ओढीत बसतात. सत्तेचा प्याला एकदा ओठाला लागला की, येणारा उन्माद बहुधा ओसरत नाही. अलेक्झांडरची तर अशी गोष्ट सांगतात की, 'दरबारात येणाऱ्या प्रत्येक माणसानं त्याच्यासमोर गुडघे टेकून त्याच्या झग्याचं चुंबन घेतलं पाहिजे. असा दंडक होता. आपल्याकडे सुद्धा सत्तामदानं झिंगलेल्या लोकांच्या अनेक सत्यकथा, दंतकथा प्रसिद्ध आहेत.'

सत्ता, मदिरा आणि प्रीती, या विषयांवरचे साधकबाधक विचार ऐकून माझ्या मनात अनेक वर्तुळे उठली. जीवनाचा मोह दुर्दम्य असतो. माणसं दुःखात सुद्धा जगत राहतात. पण कित्येक सुंदर, आकर्षक, उन्मादक गोष्टींनी जीवनाला मोहक रुप दिलं आहे. कोट्यवधी माणसांना सत्ता मिळत नाही किंवा तिचा ते पाठलागही करीत नाहीत. सत्तेच्या आसनाशिवाय मनुष्य सुखानं, आनंदानं जगू शकतो. सत्ता आणि मदिरा यांचं सौंदर्य गणिकेप्रमाणं भुरळ पाडणारं असलं तरी त्यांचा स्पर्श मनुष्याला अध:पतनाकडं नेऊ शकतो. सत्तेवर राहून सुद्धा सत्तेपासून अलिप्त राहिलेली काही माणसं इतिहासानं पाहिली आहेत. त्यांच्या राज्याला रामराज्य असं म्हणता येईल. जेव्हा सत्तेच्या मुळाशी प्रजेसंबंधी आत्मीयता असते तेव्हाच सत्ता स्वच्छ राहते. अन्यथा तिचा मद चढायला उशीर लागत नाही. प्रीतीभावनेचं सौंदर्य मात्र कुलवतीच्या सात्विक सुंदरतेसारखं असतं. वारुणीचा प्याला आणि सत्तेचं सिंहासन यापेक्षा प्रीतीचं सुगंधी पुष्प आयुष्याला सुवासिक बनवू शकतं. प्रेमातूनच जीवन मोहरुन जातं. मनाचा, बुद्धीचा आणि आत्म्याचा विकास या सुगम भावनेतून होतो. या प्रेमाचेच मग अनेक पैलू करुणा, शांती, उदारता असे सांगता येतील. एका कवीनं म्हटलं आहे, 'राज्याच्या आज्ञेपेक्षा माझ्या प्रिय व्यक्तीची इच्छा मला अधिक प्रमाण आहे. राजदंडानं मिळणारा अधिकार घेण्यापेक्षा प्रेमाच्या राज्यात कुणाचा तरी आज्ञांकित होण्यात मला अधिक धन्यता वाटते.'

द्वारकेच्या सिंहासनावर असलेला श्रीकृष्ण सुदाम्याच्या पोह्यासाठी उतावीळ झाला आणि रामानंही शबरीनं उष्टावलेली बोरं आनंदानं स्वीकारली. या घटना मला अत्यंत रोमांचित करतात. ही प्रेमभावना, ही आत्मीयता जगात सर्वत्र पसरली तर जगाचं रूप केवढं विलक्षण आनंदकारक होईल ?

●●●

# गांधींजी, परत येऊ नका !

प्रिय बापूजी,

आज दोन ऑक्टोबर. तुमचा वाढदिवस. भारतात हा तुमचा जन्मदिन उत्साहाने साजरा होतो. उत्साहाने म्हणजे नेमके काय हे मात्र सांगता येणार नाही. हा एक सांकेतिक वाक्प्रचार आहे. गांधी जयंतीला सार्वजनिक सुट्टी दिली जाते. आमजनता त्यामुळे खूष असते. कसलेही काम न करता आळसात आणि चैनीत घालवण्याचा हा शुभदिवस आहे. महापुरुषांचे वाढदिवस यासाठीच लोकांना आनंददायक वाटतात. तुमच्या जयंतीच्या निमित्ताने आकाशवाणी आणि दूरदर्शनवरून कुणीतरी तुम्ही केलेल्या महान कार्याची साचेबंद पद्धतीने माहिती करुन देईल. दिल्लीला राजघाटावर तुमच्या समाधीला फुले वाहण्यात येतील. गावोगावं उभ्या असलेल्या तुमच्या पुतळ्यांना हार घातले जातील. अशावेळी 'वैष्णव जन तो तेणे कहिये' हे तुमचे आवडते भजन कुणीतर गाऊन दाखवील. सकाळचा गांधी जयंतीचा हा अत्यंत उत्साही कार्यक्रम आटोपला म्हणजे दुपारच्या वेळी मॅटिनीला जायला लोक गर्दी करतील. कोणी निवांतपणे झोप घेईल. अशारीतीने पुढील गांधी जयंतीपर्यंत जनता मोकळी होईल. पुढच्यावर्षी पुन्हा हे सगळे सोपस्कार उत्साहाने करण्यात येतील. गेली अनेक वर्षे हेच चालले आहे. तुम्ही महात्मे मंडळी गेल्यानंतर सुद्धा आम्हाला दरवर्षासाठी जयंती पुण्यतिथीचा एक चांगला कार्यक्रम देत असता याबद्दल आम्ही तुमचे मन:पूर्वक आभारी आहोत. गेल्याच वर्षी, एका महनीय पुढाऱ्याचे तुमच्या जयंतीनिमित्त व्याख्यान आयोजित केले होते. सदर महाशय सत्तेवर असल्यामुळे त्यांचे दर्शन घेण्यासाठी (मार्गदर्शन नव्हे) हजारो लोकांनी गर्दी केली होती. सकाळची भरपेट न्याहारी आटपून पुढारी महोदय आपल्या एअर कंडिशंण्ड गाडीत बसून सभास्थानी आले. खरे तर सभेचे ठिकाण ते राहिले होते त्या सर्किट हाऊसपासून एका हाकेच्या अंतरावर होते. पण एवढे अंतर पायी चालत जाण्यामुळे आमच्या स्वातंत्र भारतात त्यांच्या सत्तेची अप्रतिष्ठा झाली असती. ती होऊ नये व भारताची शान राहावी म्हणूनच केवळ निरुपायाने ते आपल्या इम्पोर्टेड गाडीतून सभास्थानी आले होते. काही वेडे लोक त्यावेळेला कुजबुजले, 'गांधीजी

अशावेळी आलीशान गाडीतून आले असते काय ? ते तर नेहमी थर्डक्लासने प्रवास करीत.' मी नुसता हसलो. तुम्हीच सांगा बापूजी, या वेड्या टीकाकारांना काय बरे कळणार ? तुम्ही थर्ड क्लासने प्रवास केला असेल. पण आमचे आजचे फर्स्ट क्लास पुढारी परदेशातून मुद्दाम आयात केलेल्या गाडीतून हिंडत राहिले तर त्यामुळे त्यांना लोकसंपर्क साधणे सोयीचे होते. काही अतिशहाणे लोक केवळ मत्सराने आजच्या पुढाऱ्यांवर टीका टीप्पणी करतात ती मुळीच सयुक्तिक नाही. पुढारी महोदय गाडीतून उतरताच त्यांच्या गळ्यात हार घालण्यासाठी इच्छुकांची एकच गर्दी उसळली. तुमच्या पुतळ्याला घातलेला हार आकाराने आणि वजनाने लहान होता. पण पुढाऱ्याला मिळालेले हार त्यांच्या दुप्पट वजनाचे होते. जाऊ द्या! आकार, वजन, किंमत असले किरकोळ हिशेब करायचे नसतात. तुम्हाला हार घालून आज कोणाला काय मिळणार आहे ? पण पुढाऱ्याला हार घातल्यावर उद्या एखादे 'तिकीट' तरी मिळेल. तिकीट नाही तर निदान 'परमिट' मिळेल. हार घातल्यावर पुढारी 'कमिट' होतो. गांधी जयंतीच्या दिवशी गांधींच्या जयजयकारापेक्षा त्या पुढाऱ्याचाच जयघोष उत्साहाने त्या सभेत केला जात होता. टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात पुढारी महोदय मार्गदर्शनाचे मौलिक शब्द उच्चारण्यासाठी माइकसमोर उभे राहिले. अनेक कॅमेऱ्यांनी त्यांचे फटाफट फोटो काढले. दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात बापूजी, त्या महान पुढाऱ्याच्या फोटोमागे तुमचा अस्पष्ट पुतळा दीनपणाने उभा असल्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली. तुम्ही काही म्हना बापुजी, तुम्ही आता इतिहासजमा झाला आहात. त्या पुढाऱ्यांनी आपल्या महान स्फूर्तिदायक भाषणात त्या दिवशी सांगितले.

'प्रिय बंधू भगिनींनो ! आपण सर्वजण आपल्या प्रिय बापुजींच्या मार्गाने जाऊ या. खरा मार्ग तोच आहे. लक्षात ठेवा बापुजींनी आपल्याला शांतीचा आणि क्रांतीचा संदेश दिला आहे. आज गांधीजींच्या पुण्यतिथी निमित्त (जयंती आणि पुण्यतिथी यातले अंतर त्या नेत्यांना माहित नव्हते. पण ही किरकोळ गोष्ट आहे. असल्या गोष्टीवरुन उगीच कुत्सित टीका करण्यात काय अर्थ आहे बरे ? जयंतीच्या ऐवजी पुण्यतिथी म्हटले म्हणून काही आकाश कोसळत नाही. भाषा ही समजून घेण्यासाठी असते.) आपण सर्व मिळून प्रतिज्ञा करू या की आम्ही सत्य आणि अहिंसा यांची जन्मभर पूजा करु. अरे, तळागाळातला माणूस जागा झाला पाहिजे. त्यांच्यासाठीच तर आपले सारे प्रयत्न, चाललेले आहेत. या देशाचे दारिद्र्य

हटवण्याची शपथ आज आपण घेतली पाहिजे. माझ्या शेजारी बसलेला एक दुष्ट वृत्तीचा मनुष्य माझ्या कानांत कुजबुजला. यांचे लाखो डॉलर्स परदेशी बँकेत जमा आहेत. थोरला मुलगा बडा कारखानदार आहे. धाकटा मुलगा अमेरिकेतल्या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी गेली दहाबारा वर्षे तिथेच मुक्काम करून आहे. आता ही माहिती त्यावेळी मला देण्याचे काय कारण ? हे कुत्सित लोक उगीचच एखाद्याचे चारित्र्यहनन करतात. आता पुढारी महाशयाबरोबर कोनी एक 'मॉडर्न' तरुणी व्यासपीठावर बसली होती. ती मधून मधून मंत्री महाशयांच्या कानाशी लागत होती. मंत्री रसिक असल्यामुळे म्हणा किंवा त्यांच्या स्त्री दाक्षिण्याच्या कल्पना तुमच्या आमच्यापेक्षा अधिक सुसंस्कृत असल्यामुळं म्हणा तेही तिच्या कानाजवळ आपलं तोडं नेऊन काही हितगुज करायचे. एखाद्या राजकीय समस्येवर त्यांना तिचा सल्ला विचारायचा असेल इतकीच ही साधी गोष्ट. पण काही असंस्कृत लोकांनी यावर देखील टीका टीप्पणी केली. आपले भाषण संपवून पुढारी महाराज आपल्या गाडीत जाऊन बसले. त्यांना बिलगूनच ती तरुणीही बसली होती. कदाचित पुढारी महोदयांना तिच्याशी ताबडतोब महत्त्वाची चर्चा करणं आवश्यक वाटलं असेल. ज्या मार्गाने त्यांची गाडी गेली त्याला नगरपालिकेने आधीच 'गांधी मार्ग' असे नाव दिले होते. त्यामुळे पुढारी गांधी मार्गानेच गेले. ते बोलल्याप्रमाणे वागले याचा मला फार आनंद वाटला. देहू या ग्रामीण भागात राहाणाऱ्या तुकाराम नावाच्या एका कवीने पूर्वीच म्हणून ठेवले आहे, 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' आज हा कवी असता तर या पुढाऱ्यांना पाहून आपल्या ग्रामीण भाषेतून त्याने 'तुका म्हणे ऐशा नरा मोजूनि माराव्या पैजारा' असेच म्हटले असते.

आज तुम्ही जिवंत नाही ही तुमच्या दृष्टीने अत्यंत सुदैवाची घटना आहे. आजचे जग झपाट्याने प्रगती करीत आहे. या वेगाशी जमवून घेणे तुमच्यासारख्या साधुपुरुषाला कधीच जमले नसते. तुमच्या नावाचे भांडवल करून निवडणुका जिंकणारे आणि सत्तेच्या सिंहासनावर जाऊन बसलेले ग्रामसिंह कोणत्या लीला करीत आहे हे तुम्हाला कळत नाही तोपर्यंत परलोकात तुम्ही सुखात आहात. रामाचे नाव असलेले इथले तुमचे अनुयायी मंत्रीपदावर आले की, सत्तेची नशा त्यांना पुरत नाही. म्हणून परदेशी दारुच्या प्याल्यात ते डुंबत असतात. विमानप्रवास करतांना हवाई सुंदरी बरोबर लगट करतात. साहजिकच आहे ! उंच आकाशात, उच्च पातळीवर गेल्यावर प्रेमाचे हे उन्नत आविष्कार, त्यांनी केले तर बिघडले कुठे?

सध्या तर सारेच 'सुखराम' झाले आहेत. रामाला कधी आपल्या मंचकावर प्रजेच्या काळजीने सुखाची झोप आली नसेल पण आजचे 'सुखराम' कोट्यावधी रुपयांच्या नोटांच्या शय्येवर लोळत असतात. जनतेच्या किंकाळ्या ऐकूनही त्यांची कधी झोपमोड होत नाही. राजकारणात जुन्या-पुराण्या नीतीतत्त्वांचे तुणतुणे तुम्ही एकसारखे वाजवीत होता याचा अर्थ तुम्हाला खरं राजकारण कधी कळलेच नाही. अहिंसा, संयम, त्याग, देशभक्ती, असल्या जुनाट कल्पना पुन्हा पुन्हा मांडतांना तुम्हाला कंटाळा आला नाही. पण आजच्या सुधारलेल्या प्रगत भारतात तुमच्या ह्या कल्पनांचा आम्ही पार खुर्दा उडवून टाकला. आयुष्याचा अर्थ काय ? मस्तीत जगावं. मस्तवालपणानं जगावं. आपल्या लोकांना लुटत राहावं आणि प्रचंड पैसा मिळवून परदेशात जाऊन निवांतपणानं राहावं. हा अर्थ तुम्हाला कळणं अशक्य होतं. तुम्ही नाहीतरी दरिद्री नारायणच ! सूत कातीत बसलात ! नागड्या उघड्या देशाला सत्य, अहिंसा, सत्याग्रह असल्या निरुपयोगी विचारांची वस्त्रे नेसवीत राहिलात. विलायतेत शिक्षण घेण्यासाठी जाऊनही तुम्हाला 'मॉडर्न होता आलं नाही. आजचे आमचे पुढारी आठवड्यातून चार दिवस परदेशातल्या पंचतारांकित हॉटेलात 'सात्विक' पेय पीत राजकारणावर 'बौद्धिक' चर्चा करतात. या बुद्धिनिष्ठ चर्चेत लाखो रुपये सहजा सहजी मिळवतात. राष्ट्र भक्ती, स्वातंत्र्यप्रेम, सामान्य माणसाचे जीवनमान कसे उंचावता येईल ? शैक्षणिक सुधारणा वगैरे खुळचट आणि क्षुद्र विषय त्यांच्या डोक्यात नसतात. ही व्यवहार चतुर माणसे तुमच्याप्रमाणं कधी उपोषणाला बसली नाहीत. उपोषण वगैरे वेड्या कल्पना साधूसंतांनाच लखलाभ असोत. आपल्या आलीशान डायनिंग हॉलमध्ये त्यांनी तुमचा फोटो लावलेला असतो आणि त्याच्या खालीच बसून सामिष आहार आणि तीर्थप्राशन करुन ते तुम्हाला धन्यवाद देत असतात. कारण तुमच्यामुळेच त्यांना जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. म्हणून म्हणतो, 'बापूजी ! आजच्या अति सुधारलेल्या वातावरणात तुमचा कसला उपयोग होणार आहे ? गांधी जयंती हे केवळ निरर्थक कर्मकाण्ड होऊन बसले आहे. तुमची साधी राहाणी आणि उच्च विचारसरणी केव्हाच आऊट ऑफ डेट झाली, फार तर आम्ही तुमची एक दिवस जयंती साजरी करू. तुमचा जयजयकार करू. माणूस म्हणून तुमची किंमत संपली. तुम्ही आता देव्हाऱ्यातले देव आहात. देवाने कसे देवासारखे बसून पूजा करुन घ्यायची असते. दाखवलेल्या नैवेद्यावर समाधान मानायचे असते. तुम्ही जिवंत असतांना अनेकांची अडचण

होत होती. तुम्ही निघून गेल्यापासून त्यांचे आता बरे चालले आहे.'

प्रिय बापूजी,

साऱ्याच महापुरुषांची त्यांच्या अनुयायांची अशीच दैना उडवली हा इतिहास आहे. महापुरुष येतात आणि जातात. जग मात्र आहे तिथंच राहातं. कितीही बदलायचा प्रयत्न केला तरी ते बदलत नाही. पण कुत्र्याचे वाकडे शेपूट सरळ करण्याचा प्रयत्न संत सोडीत नाहीत. ही माणसे इतिहासावरून धडा घेत नाहीत. त्यांची 'जित्याची खोड' असते. गोडसेने फक्त तुम्हाला गोळी घातली. पण त्यापूर्वीच तुमच्या अनुयायांनी तुमच्या तत्त्वज्ञानाला शेकडो गोळ्या घालून ठार केले होते. गांधी जाण्यापूर्वीच 'गांधीयुग' संपून गेले होते. तुमचे नाव महावीर, बुद्ध आणि ख्रिस्त यांच्या मालिकेत गुंफले जाते. पण महावीर आणि बुद्ध यांचे तरी जगाने काय केले ? ख्रिस्ताला तर सुळावर चढवले. म्हणून म्हणतो बापूजी, आपण आपले स्वत:पुरते पाहावे. जगाच्या भानगडीत पडू नये. तुमची स्तुतिस्त्रोत्रे गाताना मी कधी कधी भावना वेगानं म्हणतो.

'गांधी म्हणजे मानवी संस्कृतीच्या सागरावर उचंबळून आलेली एक महन्मंगल लाट आहे. गांधी म्हणजे मनुष्याच्या मनुष्यत्वाचा अमोलिक ताम्रपट आहे. गांधी म्हणजे स्वातंत्र्याच्या अभिनव उद्यानात शांतीच्या वृक्षावर बसून गायिलेले माणुसकीचे मधुर गायन आहे. गांधी हे एका व्यक्तीचे नाव नव्हे ते नवजीवनाचे प्रतीक आहे.'

पण या काव्यमय अलंकारिक भाषेला कसला अर्थ आहे ? सुगंधी शब्दांची कितीही फुले उधळली तरी काळाच्या लाटेबरोबर वाहून गेलेला तुमच्यासारखा महामानव परतणे शक्य नाही. तुम्ही परत येऊ नका. कारण या जगात आता कावळ्याला कोकिळा म्हणतात. भुंकणारा कुत्रा किंवा कोल्हा सिंहासनावर बसलेला असतो. गाढवांना पदोन्नती देऊन त्यांना अश्वराज म्हणण्यात येते. असल्या सत्ता आणि संपत्तीच्या मागे धावतांना कमरेचे सुटले तरी बेदरकार असणाऱ्या जगात तुमच्यासारख्या संयमी माणसाला पागडी देऊन सुद्धा जागा मिळणार नाही. 'बापूजी! तुम्ही परत येऊ नका. केशराचा सुगंध हरला. विषाने अमृताला जिंकले हे सत्य आहे. आता गांधी जयंती हा एक 'सरकारी कार्यक्रम' पंधरा मिनिटांत उरकून घेतला की घोडे गंगेत न्हाले !!'

●●●

## डॉ. निर्मलकुमार फडकुले
## यांचे प्रकाशित साहित्य

लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व
साहित्यवेध
संतकवी तुकाराम : एक चिंतन
काही रंग काही रेषा
हिरव्या वाटा
आनंदाची डहाळी
संत चोखामेळा आणि समकालीन संतांच्या रचना
जगायचं कशासाठी ?
रंग एकेकाचे
संत सहवास
संतांचिया भेटी
अमृतकण कोवळे
संतवीणेचा झंकार
समाजपरिवर्तनाची चळवळ : काल आणि आज
सुखाचा परिमळ
संत तुकारामांचा जीवनविचार
मन पाखरू पाखरू
साहित्यातील प्रकाशधारा
संत चोखामेळा : अश्रूंची कहाणी
प्रिय आणि अप्रिय
चिंतनाच्या वाटा
दीपमाळ
अजून जग जिवंत आहे !

### संपादित

ज्ञानेश्वरी : अध्याय पहिला
चिपळूणकरांचे तीन निबंध
प्रबोधनातील पाऊलखुणा
निवडक लोकहितवादी
रत्नकरंड श्रावकाचार
यात्रिक
कल्लोळ अमृताचे

आपलं आयुष्य काहीसं कडू आणि बरचसं गोड आहे. कडवटपणालाही अर्थ आहे. कडूगोड क्षणांचा वेध आपल्या लालित्यपूर्ण शैलीनं निर्मलकुमार फडकुले घेत आहेत. त्यांनी केलेले जीवनचिंतन त्यांच्या रसिक व रुचिर प्रकृतीची सहज साक्ष देते. विविध रंगगंधांनी ओथंबलेले हे ललित लेख लेखकाच्या प्रगल्भ आणि प्रसन्न मनाचे दर्शन घडवतात. जीवनगाणं गातच राहावं, कारण जीवनाची मैफल आपल्याला रंगवायची आहे, ही त्यांची भूमिका जितकी आशावादी, तितकीच ती कुणालाही स्वीकारावीशी वाटेल.

निर्मलकुमार फडकुले हे आजच्या चिंतनशील शैलीदार लेखकांच्या पंक्तीतले एक महत्त्वाचे नाव. खोल चिंतन आणि मोहक, अवखळ शब्दकळा यांच्या वाटेने प्रिय आणि अप्रिय यांचा परामर्श घेणारे हे ललित लेखन रसिकांच्या पदरात विचारगर्भ आनंदाचे आणि दुःखाचे काही क्षण निश्चित टाकील.

सुविद्या प्रकाशन